(सभापतीस्थानी : मा. सभापती)

पृ. शी / मु. शी तोंडी उत्तरे

नगर परिषद अंतर्गत माध्यमिक/उच्च माध्यमिक शिक्षक कर्मचा-यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती व रजा प्रवास सवलत योजना लागू करणेबाबत

(१) * ५५७४ श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री. जी. एल. अैनापूरे तारांकित प्रश्न क्रमांक २४१६ ला दिनांक ३१ मार्च, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगर परिषद व महानगर पालिकेच्या माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक कर्मचा-यांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती व रजा प्रवास सवलत योजना लागू करण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाचा अभिप्राय शासनास प्राप्त झाला आहे काय,

(२) असल्यास, केव्हा व उक्त प्रस्तावातील अभिप्रायाचे व शासन निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) अद्यापी प्राप्त झाला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ, प्रा. वसंत पुरके यांच्याकरिता : (१) होय.

(२) एखाद्या विभागांतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना ठराविक निर्णय लागू करावेत किंवा कसे, याबाबत संबंधित प्रशासकीय विभागाने उचित निर्णय घ्यावा असे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. नानासाहेब बोरस्ते : सभापती महोदय, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका अंतर्गत माध्यमिक / उच्च माध्यमिक शिक्षक कर्मचा-यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती व रजा प्रवास सवलत योजना लागू करण्याबाबतचा हा प्रश्न आहे. वास्तविक शालेय शिक्षण विभागातील सर्व कर्मचा-यांना अशा प्रकारची सवलत मिळाली आहे. समान शैक्षणिक पात्रता आणि समान कार्यभार असतानाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नगरपरिषद, नगरपालिका आणि महानगरपालिका अंतर्गत माध्यमिक / उच्च माध्यमिक शिक्षक कर्मचा-यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती व रजा प्रवास सवलत योजना लागू केलेली नाही. ही सवलत या

श्री. नानासाहेब बोरस्ते.....

शिक्षकांना मिळावी म्हणून हा प्रश्न या सदनात अनेक वेळा चर्चेला आलेला आहे. ही सवलत नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका अंतर्गत माध्यमिक / उच्च माध्यमिक शिक्षक कर्मचा-यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती व रजा प्रवास सवलत योजना लागू करण्याबाबतचा आदेश शासन काढेल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, राज्यातील खाजगी शाळा, सेवाशर्ती इत्यादीबाबतचा महाराष्ट्र कर्मचारी अधिनियम 77 च्या कलम 81 च्या तरतुदीनुसार नगरपरिषद, महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना ही सवलत देण्याचे बंधन त्यांच्यावर आहे. त्या बाबतची कार्यवाही नगरपरिषद आणि महानगरपालिकेने केली पाहिजे, असे शासनाचे मत आहे.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, हा प्रश्न या सदनात सहा वेळा चर्चेला आलेला आहे. हा प्रश्न आम्ही सुरुवातीला नगरविकास विभागाकडे देत होतो. आता हा प्रश्न शालेय शिक्षण विभागाकडे आला आहे. नगरविकास विभागाने हा प्रश्न शालेय शिक्षण विभागाकडे ढकलून दिला आहे. सहा वेळा हा प्रश्न विचारलेला असताना शासनाने त्याला वेगवेगळी उत्तरे दिली आहेत. दि. 31 मार्च रोजी तारांकित प्रश्न क्र. 2416 ला उत्तर देत असताना माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले की, वित्त विभागाच्या सूचनेनुसार या बाबतचा प्रस्ताव प्रशासकीय विभागाकडे अभिप्रायार्थ पाठविण्यात आला आहे. दि. 11.4.2005 रोजी राज्यमंत्री श्री. राजेश टोपे यांनी असे उत्तर दिले की, " मी या प्रश्नात स्वत:हून लक्ष घालून एक महिन्याच्या आत या बाबतचा निर्णय घेईन." यापूर्वी विचारलेल्या प्रश्नालाही माननीय मंत्रिमहोदयांनी " 15 दिवसात या बाबतचा निर्णय घेतो " असे उत्तर दिले आहे. आता हा प्रश्न शिक्षण विभागाकडे आलेला असल्यामुळे याबाबतचे प्रश्न विचारावयाचे की नाहीत हा प्रश्न आमच्यासमोर निर्माण झाला आहे. महाराष्ट्रातील सर्व माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांतील सहा ते सात लाख शिक्षकांना वैद्यकीय प्रतिपूर्ती आणि रजा सवलत मिळत आहे. केवळ नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका अंतर्गत ज्या शाळा आहेत,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या शाळांतील शिक्षकांना ही सवलत मिळत नाही. सभापती महोदय, या सर्व शाळांना शासन 100 टक्के अनुदान देत आहे. यापूर्वी 15 दिवसात, एक महिन्यात या बाबतचा निर्णय घेतो,

13-07-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A 3

ASJ/ MHM/ SBT/ 13:00

....5474....

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे.....

असे टाईमबाऊंड आश्वासन माननीय मंत्रिमहोदयांनी दिले आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी या बाबत स्वत: लक्ष घालण्याचे आश्वासन दिले होते. आता संबंधीत प्रशासकीय विभागाने उचित निर्णय घ्यावा असे अभिप्राय दिले आहेत. महाराष्ट्रातील सर्व शाळांतील कर्मचा-यांना ही सवलत मिळत आहे. फक्त विदर्भातील 54 माध्यमिक, पश्चिम महाराष्ट्रातील 14 आणि कोकणातील एका माध्यमिक शाळांतील शिक्षकांना ही सवलत मिळत नाही. विदर्भावर शासनाचा राग आहे काय ? महाराष्ट्रातील सर्व शाळांतील शिक्षकांना ही सवलत दिली आहे. परंतु या लहानशा गटाला ही सवलत दिलेली नाही. ही शोभनीय बाब नाही. या बाबत माझा प्रश्न असा आहे की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी नगरपरिषद, नगरपालिका तसेच महानगरपालिका अंतर्गत माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षण कर्मचा-यांना ही सवलत लागू केली जाईल काय ?

(यानंतर श्री. सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, राज्यामध्ये सर्वच कर्मचाऱ्यांना ही सवलत दिली जाते. परंतु नगरपालिका व महानगरपालिकांचे कर्मचारी असल्यामुळे अनेक महानगरपालिका आपल्या कर्मचाऱ्यांना वेगवेगळया सवलती देते. उदा. मुंबई महानगरपालिका आपल्या कर्मचाऱ्यांना गंभीर आजारासाठी 45 हजार व कुटुंबियांना 10 हजार रुपये आर्थिक मदत देते. म्हणून माननीय सदस्य श्री. डायगव्हाणे यांच्या भावना ओळखून या बाबतचा निर्णय घेण्यासाठी नगर विकास विभाग व शिक्षण विभाग असे दोन्ही विभाग एकत्र बसून या अधिवेशनामध्ये नाही परंतु पुढील अधिवेशनापूर्वी कोणत्याही परिस्थितीत निर्णय घेऊ अशाप्रकारचे मी आश्वासन देतो.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देण्याचा प्रश्न लक्षवेधी सूचनेच्या रुपाने मी उपस्थित केला होता. त्यावेळी माननीय राज्यमंत्री श्री. राजेश टोपे यांनी असे उत्तर दिले होते की, 100 टक्के स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना अनुदान दिले जाते. त्या ठिकाणी ही योजना लागू करण्याच्या दृष्टीने सकारात्मक दृष्टीकोन स्वीकारुन एक महिन्याच्या आत निर्णय घेऊ असे आश्वासन दिले होते. तेव्हा एक महिन्याच्या आत तो निर्णय कां घेण्यात आला नाही? तो निर्णय न घेण्याचे नेमके कारण काय आहे? आणि तातडीने या निर्णयाची अंमलबजावणी करणार काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे लवकरात लवकर निर्णय घेऊ. आणि पुढील अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित करण्याची आपल्याला संधी रहाणार नाही.

श्री. व्ही. यु. डायगव्हाणे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी पुढील अधिवेशनापूर्वी निर्णय घेऊ असे म्हटले आहे. ही योजना लागू करण्याच्या संदर्भात निर्णय घेणार आहात की, विभाग बदलविण्याच्या संदर्भात निर्णय घेणार आहात?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी जबाबदारी टाळीत नाही. दोन्ही विभाग एकत्र बसून लवकरात लवकर हा निर्णय घेऊ, आणि येत्या अधिवेशनामध्ये हा प्रश्न शिल्लक रहाणार नाही असे सांगतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सोलापूर शहरातील हद्दवाढ भागामध्ये सुविधांचा अभाव

(2) * 7082 श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर जगताप :

सन्मानीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सोलापूर शहरातील विस्तारासाठी हद्दवाढ भाग गेल्या 13 वर्षापूर्वी सोलापूर शहरास जोडला आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, मागील 13 वर्षापासून या हद्दवाढ भागामध्ये (देगांव) महापालिकेने अद्यापपर्यंत कोणत्याच सुविधा उपलब्ध करुन न दिल्यामुळे स्थानिक नागरीकांनी अनेकवेळा निवेदन देवूनसुध्दा याकडे दुर्लक्ष केलेले आहे हे खरे आहे काय,

(3) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, त्यात काय आढळून आले, तसेच हद्दवाढ भागात नागरी सुविधा देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता : (1) होय.

(2) हद्दवाढ भागामध्ये (देगांव) पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन, धोबी घाट, ड्रेनेज, कटारे, डांबरी रस्ते, बोअर, सार्वजनिक शौचालय, दिवाबत्तीची सोय, पशुचिकित्सालय, इत्यादी सुविधा महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिल्या आहेत.

(3), (4) व (5) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, हद्दवाढ भागामधून महानगरपालिकेने 1992 ते 2005 पर्यंत गेल्या 12 वर्षापासून जवळ जवळ 41 कोटींची कर वसूली केली आहे. परंतु त्या मानाने या हद्दवाढ भागाला पुरेशा सुविधा दिल्या जात नसल्यामुळे त्यांना वेळोवेळी जन आंदोलन करावे लागते हे खरे आहे काय? तसेच, दोन क्रमांकाच्या छापील उत्तरामध्ये उल्लेख केलेल्या सुविधांवर शासनाला आतापर्यंत किती खर्च करावा लागला याचा तपशील मंत्रिमहोदय देतील काय?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, 13 वर्षापूर्वी या 11 गावांचा समावेश सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढमध्ये निश्चितपणे झाला. ज्यावेळी हद्दवाढ होते त्यावेळी सर्व गावांचा समावेश होतो. आणि समावेश झालेल्या सर्व गावांचा एकाच वेळी एकत्रित विकास करणे अशक्य असते. परंतु त्या ठिकाणी सातत्याने विकासाची प्रक्रिया चालू आहे. आतापर्यंत या 11 गावांसाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

*** 7082....**

50 कोटी रुपये खर्च झाले आहेत. ज्या देगाव बाबत प्रश्न विचारला आहे. त्या गावासाठी 1 कोटी 24 लाख 23 हजार रुपये खर्च झाले आहेत. त्याचप्रमाणे डांबरी रस्त्यांसाठी 55 लाख, ड्रेनेजसाठी 43 लाख व दिवाबत्तीसाठी 75 हजार रुपये खर्च झाले आहेत. त्याचप्रमाणे फरशीकरण, समाजमंदिर बांधकाम वगैरे बाबींसाठी देखील योग्य पध्दतीने खर्च झाला आहे. उजनीवरुन कायम स्वरुपी पाणी पुरवठा योजना करण्यासाठी यावर्षी 30 लाख रुपये ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे निश्चितपणे या गावच्या पूर्ण विकासाकडे महानगरपालिका लक्ष देत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील पब्लिज ट्रस्टमार्फत चालविलेल्या सुमारे 70 मोठ्या रुज्जालयांवर ज ारवाई ज रज्याबाबत

(3) * 5580 डॉ. दीपज सावंत , श्री. विलास अवचट , श्री. अरविंद सावंत , श्री. अ-ंत तरे , श्री. मधुज र चव्हाज , श्री. वि-ोद तावडे , श्रीमती ज ंता -लावडे , श्री. राम-ाथ मोते , श्री. अ-िल परब तारांज ीत प्रश्-ा ज्र मांज 1757 ला दि-ांज 13 एप्रिल, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : स-मा-ा-ीय मु□य मंत्री पुढील □ाष्टींचा □ुलासा □रतील □ाय :-

(1) मुंबईतील पब्लिज ट्रस्टमार्फत सुमारे 70 हॉस्पिटल चालविली जात असू-ा त्यां-ा शास-ा-े विविध सवलती दिल्या आहेत, हे जरे आहे ज ाय,

(2) असल्यास, सदर सवलतीचे भाज म्हजू-ा शास-ा-े अशा इस्पितळां-ा मोक्याच्या जाजा सवलतीच्या दरात देजे, पाजी दरात सवलत, वीजपुरवठा, चटई ि-र्देशांज ात सवलत आदि भरीव सवलती शास-ा-े दिल्या आहेत, हे जरे आहे ज ाय,

(3) असल्यास, सदर पब्लिज ट्रस्ट हॉस्पिटल्स-ी अति ज्रीब वर्जातील लोज ांसाठी व तसेच दुर्बल घटज वर्जासाठी दहा टक्जे जाटा मोफत उपचारांसाठी उपलब्ध ज रु-ा देज्याचे त्यांच्यावर ज ायद्या-े बंध-ा घालज्यात आले आहे, हे जरे आहे ज ाय,

(4) असल्यास, सदर ज ायदेशीर बंध-ाचे उल्लंघ-ा मुंबईतील पब्लिज इस्पितळा-े जे ल्याचे शास-ाच्या दृष्टीस आले आहे, हे जरे आहे ज ाय,

(5) असल्यास, शास-ा-े घातलेल्या ज ायदेशीर बंध-ाचे उल्लंघ-ा जे लेल्या पब्लिज ट्रस्टतर्फे चालविज्यात आलेल्या हॉस्पिटलवर शास-ा-े ज ाही ज ारवाई जे ली अथवा ज रज्यात येत आहे ज ाय ?

श्री. हसन मुश्रीफ, श्री.विलासराव देशमुज यांच्याकरिता : (1) होय, अंशत: जरे आहे.

(2) होय, अंशत: जरे आहे.

(3) होय, जरे आहे.

(4) अंशत: जरे आहे.

(5) ज ार्यवाही ज रज्यांत येत आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 5580 . . . .

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, गेल्या अधिवेशनात याच विषयावरील तारांकित प्रश्न क्र.1757 चर्चेला आला होता आणि त्यावेळी शासनाने जे आश्वासन दिले होते ते मी आपल्या परवानगीने या ठिकाणी नमूद करु इच्छितो. 1) यासाठी एक मॉनेटरींग समिती नेमून त्या समितीव्दारे मॉनेटरींग करण्यात येईल. 2) जर या रुग्णालयांनी नियमांची अंमलबजावणी केली नाही तर त्यांच्या सवलती काढून घेण्यात येतील. आता माझा पहिला प्रश्न असा आहे की, ज्या रुग्णालयांनी घालून दिलेल्या नियमांचे उल्लंघन केले आहे, त्यांची नावे काय आहेत ? आणि पब्लीक ट्रस्टखाली जी 70 पंचतारांकित रुग्णालये आहेत, त्यांच्यावर गेल्या तीन महिन्यात शासनाने कोणती कारवाई केली आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या विषयावर गेल्या अधिवेशनामध्ये सुध्दा सविस्तर चर्चा झाली होती. यासंदर्भात एक जनहित याचिका उच्च न्यायालयात दाखल केली असून त्यावेळीही सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत साहेबांनी असेच प्रश्न विचारले होते आणि याबाबतीत शासनाचे मत काय आहे असे विचारले होते. तेव्हा असे सांगितले होते की, उच्च न्यायालयाने विचारले आहे की, हे कशा प्रकारे करणार आहात ? या हॉस्पीटल्स्ची पब्लीक ट्रस्टखाली नोंदणी झाली आहे आणि त्यांनी अतिगरीब तसेच गरीब लोकांना सवलती द्याव्यात. तसेच आपल्या रुग्णालयामध्ये 10 टक्के बेड यांच्यासाठी राखून ठेवावेत. पण आम्ही जेव्हा धर्मदाय आयुक्तांच्यावतीने याबाबतीत तपासणी केली तेव्हा असे समजून आले की, ही हॉस्पीटल्स् तसे करीत नाहीत. त्यानंतर जनहित याचिका दाखल झाली. त्यावेळी उच्च न्यायालयाने सांगितले की, हॉस्पीटल्स् आणि शासन या दोघांनी मिळून एक योजना तयार करावी. त्यानंतर धर्मदाय आयुक्तांच्यावतीने शपथपत्र दाखल करुन सांगितले की, आमचे मुंबईतील जॉईंट कमिशनर आणि . . . .

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत काय केले ते सांगावे. ते जे सांगत आहेत, ते उत्तर आधी दिलेले आहे.

. . . .सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. त्यानंतर तुम्हाला संधी देतो.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी त्यापुढचे सांगत आहे. माझे उत्तर ऐकून घ्यावे. उच्च न्यायालयाने सांगितले की, ही योजना वर्तमानपत्रामध्ये जाहीर करा. हा प्रश्न येथे आला तेव्हा ही बाब उच्च न्यायालयात प्रलंबित असताना त्यावर चर्चा झाली होती. नंतर ही हॉस्पीटल्स् कोर्टामध्ये गेली आणि त्यांनी सांगितले की, शासनाकडून ज्या सवलती मिळावयास पाहिजेत, त्या सर्व मिळत नाहीत. त्यांनी तेथे आपापली मते मांडली. त्यावेळी उच्च न्यायालयाने सांगितले की, तुम्ही योजना जाहीर करा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याबाबतीत काय केले ते सांगावे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आम्ही गरीबांच्या बाजूने आहोत.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.मधुकर चव्हाण : तुमच्या आदेशांना ते केराची टोपली दाखवतात.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

सभापती : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आमच्याकडे मागच्यावेळचे प्रोसीडींग आहे.

सभापती : या प्रश्नावर येथे गेल्या अधिवेशनात फार गांभीर्याने चर्चा झाली आणि विधानसभेमध्येही चर्चा झाली आहे. आपण असे सांगितले की, याबाबतीत हाय कोर्टात एक दावा, एक पब्लीक इंटरेस्ट लिटीगेशन दाखल झाले आहे. याबाबतीत चॅरिटी कमिशनर आणि अन्य पार्टीज् आहेत. याबाबतीत त्यांनी काही अंडरटेकींग किंवा काही योजना उच्च न्यायालयात दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, हाय कोर्टामध्ये जी योजना दिलेली आहे, ती कोणती आहे ? कशी आहे ? याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी तेच सांगत आहे. हाय कोर्टाने सांगितले की, ती योजना लोकांपुढे जाहीर करावी. त्याप्रमाणे ती परवा जाहीर केली. दूरदर्शनवर जाहीर केली, टाईम्स् ऑफ इंडियामध्ये दिली, 15 जूनच्या लोकमतमध्ये दिली.

. . . .सी-3

APR/SBT/MHM 13:10

ता.प्र.क्र. 5580 . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, 15 जूनच्या लोकमतमध्ये दिली असे माननीय मंत्री महोदय सांगत आहेत.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

यानंतर श्री.किल्लेदार . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5580 (पुढे चालू.....

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, प्रश्नाची तीव्रता कितीतरी वाढविण्याचा प्रयत्न केला तरी प्रश्न शेवटी सब ज्युडीस आहे. हे सगळे प्रकरण उच्च न्यायालयात आहे. या संबंधाने जे काही पुढच्या काळात निर्णय करावयाचे आहेत, ते उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे करावयाचे आहेत. कृपया सन्माननीय सदस्यांनी ऐकून घ्यावे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

सन्माननीय सदस्यांची वेगळी माहिती असू शकते. कारण माझ्यापेक्षा ते अधिक जागरुक आहेत, याची मला कल्पना आहे. परंतु वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. सरकारकडे जी माहिती आहे, ती आपल्यासमोर ठेवतो आहोत. या संदर्भात पब्लीक इंटरेस्ट लिटिगेशन दाखल झालेला आहे. या सगळया चॅरिटेबल संस्था असल्यामुळे यांचे नियंत्रण धर्मादाय आयुक्तांकडे आहे. यामध्ये शासनाला डायरेक्ट हस्तक्षेप करता येणार नाही. त्या हॉस्पिटल्सनी गरीब, दुर्बल पेशंटसाठी किती कॉटस् ठेवलेल्या आहेत, याची माहिती धर्मादाय आयुक्तांना दिली पाहिजे. मागच्यावेळेस उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नोत्तराच्या वेळी मी सांगितलेले आहे की, सरकारच्या स्कीमप्रमाणे हे घडत नाही. ज्या सवलती अपेक्षित आहेत त्या सवलती अनेक हॉस्पिटल्स देत नाहीत, ही वस्तुस्थिती सरकारने मान्य केलेली आहे. म्हणून या संदर्भात कोणत्या प्रकारचे नियंत्रण असले पाहिजे याबाबत सांगितले होते. यासाठी एक समिती नेमली पाहिजे, त्या समितीमार्फत त्या ठिकाणी पेशंटस् जातात की नाही, त्यांना सवलत मिळते की नाही हे सगळे पाहिले पाहिजे. त्याच आधारावर जी सदनामध्ये चर्चा झाली, तिचाच आधार घेऊन धर्मादाय आयुक्तांमार्फत ॲफीडेव्हीट दाखल करण्यात आले. त्यामध्ये जी स्कीम दिलेली आहे, ती कोर्टाने पब्लीश करण्यास सांगितलेले आहे. लोकप्रतिनिधी असतील, जनता असेल यांची नेमकी कोणती ऑब्जेक्शन्स आहेत, ते वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन मागवावेत आणि त्यांच्याकडून ज्या काही सूचना येतील त्या सूचनांसह आमच्याकडे ती स्कीम करुन पाठवावी, असे कोर्टाने सांगितलेले आहे दरम्यानच्या काळामध्ये चॅरिटी कमिशनरनी कारवाई करण्याचे थांबविलेले नाही. या हॉस्पिटल्सवर कारवाई करण्याच्या संबंधाने त्यांनी नोटिसा दिलेल्या आहेत. त्यामध्ये लिलावती हॉस्पिटलच्या विश्वस्तांना आपल्याला पदावरून का कमी करण्यात येऊ नये, अशाप्रकारची 41 (ड) खाली नियमाप्रमाणे नोटीस काढून कारवाई केलेली आहे. त्याचबरोबर भाटिया हॉस्पिटल, जसलोक हॉस्पिटल यांना कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. धर्मादाय आयुक्त या सगळया रुग्णालयांची पहाणी, तपासणी करत आहेत. त्यांनी ॲक्शन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

थांबविलेली नाही. या संबंधातील मूळ स्कीम ॲफिडेव्हीट करुन कोर्टामध्ये दिलेली आहे त्याची प्रत माझ्याकडे आहे. या संदर्भाने आपल्या काही सूचना असतील तर त्यांचाही समावेश करुन कोर्टाला स्कीम सादर करता येईल. आज हे प्रकरण कोर्टामध्ये सब ज्युडिस आहे. या योजनेला कोर्टाकडून मान्यता मिळाल्यानंतर त्याप्रमाणे सरकारच्या वतीने सुधारित आदेश काढले जातील आणि त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी काटेकोरपणाने केली जाईल. या संदर्भाने कशाप्रकारे मॉनिटरींग करावे, या संदर्भात आपण म्हटलेले आहे की, जॉईन्ट कमिशनर हे या समितीचे अध्यक्ष असतील आणि त्यामध्ये जॉईन्ट डायरेक्टर, हेल्थ सर्व्हीसेस, मेडिकल एज्युकेशन हे सदस्य असतील, हॉस्पिटल्सच्या असोसिएशनचे सेक्रेटरी हे प्रतिनिधी म्हणून असतील,.कारण ज्या हॉस्पिटलमध्ये पेशंटस् पाठवायचे आहेत, त्यांचाही प्रतिनिधी असला पाहिजे, हेल्थ ऑफिसर, म्युनिसिपल कॉर्पोरेशन, मुंबई हेही त्या समितीमध्ये असावेत, अशी समिती असावी, असे सुचविलेले आहे. यामध्ये जर कोणाला सुधारणा सुचवायची असेल तर जरुर सुचवावी. म्हणून ग्रेटर मुंबईच्या पातळीवर आणि दुसरी जिल्ह्याच्या पातळीवर समिती असावी. म्हणून सरकारने सवलतीच्या दरामध्ये एफएसआय दिलेला आहे, कमी किंमतीमध्ये जमीन दिलेली आहे, आज अशी परिस्थिती आहे की, अर्बन डेव्हलपमेंट विभागाने परवानगी देतांना काही अटी घातल्या, जमीन देताना महसूल विभागाने काही अटी घातलेल्या आहेत आणि चॅरिटी कमिशनरच्या नियमाखाली काही अटी आहेत. आम्ही अशी चर्चा केली की, या विभागाच्या तीनही सचिवांनी म्हणजे विधी व न्याय विभागाच्या सचिवांनी, नगर विकास विभागाच्या सचिवांनी आणि महसूल सचिवांनी एकत्रित बसून त्यांनी वेगवेगळया अटी घातलेल्या आहेत त्या सिंक्रोनाईज करुन किती गरीब रुग्णांना जागा उपलब्ध करुन त्यांच्यावर उपचार करु शकतो, यासबंधात त्यांनी विचार करावा. म्हणून सन्माननीय सदस्यांच्या सर्व भावनांशी आम्ही सहमत आहोत. आपली जेवढी तीव्रता आहे त्यापेक्षा आमची थोडी कमी तीव्रता असेल, परंतु त्याच भावनेने आम्ही काम करु इच्छितो. म्हणून मला असे वाटते की, राज्यमंत्री महोदय जे उत्तर देत आहेत, ते नियमाला धरुन आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे शासन एकतर्फी निर्णय यामध्ये करु शकत नाही. कोर्टानेच या गोष्टी बारकाईने पहायच्या ठरविलेल्या आहेत. म्हणून कोर्टाकडून स्कीम मंजूर झाल्यानंतर सवलतीच्या संबंधातील अपूर्णपणाची कारवाई केली जाईल.

सभापती : सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबतीतील संपूर्ण विवेचन केलेले आहे. ही बाब न्यायप्रविष्ट आहे हेही त्यांनी सांगितले. याबाबत.....

यानंतर कु.थोरात.....

अशुद्धीत मत / प्रारूपीसाठी नाही

सभापती ...

मला वाटते सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये ज्या भावना आहेत त्याच भावना शासनाच्या मनामध्ये आहेत. सदनाच्या मनामध्ये असणारी भावना आणि शासनाच्या मनामध्ये असणारी भावना यामध्ये काहीही फरक नाही. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबतची सगळी वस्तुस्थिती सभागृहासमोर मांडलेली आहे. आता पुढील प्रश्न क्रमांक 4 घेण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याठिकाणी उत्तर देतांना माननीय मुख्यमंत्र्यांनी वस्तुस्थिती सांगितली आणि ते असेही म्हणाले की, सदस्यांच्या काही सूचना असतील तर त्या सूचना त्यांनी द्याव्यात. या सभागृहातील सदस्यांना या प्रश्नाच्या बाबतीत काही सूचना करावयाच्या आहेत. तेव्हा आपण सदस्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे आणि त्यानंतरच शासनाने यासंबंधीचा आपला निर्णय द्यावा.

सभापती :माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीररीत्या सूचना मागविलेल्या आहेत. त्यामुळे त्या सूचना सन्माननीय सदस्यांनी सभागृहात द्याव्यात असे नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नाच्या संदर्भातील सगळी वस्तुस्थिती या ठिकाणी विषद केलेली आहे. या प्रश्नाच्या बाबतीत सभागृहात असलेली भावना आणि शासनाची भावना यामध्ये काहीही फरक नाही. म्हणून मी पुढचा प्रश्न पुकारलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी आपला पुढील प्रश्न क्रमांक 4 विचारावा.

श्री. पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, आपण आम्हाला प्रश्न विचारण्यासाठी संधी देत नाही. म्हणून आम्ही सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षाचे सदस्य बहिर्गमन करतात)

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील सुमारे 19 हजार जु-या व मोडज ळीस आलेल्या

उपज रप्राप्त इमारतींच्या पु-ार्बांधजी बाबत

(4) * 7662 श्री. सदाशिवराव पोळ , श्री. जितेंद्र आव्हाड , श्रीमती मंदा म्हात्रे , प्रा. जोजेंद्र ज वाडे , प्रा. फौजीया जा-ा , श्री. जजनाथ शेवाळे , श्री. विलास अवचट , श्री. अ-ांत तरे , डॉ. दिपज सावंत , श्री. दिवाज र रावते , श्री. अरविंद सावंत तारांजि त प्रश-ा ज्र.2722 ला दि-ांज 13 एप्रिल,2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : स-मा-ा-ीय मुज्य मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा ज रतील ज ाय :-

(1) मुंबईतील सुमारे 19 हजार जु-या व मोडज ळीस आलेल्या उपज रप्राप्त इमारतींच्या पु-ार्बांधजी संदर्भात योज-ा राबविज्याची सद्यक्स्थती ज ाय आहे,

(2) अद्याप सदरची योज-ा राबविली जात -ासल्यास, विलंबाची सर्वसाधारज ज ारजे ज ाय आहेत,

(3) उक्त प्रश-ा भाज (1) मधील प्रज रजी हजारो इमारतींच्या दुरावस्थेचा विचार ज रता ज रज्यात येत असलेली उपाययोज-ा लवज रात लवज र ज रावी यासाठी जोजते प्रयत्-ा ज ेले वा ज रज्यात येत आहेत ?

श्री. दयानंद मस्के, श्री. विलासराव देशमुज यांच्याकरिता: (1), (2) व (3) प्रस्तुत प्रज रजी शास-ा ि र्जय दि.1.6.2005 अ-वये आवश्यज ते आदेश ि र्जमित ज रज्यात आले आहेत.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, 19 हजार जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्बांधणीबाबत प्रश्न विचारण्यात आलेला आहे. या प्रश्नाच्या अनुषंगाने मी असे विचारु इच्छितो की, मध्यंतरी विधान परिषदेच्या स्थानिक आमदारांना त्यांच्या फंडातून या इमारतींची पुर्नबांधणी करण्याकरिता परवानगी मिळत असे. पण सध्या गृहनिर्माण विभागामध्ये कोणी तरी सुप वाजवलेले दिसते. त्यामुळे या इमारतींच्या पुर्नबांधणीकरिता स्थानिक आमदार किंवा विधान परिषद सदस्यांना आपला फंड वापरता येणार नाही, अशा प्रकारचा जी.आर. निघाल्याचे आम्हाला कळलेले आहे. जीर्ण झालेल्या इमारतींमधील भाडेकरुंवर हा अन्याय आहे. शासनाकडे पैसे उपलब्ध नसतांनाही या इमारतींकडे पहाण्याचा शासनाचा दृष्टीकोन दुषित झालेला आहे असे मला वाटते. म्हणून याबाबतीतील शासनाची स्पष्ट भूमिका या सभागृहासमोर मांडण्यात यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, दिनांक 1/6/2005 च्या दरम्यान जो आदेश देण्यात आलेला आहे, त्यामध्ये अनुक्रमांक क्रमांक 16 व 17 मध्ये, "ज्या इमारती मोडकळीस आलेल्या व ज्या दुरुस्त करण्याच्या कुवतीच्या आहेत व ज्यांचा दर रु.1200 पर स्क्वेअर फूट असा आहे,त्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी अशा प्रकारे आमदारांना आपला फंड देता येत नाही," असे म्हटले आहे. सन्माननीय सदस्यांनी या आदेशातील क्रमांक 16 व 17 नीट बघितले तर त्यांना यासंबंधीची पूर्ण कल्पना येईन.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी या ठिकाणी प्रश्न विचारलेला आहे की, मोडकळीस आलेल्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी आमदार फंडातून पैसे खर्च करण्याची परवानगी शासनाने यापूर्वी दिलेली होती.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 7662..... श्री. विलासराव देशमुख ....

परंतु आता यासंदर्भात नवीन धोरण स्वीकारलेले आहे. कारण ज्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत त्या तात्पुरत्या दुरुस्त करतो त्यामुळे त्या नव्याने बांधण्यासाठी घेता येत नाहीत. म्हणून यामध्ये जे म्हटले होते त्याप्रमाणे 1200 रुपये प्रती चौरस मीटर यापेक्षा अधिक रक्कम लागत असेल तर इमारत रिपेअर करता येत नव्हती. 1200 रुपये आणि अधिक त्यांचा आमदार फंड असे जोडून रिपेअर करण्याच्या संदर्भात आतापर्यन्त पैसे खर्च करीत होते. त्यामुळे त्या इमारतींना नव्याने बांधकाम करणे कधीच शक्य नव्हते. यासंदर्भात आमदारांनी निवेदने दिली, तक्रारी केल्या आणि सांगितले की, आमचा जो फंड आहे तो इतर कामांवर खर्च करता येत नाही म्हणून त्या अटी शिथिल करण्याच्या संदर्भात आम्ही सूचना दिलेल्या आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा जो प्रश्न आहे तो मी नंतर विचारतो. माननीय मुख्यमंत्र्यांनी आता जे निवेदन केले आहे त्यावर माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, ज्या ठिकाणी 1200 रुपये आणि त्यापेक्षा जास्त खर्च होत असेल तर त्या इमारती दुरुस्त करता येत नव्हत्या. मुळातच ज्या दुरुस्त करण्यायोग्य इमारती आहेत त्यांच्या दुरुस्तीचे एस्टीमेट जर 1200 रुपयांपेक्षा जास्त येत असेल तर आमदार फंड लागला जात होता. जी इमारत दुरुस्त करताच येणार नाही त्याकरिता आमदार फंड किंवा कोणताही फंड लावू नये या मताशी मी सहमत आहे. पण ज्या ठिकाणी इमारत मोडकळीस आलेली नाही अशी परिस्थिती असताना इमारतीच्या दुरुस्तीकरिता 1200 रुपये प्रती चौरस मीटर पेक्षा जास्त खर्च येत असेल तर त्या इमारतीच्या दुरुस्तीकरिता अधिकचा लागणारा जो डिफरंस आहे त्याकरिता आमदार निधी मान्य करणार की नाही ?

श्री. विलासराव देशमुख : मी याबाबत उत्तर दिलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, शासन निर्णय दि. 1.6.2005 अन्वये आवश्यक ते आदेश निर्गमित करण्यात आले आहेत असे उत्तर दिलेले आहेत. हे आदेश नक्की काय आहेत ? मुंबई शहरामध्ये यासंदर्भात विचित्र प्रश्न निर्माण झालेला आहे. 19 हजार इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. 1600 इमारती तोडून पाडाव्या लागतील. त्या इमारती रिकाम्या करण्याच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नोटिसेस जारी करण्यात आलेल्या आहेत. त्यांची पुनर्बांधणी करावयाची म्हटली तर हायकोर्टाच्या आदेशानुसार त्याची अंमलबजावणी करणे अत्यंत कठीण झालेले आहे. या परिस्थितीमध्ये ज्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत त्या दुरुस्त होऊ शकत नाहीत. जर पुनर्बांधणी करावयाची झाली तर ते करण्याची म्हाडाची क्षमता नाही. 2.5 किंवा 2 एफएसआय देऊन त्यांना पुनर्बांधणी करण्यासाठी परवानगी देत होतो. परंतु कोर्टाच्या आदेशानुसार जी बंधने निर्माण झालेली आहेत त्यासंदर्भात शासनाचे निश्चित धोरण काय राहील ? जे हजारो भाडेकरु आज संकटामध्ये अडकलेले आहेत त्यांना आपण कोणता दिलासा देऊ शकणार आहोत ? या शहरामध्ये 500 पेक्षा जास्त गाळे म्हाडाच्या वतीने बांधण्यात आली होती. हे गाळे धोकादायक इमारतीमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना देण्याकरिता बांधण्यात आलेली होती. मध्यंतरी रेल्वे आणि इतर झोपडपट्टयांचा प्रश्न आला आणि ते सगळेच्या सगळे गाळे त्या झोपडपट्टीवासीयांना देण्यात आले. त्यामुळे या लोकांना देण्याकरिता गाळे उपलब्ध नाहीत. यासंदर्भात काय धोरण राबविणार ? दि. 1.6.2005 अन्वये आपण जे आदेश निर्गमित केले ते नक्की आदेश काय आहेत ?

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, या कामाला गती मिळावी यासाठी हे आदेश देण्यात आलेल आहेत. कॉर्पोरेशनकडून याला जे 34 पानी मान्यतापत्र द्यावे लागते ते 90 दिवसात द्यावे ही अट टाकण्यात आली आहे. अमूक कालावधीमध्ये इमारत पूर्ण झाली पाहिजे अशा पध्दतीने विकासकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, यामध्ये पहिला प्रश्न असा विचारलेला आहे की, मुंबईतील सुमारे 19 हजार जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्बांधणी संदर्भात योजना राबविण्याची सद्य:स्थिती काय आहे ? या ठिकाणी प्रश्न क्रमांक 1, 2 आणि 3 ला एकत्रित उत्तर देत असताना आदेश निर्गमित करण्यात आले आहेत असे उत्तर दिले आहे. पहिल्या प्रश्नाला दिलेले उत्तर योग्य आहे काय हे आपण पहावे.

सभापती : माननीय मंत्रिमहोदय उत्तर देतील.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, उत्तर देण्याची ही पध्दत आहे काय ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7662...

(विरोधी पक्षातील अनेक मा.सदस्य बोलत असतात.)

सभापती : सन्माननीय मंत्रिमहोदय, मा.सदस्यांनी याठिकाणी मुंबईशी निगडीत असणारा महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्यासंबंधीचे उत्तर 1, 2, 3 असे न एकत्रित येता प्रत्येक प्रश्नाच्यादृष्टीने थोडेसे सविस्तर उत्तर येणे आवश्यक होते. यादृष्टीने आपण सविस्तर उत्तर द्यावे.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, आपण केलेली सूचना मान्य आहे. मा.सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावना योग्य आहेत. एकंदरितच हा प्रश्न गेल्या अनेक वर्षापासून या ना त्या कारणाने प्रलंबित होता. यासंबंधी एक समितीही शासनाने गठित केली होती आणि त्या समितीने शासनाकडे काही शिफारशी केल्या होत्या त्याही शासनाच्या विचाराधीन होत्या. हा प्रश्न सातत्याने या सदनामध्ये उपस्थित होऊन त्यावर चर्चाही झालेली आहे. या प्रश्नाबाबत या सदनाच्या भावना अतिशय तीव्र राहिल्या आहेत. मोडकळीस आलेल्या इमारतींसंबंधी आज जे धोरण आहे त्या धोरणामुळे या इमारतींचे काम कधीच पूर्ण होणार नाही म्हणून मंत्रिमंडळाने एक योजना मान्य केली आणि त्या योजनेचा एकत्रित जी.आर.आम्ही दिनांक 1.6.2005 रोजी प्रसिध्द केलेला आहे. त्यामुळे अशाप्रकारचे उत्तर आलेले आहे. संपूर्ण जी.आर.उत्तराच्या रुपाने देणे शक्य नव्हते. म्हणून अशाप्रकारचे त्रोटक उत्तर आलेले आहे. आणखी त्यामध्ये थोडेसे सविस्तर उत्तर यावयास पाहिजे होते या सदनाच्या भावनांशी मी सहमत आहे. आपल्याला पाहिजे असल्यास हा प्रश्न राखून ठेवावा. दिनांक 1.6.2005 चा जी.आर.सर्व मा.सदस्यांना वितरित करण्यात येईल. त्याचा मा.सदस्यांनी अभ्यास करावा आणि पुन्हा हा प्रश्न उपस्थित करावा. (अडथळा) काहीही आडकाठी न ठेवता मा.सदस्यांऐवजी मी स्वत:हून हा प्रश्न राखून ठेवण्यात यावा असे सांगत आहे. परंतु या प्रश्नाला अधिक व्यापक उत्तर देणे शक्य नव्हते आणि एवढया मार्जीनमध्ये ते उत्तर बसले नसते. या उत्तराला जी.आर.जोडून देऊ, मा.सदस्यांनी त्याचा अभ्यास करावा आणि पुन्हा प्रश्न विचारावा.

सभापती : मा.मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे मी हा प्रश्न राखून ठेवत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मौजे माजिवडे (जि.ठाणे) येथे ७/१२ उताऱ्यावर शासकीय जागेवरील फिरंगी धर्माचे देऊळ ऐवजी सेंट जॉन दि बॉप्टीस चर्च ट्रस्ट अशी नोंद केल्याबाबत

(५) * ५५८१ श्री. अनंत तरे , डॉ. दीपक सावंत , श्री. दिवाकर रावते : सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील □ाय :-

(१) मौजे माजिवडे (ता.जि.ठाणे) येथील सर्व्हे क्र.१८९, हिस्सा २ पैकी अ या शासकीय जागेवरील फिरंगी धर्माचे देऊळ या ऐवजी सेंट जॉन दि बॉप्टीस चर्च ट्रस्ट या नावाची ७/१२ उताऱ्यावर नोंद करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे ५ एकर पेक्षा जास्त असलेल्या भूखंडाचे गैरव्यवहाराने हस्तांतर करण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, अहवाला प्रमाणे शासनाने काय कार्यवाही केली आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे, श्री. विलासराव देशमुज यांच्याकरिता : (१) होय.

(२), (३) व (४) यात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले नाही.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, प्रश्न भाग एकच्या उत्तरामध्ये मी आपल्या अनुमतीने दुरुस्ती करु इच्छितो. यामध्ये "होय" असे म्हटले आहे याऐवजी "होय, तथापि सदरहू जमीन शासकीय नाही" असे वाचावे.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, हा गंभीर प्रकार आहे. फिरंगी धर्माचे देऊळ याऐवजी सेंट जॉन दि बॉप्टीस चर्च ट्रस्ट अशी नोंद 7/12 च्या उता-यावर झाली आहे. आता मंत्रिमहोदयांनी ही जमीन शासकीय नाही अशी दुरुस्ती केलेली आहे. परंतु 1654 मध्ये फिरंगी धर्माचे देऊळ अशी नोंद लागलेली असताना याऐवजी सेंट जॉन दि बॉप्टीस चर्च ट्रस्ट अशी 7/12 मध्ये नोंद कशी आली याबाबत गेल्या सहा महिन्यापासून तहसीलदार कार्यालयामध्ये विचारणा केलेली असताना त्यांच्याकडून काहीही माहिती मिळाली नाही. शासकीय रेकॉर्डमध्ये सेंट जॉन दि बॉप्टीस चर्च ट्रस्टचे नाव कसे लागले ? हा बदल 1976 साली करण्यात आलेला आहे. सीआरपीसीच्या कलम 147 च्या अनुषंगाने हे नाव लागल्याचे म्हटलेले आहे. मग सीआरपीसीमध्ये असलेल्या तरतुदीनुसार जमिनींचे नाव बदलता येते काय ? या फेरफारामध्ये केस नंबर नाही, कोर्टाची ऑर्डर मागितली ती मिळत नाही, निकाल कोणाच्या बाजुने लागला त्याचा तपशील मिळत नाही, हा ट्रस्ट रजिस्टर्ड आहे. त्यांच्याकडे या जमिनीची नोंद नाही आणि एक ट्रस्टची जागा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

श्री.अनंत तरे..... ता.प्र.क्र.5581....

दुस-या ट्रस्टला दिल्याची नोंद नाही. म्हणून या संपूर्ण प्रकरणाच्या माहितीची सहा महिन्यापूर्वी आमदार म्हणून तहसीलदार कार्यालयाकडे मागणी केली असताना त्यांच्याजवळ त्याचे रेकॉर्ड नाही असे सांगितले गेले. फिरंगी धर्माचे देऊळ या ऐवजी सेंट जॉन दि बॉप्टीस चर्च ट्रस्ट असे नाव लागले कसे ? 1966 साली एका मालकाची असलेली जमीन शासनाच्या आदेशामुळे ट्रान्सफर झाली होती. फिरंगी धर्माचे देऊळ याऐवजी सेंट जॉन दि बॉप्टीस चर्च ट्रस्ट असे नाव ट्रान्सफर कसे झाले ?

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.5581 पुढे सुरु...) (श्री. अनंत तरे पुढे सुरु...)

माझा प्रश्न असा आहे की, सचिव पातळीवर या प्रकरणी चौकशी करुन ज्या अधिका-यांनी शासकीय जमिनीवर शासनाच्या संबंधित खात्याचे आदेश नसताना अशा प्रकारे फेरफार केला त्या अधिका-यांवर कारवाई करुन केलेली नोंद रद्दबातल करणार काय ? त्याठिकाणी असलेल्या जानकादेवीच्या पुरातन अशा मंदिराकडे जाणारा वहिवाटीचा रस्ता बंद केलेला आहे. हा रस्ता खुला करणार काय ? तसेच त्या जागेवर झालेल्या अनधिकृत बांधकामाची चौकशी करुन कारवाई करणार काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सर्व्हे क्रमांक 188, 189(2) आणि 192(3) हे एकूण क्षेत्र 3 हेक्टर 72 आर इतके आहे. 1973 साली फिरंगी धर्माचे देऊळ याच्याशी संबंधीत असलेल्या लोकांनी सेंट जॉन दि बॉप्टीस चर्च या नावाने ही नोंद करावी अशा प्रकारचे प्रकरण दाखल केले. त्यानंतर तक्रार करण्यात आली. परंतु ही तक्रार कोणी केली त्याची माहिती शासनाकडे उपलब्ध नाही. परंतु तक्रार करण्यात आलेली होती ही वस्तुस्थिती आहे. या प्रकरणी 12.7.76ला निकाल लागला. 28.6.77ला नोंद मंजूर करण्यात आली. परंतु नोंदीची अंमलबजावणी 20 वर्षे झालेली नव्हती ही देखील गोष्ट खरी आहे. 20 वर्षानंतर सेंट जॉन दि बॉप्टीस चर्च ट्रस्ट यांनी 6.6.97ला फेरफाराबाबत अंमलबजावणी करण्यासंबंधी कळविले आणि 6.6.1997 पासून सेंट जॉन दि बॉप्टीस चर्च या नावाने जमिनीची नोंद झालेली आहे. चर्चला शासकीय जमीन दिली अशातला भाग नाही. मा. सदस्यांनी या प्रकरणी सचिव पातळीवर चौकशी करण्याची मागणी केली. परंतु या प्रकरणी तशी चौकशी करण्याची आवश्यकता वाटत नाही, कारण ती चर्चचीच जमीन आहे. त्यांनी नाव बदलले आहे ही वस्तुस्थिती आहे.

श्री. नितीन गडकरी : ही जमीन 7/12 च्या उता-यावर चर्चच्या नावे लागण्यापूर्वी या जमिनीवर कोणाची मालकी होती ? ठाण्याच्या विकास आराखड्यामध्ये ही जमीन उद्यानाकरिता आरक्षित केलेली होती काय ? असेल तर ज्यावेळी हा फेरफार केला त्यावेळी आरक्षण बदलण्याच्या संदर्भात नगरविकास खात्याची परवानगी घेतली होती काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.5581 पुढे सुरु...)

डॉ. राजेंद्र शिंगणे : ही शासकीय जमीन नव्हती. ही जमीन सेंट जॉन दि बॉप्टीस चर्च या नावाने लागण्याच्या अगोदर फिरंगी धर्माचे देऊळ या नावाने लागलेली होती. सदर जमीन ही सेंट जॉन दि बॉप्टीस चर्च या नावाने नोंद करावी अशी त्यांनी विनंती केली आणि ती विनंती मान्य करण्यात आली. ही शासकीय जमीन नसून चर्चच्या मालकीची जमीन आहे.

श्री. नितीन गडकरी : ही जमीन उद्यानाकरिता आरक्षित केलेली होती काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : अशा पध्दतीचे कोणतेही आरक्षण त्या जमिनीवर नव्हते.

डॉ. अशोक मोडक : सदनामध्ये मा.मुख्यमंत्री आहेत ही चांगली गोष्ट आहे. ठाण्यातील वर्तक नगरमध्ये ख्रिश्चन मिशन-यांचे काय चाळे चाललेले आहेत याकडे लक्ष द्यावे. वर्तक नगरमध्ये दोन ख्रिश्चन मिशनरी घुसले. त्यांनी तसबिरी फोडल्या...

श्री. जितेंद्र आव्हाड : माझा हरकतीचा मुद्दा आहे. हा प्रश्न मूळ प्रश्नाला धरुन नाही. हा प्रश्न अप्रस्तुत आहे.

(विरोधी पक्षाचे काही मा.सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती : मा.सदस्यांनी मूळ प्रश्नाच्या अनुषंगाने प्रश्न विचारावा.

डॉ. अशोक मोडक : वर्तक नगरमध्ये घडलेल्या घटनेचा उल्लेख मी केलेला आहे. वर्तक नगरमध्ये ख्रिश्चन मिशन-यांचे चाळे कसे चालले आहेत याचा उल्लेख मी केलेला आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5581...

डॉ.अशोक मोडक...

केवळ आपण ठाण्यात राहतात म्हणून सगळे काही कळते अशा भ्रमात सन्माननीय सदस्यांनी राहू नये. सभापती महोदय, या ठिकाणी उद्यानासाठी आरक्षित जमीन होती असा महानगरपालिकेच्या आराखडयामध्ये उल्लेख आहे असे माझे म्हणणे आहे, याबाबतीत माननीय मंत्र्यांनी खुलासा करावा. माननीय राज्यमंत्री मघाशी बोलले की, जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करण्यात आली होती. सभापती महोदय, जिल्हाधिकारी यांच्याकडून तक्रारीची दखलही घेतली जात नाही आणि या उत्तरात तक्रारीचा कुठेही उल्लेख दिसून येत नाही. माझी या प्रश्नाच्या निमित्ताने मागणी अशी आहे की, माननीय मंत्र्यांनी या संदर्भातील पुन्हा माहिती घ्यावी. ही जमीन जर उद्यानासाठी आरक्षित असेल व त्या जमिनीवर अशा प्रकारे अतिक्रमण होत असेल तर या संदर्भात सरकार काय दखल घेणार आहे असा माझा पहिला प्रश्न आहे? जिल्हाधिकारी यांच्याकडे जानकाई उत्कर्ष मंडळाने सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांच्या नेतृत्वाखाली तक्रार केली होती ही गोष्ट माननीय मंत्री महोदयांनी मान्य केलेली आहे. परंतु त्या तक्रारीची दखल अद्याप घेतली गेलेली नाही. सरकार कोणाला पाठिशी घालते आहे की काय असा माझा दुसरा प्रश्न आहे ? सभापती महोदय, तक्रारीची दखल घेतली जात नाही, तक्रारीची आपल्याकडे पोच नाही, या ठिकाणच्या जागेवर अतिक्रमण झाले आहे याचा उल्लेख येथे करण्यात आलेला नाही तो का करण्यात आलेला नाही ? या तिन्ही प्रश्नांचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी तातडीने करावा.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, 1931-32 या वर्षापासून फिरंगी धर्माचे देऊळाच्या नावाने त्या ठिकाणची जमीन आहे. सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी जमिनीच्या बाबतीत ज्यांचा नावाचा उल्लेख केला आहे. त्या जमिनीचा सर्व्हे नंबर 189 (4) असा आहे. 15 गुंठयाच्या जागेवर सदर मंदिर बांधण्यात आलेले आहे. सदर जागेच्या संदर्भातील तसेच त्या मंदिरात जाण्याच्या रस्त्याच्या संदर्भातील प्रश्न या ठिकाणी निर्माण झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी केलेल्या रस्त्याच्या मागणीचा तसेच सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी ही जागा उद्यानासाठी राखीव आहे काय अशा प्रकारची माहिती विचारली आहे या दोन्ही बाबींच्या संदर्भात निश्चितपणे चौकशी केली जाईल आणि त्या संदर्भात योग्य ती कार्यवाही केली जाईल.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5581...

डॉ. अशोक मोडक : सन्माननीय सदस्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे त्याची आपल्याकडे पोच सुध्दा नाही.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सन्माननीय सदस्यांनी तक्रार केलेली आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, हा भूखंड महानगरपालिकेने उद्यानासाठी आरक्षित केला आहे अशा प्रकारची सन्माननीय सदस्यांनी तक्रार केलेली आहे. त्या तक्रारीची पडताळणी माननीय मंत्री महोदय करतील काय ? सदर भूखंडावर जेवढी बांधकामे झालेली आहेत ती अधिकृत आहेत काय ? सभापती महोदय, या भूखंडावर अनधिकृत बांधकामे मोठया प्रमाणात झालेली आहेत. जानकाई देवीच्या मंदिराच्या परिसरात नवरात्रामध्ये मोठा उत्सव होत असतो. परंतु या मंदिराकडे जाण्याचे रस्ते अनधिकृत बांधकाम करणा-यांनी बंद करुन ठेवलेले आहेत. सदर जमिनीबाबत संबंधित तहसिलदारांकडे रेकॉर्ड उपलब्ध आहे. या भूखंडावर जी बांधकामे झालेली आहेत ती अनधिकृत आहेत. सदर भूखंडावरील अनधिकृत बांधकामे हटविण्यात येतील काय ? तसेच या मंदिरात जाण्यासाठी रस्ता उपलब्ध करुन देण्यात येईल काय ? हा भूखंड महानगरपालिकेने उद्यानासाठी आरक्षित ठेवला होता काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, याबाबतची माहिती मी अगोदरच सभागृहात सांगितली आहे.हा भूखंड उद्यानासाठी राखीव ठेवण्यात आला होता काय याबाबतची निश्चितपणे चौकशी करण्यात येईल. या भूखंडावर अनधिकृत बांधकामे झाली असतील तर त्या अनुषंगाने देखील चौकशी करण्यात येईल. या मंदिराकडे जाण्यासाठी वहिवाटीचा रस्ता उपलब्ध आहे. परंतु संबंधित चर्चच्या ट्रस्टच्या जागेमधून रस्ता तयार करण्यात यावा यासंबंधीची मागणी करण्यात आलेली आहे. ही मागणी सध्या एस.डी.ओ. यांच्याकडे प्रलंबित आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, सदर भूखंडाच्या डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये कुठलाही रस्ता प्रस्तावित केलेला नाही, असे असताना ठाणे महानगरपालिकेने या मैदानाकडे जाण्यासाठी 16 फुटाचा पूल बांधलेला आहे. या मैदानाच्या बाजूला साडेचार हजार विद्यार्थी शिकतात एवढी मोठी शाळा त्या ठिकाणी आहे. या साडेचार हजार विद्यार्थ्यांमध्ये 100 विद्यार्थी ख्रिश्चन धर्माचे, 50 विद्यार्थी बौध्द धर्माचे आणि उर्वरित विद्यार्थी हिंदू धर्माचे आहेत. या ठिकाणी 16 फुटाचा पूल झाला आहे त्यामुळे वाहनांचे येण्या-जाण्याचे प्रमाण वाढलेले आहे. मध्यंतरी या पुलावर दोन अपघात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5581...

श्री.जितेंद्र आव्हाड...

होऊन दोन विद्यार्थ्यांना इजा झालेली आहे. या भूखंडास जोडण्यासाठी जो अनधिकृत पूल बांधला गेलेला आहे तो पूल निष्कासित केला जाईल काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी बाब निदर्शनास आणून दिली आहे ती तपासून घेतली जाईल व त्या अनुषंगाने कार्यवाही केली जाईल.

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 5581 पुढे सुरु ...

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, माझ्या मूळ प्रश्नांचे उत्तर शासनाकडून आलेले नाही. या जमिनीवर फिरंगी धर्माचे देऊळ कसे आले याचे रेकॉर्ड मिळत नाही याची शासन चौकशी करणार आहे काय ? कारण ही शासकीय जमीन आहे. त्याचप्रमाणे या ठिकाणी जो वहिवाटीचा रस्ता आहे तो मोकळा करुन देण्यात येईल काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, रस्त्याच्या बाबतीत मी यापूर्वीच सांगितले आहे. फिरंगी धर्माचे देऊळ हे नांव खाजगी असू शकते. 7/12 उता-यावर पूर्वीपासूनच होते. महसूली रेकॉर्ड अस्तित्वात आल्यापासून फिरंगी देऊळाचे नांव होते. ही शासकीय जमीन नाही.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ब्रम्हपूरी (जि.सोलापूर) परिसरातील शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम मिळण्याबाबत

(६) * ६३३१ श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , प्रा. फौजीया खान , श्री. विनायकराव मेटे , श्री. जितेंद्र आव्हाड : सन्माननीय कृषी मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हपूरी (जि.सोलापूर) परिसरातील शेतकऱ्यांना बँक ऑफ महाराष्ट्राकडून अद्याप पीक विम्याची रक्कम मिळालेली नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रक्कम न मिळण्याची सर्वसधारण कारणे काय आहेत,

(३) उक्त परिसरातील शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम किती कालावधीत देण्यात येईल ?

राणा श्री. जगजितसिंह पाटील,श्री. बाळासाहेब थोरात,यांच्याकरिता : (१) होय.

(२) रब्बी हंगाम २००३-२००४ मध्ये बिगर कर्जदार शेतकऱ्यांचे प्रस्ताव बँक ऑफ महाराष्ट्रने कृषि विमा कंपनीकडे पाठविले होते. तथापि, त्या प्रस्तावामध्ये काही त्रुटी असल्यामुळे ते प्रस्ताव दुरुस्त करुन परत सादर करण्यासाठी कृषि विमा कंपनीने बँकेकडे पुन्हा पाठविले होते. परंतु बँकेने सदरचे प्रस्ताव विहित मुदतीत कृषि विमा कंपनीकडे सादर केले नाहीत. त्यामुळे कृषि विमा कंपनीने ते प्रस्ताव विम्या हप्त्यासह बँकेस परत केले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या रकमेस विमा संरक्षण प्राप्त झालेले -ाही.

(३) सदर रक्कमेस विमा संरक्षण नसलेमुळे योजनेच्या निकषानुसार कृषि विमा कंपनीकडून नुकसान भरपाई देय होत नाही.

श्री. विनायकराव मेटे : सभापती महोदय, उत्तरामध्ये बॅकने प्रस्ताव पाठविले त्यामध्ये त्रृटी होत्या असे म्हटले आहे. शेतक-यांना पीक विम्याचे पैसे न मिळण्याचे कारण म्हणजे बँकेने विमा कंपनीकडे वेळेवर प्रस्ताव पाठविले नाहीत. माझा प्रश्न असा आहे की, बँकेने विमा कंपनीकडे वेळेवर प्रस्ताव का पाठविले नाहीत ? या प्रकरणामध्ये बँक आणि विमा कंपनी यापैकी विम्याचे पैसे शेतक-यांना वेळेवर न मिळण्यासाठी कोण जबाबदार आहे ? या शेतक-यांना शासन काही मदत करणार आहे काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, ३१ जानेवारी २००४ अखेरपर्यंत प्रस्ताव यायला हवे होते. कृषि विमा कंपनीकडे ते ४ फेब्रुवारीपर्यंत पोहोचले. या प्रस्तावांची छाननी केल्यानंतर कृषि विमा कंपनीने सगळे प्रस्ताव परत बँकेकडे पाठवून दिले. त्यामध्ये काही त्रृटी होत्या. बँकेने त्या त्रृटी दूर करुन प्रस्ताव परत पाठविणे आवश्यक होते. काही कारणांमुळे प्रस्ताव वेळेवर पोहोचले नाहीत त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. बँकेचे म्हणणे असे आहे की जे काही प्रस्ताव परत पाठविले ते आम्हांला मिळाले नाहीत. राष्ट्रीय कृषी विमा कंपनीच्या गाईड लाईन्समध्ये असे म्हटले आहे की, In case of any person deprived of any benefit .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ६३३१ पुढे सुरु...

राणा श्री. जगजितसिंह पाटील...

नोडल बँकेची जबाबदारी राहील. त्याचप्रमाणे" It shall make good of such losses" शासन स्तरावर प्रधान सचिव(कृषी) यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पातळीवर बँकर्स कमिटी आहे. हे पैसे बँक ऑफ महाराष्ट्र कडून मिळविण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रस्ताव वेळेवर पाठविला नाही तो का पाठविला नाही आणि ही जबाबदारी कोणाची ? ३१ जानेवारी अखेरपर्यंत प्रस्ताव पाठविणे आवश्यक होते. परंतु ते ४ फेब्रुवारीला पाठविले. प्रस्ताव वेळेवर न मिळाल्यामुळे शेतक-यांचे नुकसान झालेले आहे. म्हणून संबंधितांवर कारवाई झाली पाहिजे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, २७ जानेवारीला बँकेने प्रस्ताव पाठविले. परंतु पोस्टल डिले झाल्यामुळे विमा कंपनीला प्रस्ताव मिळाले नाहीत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ३१ जानेवारी पर्यंत प्रस्ताव जाणे आवश्यक होते. ४ फेब्रुवारीला प्रस्ताव मिळाले असे सांगितले आणि आता पोस्टामुळे उशीर झाला असे मंत्रीमहोदय सांगत आहेत.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, ३१ जानेवारीपर्यंत प्रस्ताव मिळणे आवश्यक होते. जबाबदारी बँकेची होती. बँकेने २७ जानेवारीला प्रस्ताव पाठविले. विमा कंपनीला ते ४ फेब्रुवारीला मिळाले.म्हणजे उशीर झालेला आहे. बँकेने उशीर क्षमापित केला. विमा कंपनीने देखील क्षमापित केला.त्यानंतर ४ फेब्रुवारीला प्रस्ताव परत पाठवून त्रूटी बँकेला कळविण्यात आल्या आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, उत्तरामध्ये सांगितले की, बँकेने प्रस्ताव पोस्टाने पाठविले ते उशिरा पोहोचले. बँकेने उशीर क्षमापित केला असेही आपण सांगितलेले आहे.

अशुद्धीरत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. गायकवाड ...

ता.प्र.क्र.6331..

श्री.राणा जगजितसिंह पाटील :मी आपल्याला वस्तुस्थिती सांगतो. यामध्ये केवळ जानेवारी आणि फेब्रुवारी या दोन महिन्यांचा विषय नाही. चार फेब्रुवारीला ॲग्रिकल्चरल इन्शुरन्स कंपनीकडे प्रस्ताव गेला होता त्यानंतर त्यांनी या प्रस्तावाची छाननी केली आणि त्यात ज्या काही त्रुटी होत्या त्या त्यांनी परत बॅकेकडे पाठविल्या होत्या. बॅन्केकडून त्रुटी दुरुस्त करुन यावयास पाहिजे होत्या परंतु त्या आलेल्या नाहीत .

प्रा.बी.टी.देशमुख : बॅन्केने प्रस्ताव पाठवावयास पाहिजे होता असा नियम आहे परंतु त्यांनी तो उशिराने पाठविला असून हा डिले त्यांनी कन्डोन केला आहे.या मध्ये परस्परामध्ये पोस्टल डिले झाला आहे असे म्हणणे काही बरोबर नाही कारण त्यात शेतक-यांचा कोणताही दोष नाही तेव्हा या संदर्भात जो काही नियम आहे तो माननीय राज्यमंत्र्यांनी वाचून दाखविलेला आहे .ही सर्व जबाबदारी त्या बॅकेची आहे....

सभापती : माननीय राज्यमंत्र्यांनी मघाशी असे उत्तर दिले होते की, या बाबतीत जर शेतक-यांवर अन्याय होत असेल आणि शेतक-यांचे हक्क हिरावून घेतले जात असतील तर ही रक्कम त्यांना मिळवून देण्याकरता कृषी विभागाचे प्रधान सचिव यामध्ये लक्ष घालतील आणि बॅन्केकडून शेतक-यांना नुकसान कशी मिळेल याची व्यवस्था करतील.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हा विषय सभागृहासमोर आल्यानंतर आणि त्या संदर्भात आपण सांगितल्याप्रमाणे कृषी विभागाचे प्रधान सचिव यामध्ये लक्ष घालतील तसेच शेतक-यांना पीक विम्याची रक्कम मिळवून देण्यासबंधी कार्यवाही करतील परंतु यासाठी निश्चित अशी कालमर्यादा घालून दिली जाणार आहे काय ?

श्री.राणा जगतिजसिंह पाटील : कृषी विभागाचे प्रधान सचिव सात दिवसात चौकशी करतील आणि त्यानंतर या सबंधीचा फॉलोअप केला जाईल.

सभापती : माननीय राज्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की,सात दिवसात प्रधान सचिवांनी यासंबंधीची चौकशी पूर्ण करावी. कोणत्याही परिस्थितीमध्ये या शेतक-यांना पीक विम्याचे पैसे मिळाले पाहिजेत व त्या दृष्टीने पॉझिटीव्ह प्रयत्न करणे आवश्यक आहे अशी सभागृहाची भावना आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : एक दोन महिन्यात हे काम केले जाईल असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6331..

श्री.राणा जगजितसिंह पाटील :सभापती महोदय, निश्चित असा कालावधी आताच सांगणे कठीण आहे.मी त्या बाबतीत एवढेच सांगतो की प्रिमियमच्या रकमे व्यतिरिक्त जी रक्कम देय असते तिचा 50 टक्के हिस्सा राज्य सरकार देते, हा 50 टक्के हिस्सा राज्य सरकार द्यावयास तयार आहे. उरलेली 50 टक्के रक्कम ही केन्द्र सरकारकडून दिली जाते तेव्हा बॅन्केकडून काही अडचण आली तर उरलेल्या 50 टक्के रकमेच्या संदर्भात केन्द्र सरकारकडे पाठपुरावा केला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वसई जि. ठाणे येथे दुय्यम निबंधक कार्यालयाची संख्या वाढविण्याबाबत

(७) * ५५८२ डॉ. अशोक मोडक , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्रीमती कांता नलावडे , श्रीमती संजीवनी रायकर , श्री. रामनाथ मोते , श्री. नितीन गडकरी : सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई तालुक्यात (जि. ठाणे) दुय्यम निबंधक कार्यालये केवळ तीनच असल्यामुळे नोंदणीसाठी येणाऱ्या नागरिकांना तीन तीन दिवस तिष्ठत रहावे लागत असून, परिणामी आपला नंबर लवकर लाजावा यासाठी त्यांना भ्रष्टाचारी मार्गाचा अवलंब करावा लागत असल्याचे माहे मे, २००५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुय्यम निबंधक कार्यालयांची संख्या तात्काळ वाढवावी, नोंदणी करणाऱ्यांची संख्या आणि सिझन पाहून सुट्टीच्या दिवशीही कार्यालये सुरु ठेवावीत, सुरुवातीचे नंबर राखून ठेवणाऱ्या दलालांना आवर घालावा व त्यांना मदत करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी विरारच्या नागरिकांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?

डॉ.राजेद्र शिंगणे,श्री. विलासराव देशमुज : (१) वसई तालुक्यात (जि.ठाणे) तीन दुय्यम निबंधक कार्यालये आहेत, हे खरे आहे. परंतु नोंदणीसाठी भ्रष्टाचार होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) अशा स्वरुपाची तक्रार, निवेदन प्राप्त झालेले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय,या प्रश्नाचे उत्तर जर आपण वाचले तर आपल्या असे लक्षात येईल की, या बाबतीत तक्रार आलेली नाही वा अर्ज आलेला नाही असे त्यात म्हटलेले आहे. वादाकरता आपण ते मान्य करु परंतु वसई तालुक्यात दुय्यम निबंधकाची तीनच कार्यालये असून ती कमी आहेत हे तर मंत्रिमहोदयांना मान्य आहे ना ? ज्याला आपण इंग्रजीतून स्पील ओव्हर इफेक्ट म्हणतो त्या प्रमाणे मुंबई शहरात लोकांची जास्त गर्दी झाली की त्याचे दुष्परिणाम ठाणे, डोंबिवली, कल्याण या सारख्या शहरांना भोगावे लागतात. मुबईत गर्दी वाढली की तेथील लोक डोंबिवली, ठाणे व कल्याण या भागात जाणार आणि स्वाभाविकच त्या भागात दुय्यम निबधकाच्या कार्यालयाची जास्त आवश्यकता आहे.मी माननीय मंत्रिमहोदयांचे लक्ष प्रश्नाच्या दुस-या परिच्छेदाकडे वेधू इच्छितो. त्यात असे म्हटलेले आहे की,दुय्यम निबंधक कार्यालयाची संख्या

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तात्काळ वाढवावी, नोंदणी करणा-यांची संख्या आणि सिझन पाहून सुट्टीच्या दिवशीही कार्यालये सुरु ठेवावीत, सुरुवातीचे नंबर राखून ठेवणा-या दलालांना आवर घालावा व त्यांना मदत करणा-या कर्मचा-यांवर कारवाई करावी अशी मागणी विरारच्या नागरिकांनी शासनाकडे केलेली आहे लेखी मागणी आपल्याकडे केलेली नसेल परंतु त्यांनी अशी मागणी केलेली आहे तेव्हा याबाबतीत सरकारचे काय धोरण आहे ?

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5582 ...

डॉ. राजेंद्र शिंगणे : माननीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी वसई तालुक्यातील हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. खरे म्हणजे या वसई तालुक्यात जी तीन कार्यालये आहेत त्यापैकी वसई 1 आणि वसई 2 ही कार्यालये विरार भागामध्ये येतात आणि वसई 3 हे कार्यालय नालासोपारा मध्ये येते. या तिन्ही कार्यालयांमध्ये एप्रिल आणि मे महिन्यामध्ये जी दस्त नोंदणी झालेली आहे त्यांची संख्यावार माहिती माझ्याकडे आताही उपलब्ध आहे. एप्रिल महिन्यामध्ये वसई 1 कार्यालयामध्ये 670 दस्त नोंदविले गेले असून त्यांची सरासरी 32 होते. वसई 2 कार्यालयामध्ये 664 दस्त नोंदले गेले आणि तेथील सरासरी देखील 32 इतकीच आहे. तर वसई 3 मध्ये 851 दस्त नोंदले गेले असून त्यांची सरासरी 40 आलेली होती. याच प्रमाणे मे महिन्यामध्ये जी दस्त नोंदणी या तिन्ही कार्यालयांमध्ये झालेली आहे त्यांचीही संख्या माझ्याकडे आहे. त्यानुसार अनुक्रमे 31, 28 आणि 38 इतक्या सरासरीने या तिन्ही कार्यालयांमध्ये दस्त नोंदणी झालेली आहे. आता आपली मागणी अशी आहे की, या तालुक्यातील वाढत्या लोकवस्तीमुळे तेथील दस्त नोंदणी कार्यालये वाढविली गेली पाहिजेत. खरे म्हणजे आता आपण सर्वत्र संगणकीकृत दस्त नोंदणी सुरू केलेली असल्याने दररोज एका दिवसामध्ये कमीत कमी 40 दस्त नोंदणी करणे शक्य झालेले आहे. सकाळी 10 ते सायंकाळी 7 वाजेपर्यंतच्या या कालावधीमध्ये ही दस्तनोंदणी होत असते आणि मी आताच सांगितल्याप्रमाणे जवळपास दररोज 40 दस्तांची नोंदणी या कार्यालयांमधून होत आहे. त्यामुळे येथे दस्त नोंदणी करण्यासाठी येणाऱ्या लोकांची गैरसोय होते आहे अशातील भाग नाही. तेव्हा वसई भागामध्ये दुय्यम निबंधकांची कार्यालये वाढविणे गरजेचे झाले आहे असे काही यातून दिसून येत नाही. ..

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, माझी माननीय राज्यमंत्र्यांना विनंती आहे की, आपण कृपा करून पुन्हा हे तपासून पहावे. वसई, विरार आणि विशेष करून नालासोपारा या भागामध्ये ज्या प्रमाणात लोकवस्ती वाढत चालली आहे त्यामुळे जवळपास सगळ्याच सरकारी कार्यालयांतील कामाचे प्रेशर वाढत चालले आहे. खरे तर ठाणे विभागामध्येच या दृष्टीने कार्यवाही व्हायला पाहिजे होते. तेव्हा आपण कृपा करून अधिक तपास करावा. कदाचित आपल्यालाही पटेल की, त्या भागामध्ये दुय्यम निबंधकांची कार्यालये वाढविली पाहिजेत किंवा त्या कार्यालयांची कार्यक्षमता तरी वाढविण्याची गरज आहे.

..... एल 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5582 ...

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, वसई भागामध्ये आवश्यकता भासल्यास जरूर तशी कारवाई करण्यात येईल.

****

..... एल 3 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ज ल्याज डोंबिवली महा-ाजर पालिजे त माजासवर्जीयांच्या 237 पदावर बिजर माजासवर्जीयांची भरती ज रज्यात आली असू-ा भरती प्रक्रियेत झालेल्या जैरप्रज ाराबाबत

(8) * 7155 प्रा. जोजेंद्र ज वाडे, श्री. रमेश ि-ज ोसे, श्री. जितेंद्र आव्हाड : स-मा-ा-नीय मु□य मंत्री पुढील □ाष्टींचा □ुलासा □रतील □ाय :-

(1) ज ल्याज डोंबिवली महा-ाजर पालिजे त माजासवर्जीयांच्या 237 पदावर बीजर माजासवर्जीयांची भरती ज रज्यात आली हे जरे आहे ज ाय,
(2) असल्यास, माजासवर्जीय अ-ुशेष तत्वावरील भरती प्रक्रियेत प्रचंड जैरप्रज ार झालेला असल्याची माहिती शास-ास प्राप्त झाली हे जरे आहे ज ाय,
(3) असल्यास, यावर शास-ा-े ज ोजती ज ारवाई जे ली आहे वा ज रज्यात येत आहे ?

श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुज यांचेकरिता : (1) महा-ाजरपालिजे च्या अहवाला-ुसार हे जरे -ाही.
(2) -ाही. तथापि, याबाबत अधिज चौज शी ज रज्यात येत आहे.
(3) प्रश-ा उद्भवत -ाही.

प्रा. जोगेंद्र कवाडे : माननीय सभापती महोदय, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये मागासवर्गीयांच्या 237 पदांवर बिगर मागासवर्गीयांची करण्यात आलेली भरती या प्रश्नाबाबत जे उत्तर माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेले आहे त्यातील महापालिकेची माहिती किंवा अहवाल जो आहे तो अत्यंत चुकीचा आहे, दिशाभूल करणारा आहे, मागासवर्गीयांवर अन्याय करणारा आहे. या ठिकाणी उत्तर देताना माननीय राज्यमंत्र्यांनी म्हटले आहे की, 'महानगरपालिकेच्या अहवालानुसार हे खरे नाही.' तेव्हा माझा या संबंधात प्रश्न असा आहे की, या महानगरपालिकेचा जो परिवहन विभाग आहे, तो विभाग महापालिकेमध्ये येतो की नाही ? असेल तर या परिवहन विभागामध्ये जी मध्यंतरी 237 पदांवर बिगर मागासवर्गीयांची भरती करण्यात आलेली आहे त्यामुळे मागासवर्गीयांवर जो अन्याय झालेला आहे तो आपण दूर करणार आहात का ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, हे निश्चित आहे की, या महानगरपालिकेच्या परिवहन विभागामध्ये भरती झालेली आहे. परंतु या ठिकाणी प्रश्न विचारताना तो महापालिकेच्याबाबत विचारला आहे आणि परिवहन विभागामध्ये वेगळ्या प्रकारे भरती होत असल्यामुळे तसे उत्तर दिलेले आहे. सभापती महोदय, आता हेही खरे आहे की, परिवहन विभागामध्ये झालेल्या भरतीमध्ये अनियमितता जरूर झालेली आहे. तेथे बिंदू नामावलीनुसार जी काही पदे भरायला पाहिजे होती

..... एल 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे (पुढे चालू....) ता.प्र.क्र.7155 ...

ती भरली गेली नाहीत. त्यात काही पदांवर तशा प्रकारचे उमेदवार मिळाले नाहीत. त्यामुळे त्या जागी खुल्या किंवा इतर मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवार भरलेले आहेत. त्यामुळे जे कोणी तेथील नियुक्त प्राधिकारी आहेत ते निश्चित याबाबत दोषी आहेत. त्यामुळे याबाबत चौकशी केली जाईल आणि जे कोणी यामध्ये दोषी आहेत त्यांचेवर कारवाई केली जाईल.

(यानंतर श्री.जागडे ....एम 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, भारताला स्वातंत्र्य मिळून 50 वर्षे झाली. मागे 2002 मध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी मागासवर्गीयांचा अनुशेष दूर करण्याबाबतचा जी. आर. काढला. त्यानुसार प्रक्रिया सुरुही झाली होती. परंतु त्यावेळी काही लोक औरंगाबाद हायकोर्टात गेल्यामुळे या कार्यवाहीला स्टे मिळाला होता. कल्याण-डोंबिवली महानपालिकेने 237 पदांवर बिगर मागासवर्गीय उमेदवारांची भरती केली असेल तर मागासवर्गीयांचे काय ? म्हणून या बाबतची चौकशी शासन करणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : काही प्रमाणात निश्चित अशी भरती झाली आहे. मोठ्या प्रमाणात अशी भरती झालेली नाही. 10-15 पदे कमी जास्त झाली असतील तरी हे प्रकरण चौकशी करण्यासाठी पात्र आहे. त्यामुळे या बाबत योग्य ती सर्व चौकशी करुन कारवाई करण्यात येईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने शासनाची दिशाभूल करण्याचा या ठिकाणी प्रयत्न केला आहे. या ठिकाणी चुकीची माहिती देऊन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने मागासवर्गीयांवर केलेला अन्याय दडपण्याचा प्रयत्न केला आहे. सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये, पाणीपुरवठा, सार्वजनिक बांधकाम असे अनेक विभाग येत आहेत. त्याप्रमाणे प्रत्येक विभागानुसार या ठिकाणी माहिती देण्याची आवश्यकता होती. 237 पदे कोठेकोठे भरण्यात आली आहे, या बाबतची माहिती देण्यामध्ये महानगरपालिकेने कुचराई केली आहे. ज्या 237 पदांमध्ये बिगर मागासवर्गीयांची भरती करण्यात आलेली आहे, त्या ठिकाणी मागासवर्गीयांची भरती किती दिवसात करण्यात येणार आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सगळ्या पदांमध्ये बिगर मागासवर्गीयांची भरती झालेली नाही. काही काही पदामध्ये ही भरती झाली आहे. मागासवर्गीय उमेदवार न मिळाल्यामुळे बिगर मागासवर्गीय उमेदवार भरलेले असतील तर.....

(गोंधळ)

माझे म्हणणे प्रथम माननीय सदस्यांनी ऐकून घ्यावे. मागासवर्गीय उमेदवार मिळाला नसेल तर....

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

सभापती : प्रश्नोत्तराच्या तासामध्ये आपण हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी देत नाही. खास बाब म्हणून मी ही परवानगी माननीय सदस्यांना देत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी आता जे निवेदन केले आहे, ते त्यांनी दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे. पात्र मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध नसेल तर तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ पदातील मागासवर्गीय उमेदवाराची भरती केली पाहीजे. असा नियम आहे. परंतु मागासवर्गीय पदांमध्ये बिगर मागासवर्गीय उमेदवाराची भरती करणे चुकीचे आहे. तेव्हा या बाबतचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी जी वस्तुस्थिती सांगितली आहे, ती बरोबर आहे. पात्र मागासवर्गीय उमेदवार मिळत नसेल तर ते पद रिक्त ठेवावे. असे असतानाही या ठिकाणी काही अनियमितता झाली आहे. 100 टक्के पदांवर बिगर मागासवर्गीय उमेदवार भरलेले नाहीत. काही पदांवर बिगर मागासवर्गीय भरलेले आहेत. ही चूक झाली आहे. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी सचिव स्तरीय समिती करेल. त्यांचा अहवाल आल्यानंतर या प्राधिकरणावर उचीत कारवाई करण्यात येईल.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला.

--

(यानंतर श्री. सरफरे.....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. :
मु.शी. : **नियम 93 अन्वये सूचना.**

सभापती : माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी "दिनांक 10.7.2005 रोजी रात्री खापरखेडयाजवळ वीज वाहिनीचे दोन मनोरे चोरटयांनी कापल्यामुळे वीज पुरवठा खंडीत होणे, तसेच क्रमांक 21 च्या मनोऱ्याचे पाय व सपोर्ट कापल्यामुळे क्रमांक 20 चा मनोरा त्यावर पडून कोलार नदीजवळ मोठा स्फोट होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.
तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर व इतर यांनी "दिनांक 21 जून, 2005 रोजी राज्याचे माजी राज्यमंत्री श्री. दादा जाधवराव यांना सत्याग्रह केल्याबद्दल सासवड पोलिसांनी बेकायदेशीरपणे अटक करुन मानसिक छळ केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य श्री. व्ही. यु. डायगव्हाणे व इतर यांनी "राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाप्रमाणे 3 टक्के महागाई भत्ता वाढ अद्यापही न दिल्यामुळे अधिकारी/कर्मचारी व शिक्षक वर्गात पसरलेले असंतोषाचे वातावरण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.
तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य श्री. मधु चव्हाण व इतर यांनी "मुंबईतील सायन रुग्णालयातील हृदयविकार विभागात कायम स्वरुपी पेसमेकर बसविण्यास विलंब झाल्याने तीन रुग्णांचा झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य श्री. शरद पाटील व इतर यांनी "जूनच्या पहिल्या आठवडयात कोरेगाव जिल्हा सातारा जवळ जैन धर्मगुरुंना मांसाहार देण्याचा घडलेला निंदनीय प्रकार"या विषयावर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मा. सभापती...

□□□म 93 अ□ये सूच□ दिली आहे.तो □□□म 93 चा विषय होत □सल्या□, मी सूच□स अ□मती □□रीत आहे मात्र या विषयावर लक्षवेधी सूचना प्राप्त झाली असून ती स्वीकारण्यात आली आहे.

मा□□□य सदस्य श्री.विलास अवचट यां□ "महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाने मुंबईतील उपकर प्राप्त इमारतीच्या दुरुस्तीबाबत काढलेला अन्यायकारक शासन निर्णय रद्द करण्याबाबत" या विषयावर □□□म 93 अ□ये सूच□ दिली आहे.तो □□□म 93 चा विषय होत □सल्या□, मी सूच□स अ□मती □□रीत आहे मात्र या विषयावर शासनाने □□वेद□□□रावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याच्या मुद्दयासंबंधी.

कर्नल श्री. सुधीर सावंत : सभापती महोदय, मला एक औचित्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे.

सभापती : औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यासाठी परवानगी दिली जात नाही. परंतु अपवाद म्हणून मी आपणास परवानगी देतो. आपण दोन मिनिटांमध्ये आपले म्हणणे मांडावे.

कर्नल श्री. सुधीर सावंत : सभापती महोदय, 11 तारखेला संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयामध्ये माजी सैनिकांनी जिल्हा कार्यालयांवर मोर्चा काढला, धरणे धरले. माजी सैनिकांची एकच मागणी आहे की, स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या सैनिकांसाठी व माजी सैनिकांसाठी एक सवलत सरकारने दिली होती. त्याप्रमाणे कँटीन सर्व्हिसमध्ये त्यांना सेल्स टॅक्सची माफी मिळाली. परंतु राज्यामध्ये व्हॅट कायदा लागू झाल्यानंतर त्यामधून त्यांना सूट देण्यात आली नाही. हरयाणा, दिल्ली, पंजाब, तामिळनाडू या राज्यांनी माजी सैनिकांना कँटीन सर्व्हिसमध्ये व्हॅटमध्ये सूट दिली आहे. आणि म्हणूनच हे सभागृह नेहमीच सैनिक व माजी सैनिकांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहीले आहे, त्यांना प्रोत्साहन दिले आहे. आता या वर्षी 1 एप्रिलपासून व्हॅट लागू झाला आहे. हे सैनिक अत्यंत दुर्गम भागामध्ये रहातात. हिमालयाच्या शिखरावर रहातात. त्या ठिकाणी त्यांना व्हॅटमधून सूट मिळत नाही. त्या ठिकाणी त्यांना कोणतीही सुविधा उपलब्ध होत नाही अशा कठीण परिस्थितीमध्ये आपल्या सैनिकांना त्रास सहन करावा लागतो. म्हणून माझी आपणा मार्फत माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, ज्या प्रमाणे देशाच्या इतर राज्यांमध्ये सैनिकांना व माजी सैनिकांना व्हॅटमध्ये सूट देण्यात आली आहे त्याप्रमाणे आपल्या राज्यामध्ये देखील त्यांना व्हॅटमध्ये सूट देण्यात यावी. तशाप्रकारचे आश्वासन आपण द्यावे अशी या औचित्याच्या मुद्दयाच्या माध्यमातून विनंती करतो.

श्री. विलासराव देशमुख (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी औचित्याच्या मुद्दयाच्या माध्यमातून या ठिकाणी प्रश्न उपस्थित केला आहे. या संदर्भात त्यांनी यापूर्वी देखील माझ्याकडे एक निवेदन दिले आहे. त्याचप्रमाणे डिफेन्सच्या अधिकाऱ्यांनी देखील माझ्याकडे अशाच प्रकारचे निवेदन दिले आहे. ती बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. :नागपूर येथील जयभारत महिला शिक्षण संस्थेच्या उज्वल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी श्री.किशोर मसुरकर यांनी खोटे दस्तावेज तयार करुन लावलेली वर्णी.

मु.शी. :नागपूर येथील जयभारत महिला शिक्षण संस्थेच्या उज्वल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी श्री.किशोर मसुरकर यांनी खोटे दस्तावेज तयार करुन लावलेली वर्णी याबाबत श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री. रामनाथ मोते, प्रतापराव सोनावणे वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री रामनाथ मोते, प्रतापराव सोनावणे यां□ :नागपूर येथील जयभारत महिला शिक्षण संस्थेच्या उज्वल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी श्री.किशोर मसुरकर यांनी खोटे दस्तावेज तयार करुन लावलेली वर्णी" .या विषयावर □यम 93 अ□वये जी सूच□ दिली होती, तिला अ□नु□ आप□ □देश दिल्याप्रमा□ मला □वेद□ □रावयाचे आहे. □वेद□च्या प्रती सदस्यां□ अ□दरच वितरीत □लेल्या असल्या□मी हे □वेद□ सभा□हाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : □वेद□ सभा□हाच्या पटलावर ठेव□यांत आले आहे.

□वेद□

(प्रेस : येथे सोबतचे □वेद□ छापावे)

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, 11 तारखेला दिलेल्या 93 च्या सूचने बाबत शासनाकडून एवढया तातडीने उत्तर आले त्याबद्दल शासनाचे अभिनंदन करावे की यामध्ये काही चुकीची माहिती दिल्याबद्दल आणि शिक्षणाधिका-यांवर विश्वास ठेवल्याबद्दल खेद व्यक्त करावा असा माझ्यापुढे प्रश्न आहे. 1993 मध्ये श्री.मसूरकर यांची मुख्याध्यापक म्हणून नेमणूक झाली. 1990 मध्ये त्यांची शाळेत सहाय्यक शिक्षक म्हणून नेमणूक झाली होती. मुख्याध्यापक म्हणून नेमणूक करण्यासाठी अगोदरच्या कामाचा अनुभव असला पाहिजे. म्हणून खोटेच प्रमाणपत्र देण्यात आले की, डी.एड. कॉलेजमध्ये नोकरी केली आहे, एका माध्यमिक शाळेमध्ये नोकरी केली आहे आणि त्यानुसार त्यांची मुख्याध्यापक पदावर नेमणूक करण्यात आली. माझा पहिला प्रश्न असा आहे की, ही शाळा मॉयनॉरिटी आहे का ? पाच वर्षे नोकरी झाल्यावर सिनिॲरिटी डावलून कोणाचीही नेमणूक करता येते का ? याला ज्यांनी मान्यता दिली आहे, ते शिक्षणाधिकारी कोण आहेत ? त्यांनी अशी अट घातली होती की, शाळेने दिलेली माहिती चुकीची आढळल्यास मान्यता रद्द करण्यात येईल. तर याठिकाणी शाळेने चुकीची माहिती दिली आहे. 1993 पासूनची केस आहे. तेव्हा संबंधितांना तातडीने निलंबित करुन त्यांच्याकडून सर्व वसूली करणार आहात का ? तसेच त्यांचे नाव काय आहे ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांचा पहिला आरोप आहे की, शिक्षणाधिका-यांनी चुकीची माहिती दिली आहे. जर ही माहिती चुकीची असेल तर मी स्वत: यामध्ये लक्ष घालून त्यांच्यावर कारवाई करेन. तसेच मुख्याध्यापकांची नियुक्ती नियमबाहय झाली आहे असे सन्माननीय सदस्यांच्या बोलण्यातून जाणवते. तर ती बाब सुध्दा नियमानुसार झाली आहे का ? हे निश्चितच तपासून घेऊ. पण दिलेली माहिती तूर्त ग्राहय धरुन याठिकाणी उत्तर दिलेले आहे. तरीही याबाबतीत मी स्वत: लक्ष घालून योग्य ती कारवाई करेन.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी अत्यंत गंभीर असा प्रश्न उपस्थित केलेला आहे आणि या प्रश्नाला दिलेल्या उत्तरामध्ये शासनाने म्हटलेले आहे की, कोणत्याही प्रकारचे खोटे दस्तऐवज तयार करण्यात आले नाहीत. पण वस्तुस्थिती वेगळी आहे. या शिक्षकाची 1990 मध्ये नेमणूक झाली आणि 1993 मध्ये ते मुख्याध्यापक झाले. खरे म्हणजे मुख्याध्यापक होण्यासाठी पाच वर्षाचा अनुभव असणे आवश्यक

. . . .ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते . . . .

आहे आणि 1990 ते 1993 या काळामध्ये हा कालावधी पूर्ण होत नाही. तरी सुध्दा त्यांना 1993 पासून मान्यता मिळालेली आहे. त्यांनी डी.एड.कॉलेजमध्ये आणि माध्यमिक शाळेमध्ये काम केल्याचे प्रमाणपत्र दिलेले आहे. पण ज्या माध्यममिक शाळेमध्ये काम केल्याचे आणि डी.एड.कॉलेजमध्ये काम केल्याचे त्यांनी प्रमाणपत्र घेतलेले आहे, मुळात त्यांना मान्यता आहे का ? त्याठिकाणी त्यांनी काम केल्याबद्दल विभागाची मान्यता आहे का ? संबंधित शिक्षकाने बी.एस्सी.चे शिक्षण केव्हा पूर्ण केले ? त्यांना पदवी केव्हा मिळाली ? तसेच डी.एड.चे शिक्षण केव्हा पूर्ण केले ? 1993 मध्ये ते मुख्याध्यापक पदासाठी योग्य होते का ? याची माननीय मंत्री महोदय चौकशी करुन, ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणार आहे का ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, होय.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, मी मागच्या अधिवेशनात एका शिक्षण संस्थेबाबत प्रश्न विचारला होता. पण त्याबाबतीत अजून कारवाई झालेली नाही. तो प्रश्न अजूनही प्रलंबित आहे. आम्ही येथे जे प्रश्न उपस्थित करतो, त्याबाबतीत तातडीने कारवाई करणार आहात का ? नागपूर येथील "सई" शिक्षण संस्थेच्या बाबतीत काय कारवाई केली आहे, याची माहिती देखील या अनुषंगाने देण्यात यावी.

. . . .ओ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 अन्वयेच्या दुस-या निवेदनाबाबत

सभापती : नियम 93 अन्वयेच्या दुस-या निवेदनाबाबत माननीय मंत्री महोदयांनी अशी विनंती केली आहे की, या निवेदनावरील चर्चा आज ऐवजी उद्या घेण्यात यावी आणि मी त्याला परवानगी दिलेली आहे.

. . . .ओ- 4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मे 2005 रोजी सिडकोमार्फत बांधण्यात आलेली टाकी कोसळणे.

मु.शी.: पनवेल,जि.ठाणे येथील मोर्बी गावात दिनांक 27 मे 2005 रोजी सिडकोमार्फत बांधण्यात आलेली टाकी कोसळणे याबाबत श्रीमती सुधा जोशी, प्रा. फौजिया खान, सर्वश्री रमेश निकोसे, सुधाकर गणगणे, नतिकोद्दीन खतिब, सुधीर सावंत, संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करते.

"पनवेल, जि.ठाणे येथील मोर्बी गावात सिडकोने निर्माण केलेल्या वसाहतीत सुरळीत पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने सिडकोव्दारा दोन लाख लिटर क्षमतेची पाण्याची अजस्त्र टाकी बांधण्यात येणे, सदरहू टाकी बांधण्याकरिता दोन वर्ष लागणे व त्यावर लाखो रुपयांचा खर्च होणे, हया टाकीची प्राथमिक चाचणी करण्याकरिता तिच्यामध्ये पाणी भरण्यात आले असता दिनांक 27 मे 2005 रोजी टाकी पूर्णपणे विरघळत जाऊन खाली कोसळणे, त्यामध्ये सुमारे 4 व्यक्तींचा मृत्यू होणे व अनेक जखमी होणे, यापूर्वी सिडकोने नवीन पनवेल येथे बांधलेली टाकी दिनांक 15 जून 2004 रोजी कोसळली होती. हे सर्व लक्षात घेता सिडकोच्या कामात मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होऊन बांधकामात झालेल्या हलगर्जीपणामुळे अपघात होत असल्याचा संशय, यामुळे पनवेल, ठाणे भागातील आम जनतेत सिडकोच्या कामाबाबत निर्माण झालेली चीड व व्देषाची भावना, अशी पुनरावृत्ती होऊ नये म्हणून राज्य शासनाने घ्यावयाची दक्षता व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया."

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

. . . .ओ-5

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . .ओ-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, सिडकोचे काम असमाधानकारक आहे आणि अशा खराब कामांच्या मुळाशी सिडकोत बोकाळलेला भ्रष्टाचार आहे असे म्हटले जाते. यापूर्वीही टाकी कोसळली आहे आणि ती 20 वर्षापूर्वीची होती असे उत्तरात म्हटलेले आहे, म्हणजे सिडकोने बांधलेल्या टाक्या 20 वर्षेच तग धरु शकतात का ? साधारणत: या टाक्यांचे आयुष्य किती वर्षाचे

आहे ? याठिकाणी उत्तरात म्हटल्याप्रमाणे संपूर्ण काम एक वर्षात पूर्ण करण्याचे आदेश असताना जलकुंभाचे मुख्य काम, संरक्षक भिंती व रखवालदाराची खोली हयांचे बांधकाम, गिलावा, रंगरंगोटी इत्यादी वगळून जवळजवळ सर्व काम पूर्ण झाले होते. असे असताना 50 हजाराचे विलंब शुल्क आकारुन एकदम दीड वर्षाचा कालावधी का वाढवून देण्यात आला आहे ?

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी (पुढे चालू...

पुढे असेही म्हटलेले आहे की, "लोखंडी जलवाहिनीच्या सांध्यामधून गळती आढळून आली. सदर गळती दि.26-05-2005 रोजी दुरुस्त करण्यात आली व पाणी 2.5 मीटर उंची पर्यंत भरण्यात आले. आणखी पाणी भरण्याचे दि.27-05-2005 रोजी ठरविले होते, परंतु पंपीगच्या काही कारणामुळे प्रत्यक्षात जादा पाणी भरणे शक्य झाले नाही." मुळामध्ये संपूर्ण टाकी विरघळून जाऊन त्या टाकीचे संपूर्ण बांधकाम कोसळले. याचा अर्थ त्याचे बांधकाम डिफेक्टीव्ह झालेले होते. अशा परिस्थितीत त्या कंत्राटदारावर कोणती कडक कारवाई केलेली आहे ? या संदर्भात चौकशी समिती केव्हा नियुक्त केलेली आहे ? त्या समितीचा पहिला अतिरिक्त अहवाल सादर करण्यास दिलेला तीन आठवडयाचा कालावधी पूर्ण झाला असेल तर त्यांचा अहवाल सादर झालेला आहे काय ? त्याचबरोबर मृत व्यक्तींच्या जवळच्या नातेवाईकांना ठरविलेली रक्कम मिळालेली आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी अनेक प्रश्न उपस्थित केलेले आहेत. या टाकीच्या बांधकामासाठी 84 लाख रुपये अंदाजित केलेल्या रक्कमेप्रमाणे खर्च झालेला आहे. अशा अवस्थेमध्ये ती टाकी पडते, ही बाब गंभीर आहे. दिनांक 27-05-2005 रोजी ही टाकी कोसळली, त्याच दिवशी सिडकोच्या प्रमुख वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी समिती गठीत केली. त्या समितीचा अहवाल खरे म्हणजे एक महिन्यात यायला पाहिजे होता. परतु त्या समितीच्या अध्यक्षांनी चौकशीसाठी अजून वेळ मागून घेतला. त्या समितीच्या अध्यक्षांशी काल मी स्वत: बोललो. कोणत्याही परिस्थितीत जुलै अखेरपर्यन्त याबाबतचा अहवाल निश्चित दिला जाईल असे त्यांनी सांगितले. या अहवालाच्या अगोदरच सिडकोच्यावतीने कारवाई करण्यात आलेली आहे. निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे मृत व्यक्तींच्या जवळच्या नातेवाईकांना 1 लाख रुपये देण्यात आलेले आहेत, त्याचबरोबर जखमी व्यक्तींना 25 हजार रुपये देण्यात आलेले आहेत. कंत्राटदाराचे सिक्युरिटी डिपॉझिट फोरफीट करण्यात आले, एवढेच नव्हे तर कंत्राटदारावर आणि इंजिनियरवर गुन्हा दाखल केलेला आहे. चौकशी अहवाल आल्यानंतर यामध्ये जे जे लोक जबाबदार असतील त्यांच्यवर कठोर कारवाई केली जाईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सिडकोचे काम कसे चाललेले आहे हे सर्वांनाच माहीत आहे. घरे बांधली गेली परंतु वरच्या मजल्यावरील पाणी खालच्या घरामध्ये गळते, लोकांना घरामध्ये रहाणे अशक्य झालेले आहे. या प्रकरणामध्ये चौकशी चालू आहे. पाण्याची टाकी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे चालू....

पडली त्याखाली काही मजूर मरण पावलेले आहेत, यावरुन कशापध्दतीने काम चाललेले आहे,ते स्पष्ट दिसते. बांधकामाच्या संबंधात सिडकोचे निकष निश्चितच ठरलेले असतील. पाण्याची टाकी बांधली जात होती, त्यावेळेस बांधकामामध्ये मटेरियल जे वापरण्यात येत होते ते कोणत्या दर्जाचे आहे, ते काम केव्हा पूर्ण होणार आहे, या सगळया गोष्टी तपासून पहाण्याची जबाबदारी ही सिडकोच्या इंजिनिरवर येते. त्या टाकीचे टेस्टींग सुरु झाले आणि काही वेळातच टाकीमधून पाणी गळायला लागली आणि त्याचवेळी टाकी कोसळली. त्याखाली मजूर सापडून मृत्युमुखी पडले. शासन नावाची यंत्रणा कशी काम करते ते यावरुन दिसते. आपण टाकीचे काम कंत्राटदाराला दिल्यानंतर ती टाकी किती वर्षे टिकेल हे पाहिले नाही, त्या बांधकामाची माहिती घेण्यासाठी आपले इंजिनियर पोहोचले नाहीत. गरीब मजूर त्यामध्ये मृत पावले. यासंबंधातील चौकशी समिती चौकशी करेल, मुदत मागून घेईल. परंतु याचा परिणाम बांधकामावर होतो. माझा शासनाला प्रश्न असा आहे की, अशा कामामध्ये जबाबदार कोणाला धरतो ? ज्या जबाबदार व्यक्ती आहेत, त्यांच्यावर काम पहाण्याची, त्याची देखभाल करण्याची जबाबदारी आहे, त्या सिडकोच्या इंजिनियरवर कोणती कारवाई केली, त्यासंबंधाने उत्तर द्यावे.

यानंतर कु.थोरात.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

टाकीचे इतक्या निकृष्ठ दर्जाचे काम चाललेले असतांना सिडकोचे अधिकारी काय करीत होते? याची माहिती मंत्रिमहोदय देतील काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय,मी पहिल्यांदाच उत्तर देतांना सांगितले की, ही वस्तुस्थिती आहे की, सुपरव्हिजनचे काम निश्चितप्रकारे सिडकोच्या अधिका-यांचे आहे. यामध्ये तीन आस्पेक्ट्स आहेत. एक डिझाईन, दुसरे मटेरियल कसे वापरले आहे आणि तिसरे वर्कमेनशीप. यामध्ये कोण दोषी आहेत, हे कमिटीचा अहवाल आल्यानंतरच स्पष्ट होईल. या क्षेत्रातील अत्यंत चांगल्या, नामांकित व्यक्त या कमिटीमध्ये आम्ही नेमलेल्या आहेत. ही घटना घडल्यानंतर, म्हणजे दि.27.5.2005 ला ही घटना घडली आणि दुस-याच दिवशी दिनांक 28.5-2005 रोजी ही समिती शासनाने नेमलेली आहे. या समितीमध्ये श्री. शिरीष पटेल, संकल्पना चित्र तज्ञ तसेच अतिशय नामांकित लोकांना त्या समितीमध्ये नेमलेले आहे. जुलै अखेरपर्यंत या समितीचा अहवाल येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर मला मिळालेले नाही. ज्यावेळी या टाकीचे बांधकाम चालू होते, त्यावेळी सिडकोचे इंजिनियर, ते बांधकाम तपासावयास गेले होते काय? गेले असतील तर त्यांच्या इन्स्पेक्शनचा अहवाल काय आहे?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या बांधकामाच्या सुपरव्हिजनचे काम सिडकोचे आहे. सिडकोचे लोक त्या ठिकाणी निश्चितप्रकारे होते. त्या लोकांनी सुपरव्हिजनचे काम निष्काळजीपणाने केले असेल किंवा कॉन्ट्रॅक्टरने मटेरिएल खराब वापरले असेल, वर्कमेनशीप खराब केली असेल किंवा क्युटिंग हॉलीनेस कॉम्प्लेक्शनचा वापर केला नसेल, हया सगळया गोष्टी "तज्ञ समितीचा" अहवाल आल्यानंतरच ठरविल्या जाऊ शकतील. जबाबदारी कोणावर फिक्सअप करावयाची हे समितीचा अहवाल सांगेल. सभापती महोदय, यामध्ये तीन निरपराध लोकांचा बळी गेलेला आहे. त्यामुळे शासन कोणालाही माफ करणार नाही व कोणाच्याही दयेचा किंवा मायेचा हा विषय नाही. यामध्ये जे जे जबाबदार असतील त्यांना कठोरातील कठोर शासन केले जाईल.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे :सभापती महोदय, टाकी कोसळली आहे. या टाकीचे बांधकाम निकृष्ठ दर्जाचे असेल म्हणून ही टाकी कोसळली आहे, हे क्लीअर आहे. संबंधितावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे मग ठेकेदारांना अटक कां झाली नाही? त्याच कॉन्ट्रॅक्टरचे सिडको आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कोटयावधी रुपयाचे काम चालू आहे. त्या कामांना स्थगिती दिली आहे किंवा काय ? वा ती कामे तशीच चालू आहेत काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, गुन्हा दाखल झाल्यानंतर कॉन्ट्रॅक्टरला ताबडतोब अटक झाली. पण त्यानंतर त्या कॉन्ट्रॅक्टरला जामिनावर सोडण्यात आले. त्याच कॉन्ट्रॅक्टरतर्फे दुस-या एका टाकीचे काम चालू होते, ते काम ताबडतोब थांबविण्यात आले. समितीचा रिपोर्ट आल्यानंतर, खरोखरच कॉन्ट्रॅक्टर जर दोषी असेल तर त्या कॉन्ट्रॅक्टरला ब्लॅकलिस्ट करण्यात येईल. आणि सिडकोचेच नाहीतर शासनाचे कुठलेही काम त्या कॉन्ट्रॅक्टरला दिले जाणार नाही आणि अशा प्रकारे कठोरातील कठोर असलेल्या तरतूदीची अंमलबजावणी केली जाईल.

श्री. वसंत काळे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी उत्तर देतांना सातत्याने असे सांगितलेले आहे की, सुपरव्हिजनचे काम पाहणारा अधिकारी जर चौकशी अंती दोषी आढळला तर त्यावर कारवाई केली जाईल. सभापती महोदय, ही गोष्ट सकृतदर्शनी सत्य आहे की, या कामाकडे त्याचे दुर्लक्ष झालेले आहे. किंवा कॉन्ट्रॅक्टर आणि त्या अधिका-याची हातमिळवणीतून तो कॉन्ट्रॅक्टर निकृष्ठ दर्जाचे काम करीत होता त्यामुळे सिडकोची ही टाकी कोसळली आणि शासनाचे लाखो रुपयाचे नुकसान झालेले असतांना, आपल्या नेहमीच्या परंपरागत पध्दतीने चौकशी करणे, म्हणजे त्या गुन्हयाला संरक्षण देण्याची व्यवस्था करण्यासारखे आहे, असे माझ्यासारख्या सदस्यांना वाटते. ही टाकी कोसळयानंतर सिडकोने आणि सरकारने, ताबडतोब संबंधित एक-दोन अधिका-यांना व जो प्रमुख अधिकारी आहे, ज्याच्यावर या कामाची पूर्ण जबाबदारी आहे, त्या अधिका-याला सस्पेंड करुन आणि त्याच्या हाताखालच्या सगळया कर्मचा-यांना सस्पेंड करुन, त्यांनी यातून किती रुपयांची माया जमविली आहे, याची तपासणी करण्यासाठी सरकार काही व्यवस्था करणार आहे काय?

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. वसंतराव काळे .....

माझा प्रश्न असा आहे की, या कामाशी निगडित जे मुख्य अभियंता असतील किंवा कार्यकारी अभियंता असतील त्यांची प्रथमदर्शनी चूक आहे, त्यांचे नियंत्रण नीट नव्हते म्हणून बांधकाम चुकीचे झाले म्हणून त्यांना सस्पेंड करुन त्यांची चौकशी करणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, आपण सिडकोच्या संबंधित इंजिनिअरविरुध्द गुन्हा दाखल केलेला आहे. त्यांनी जामीन घेतलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव काळे साहेबांनी या ठिकाणी विचारले की, कार्यकारी अभियंता वगैरे उच्चस्तरीय अधिकाऱ्याला जबाबदार धरणार काय ? यामध्ये इंजिनिअर्सच्या पदांची क्रोनॉलॉजी पाहता असिस्टंट इंजिनिअर, असिस्टंट एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर आणि एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर हे तीन लोक या कामासाठी जबाबदार होते. यामध्ये असिस्टंट इंजिनिअरने 100 टक्के तपासणी केली पाहिजे. असिस्टंट एक्झिक्युटीव्ह इंजिनिअरने 100 टक्के तपासणी केली पाहिजे आणि बिलाच्या 10 टक्के तपासणी एक्झिक्युटीव्ह इंजिनिअरने केली पाहिजे. पहिल्या प्रश्नाला उत्तर देत असताना मी सांगितले की, कमिटीचा रिपोर्ट आल्यानंतर कोणालाही पाठीशी घालणार नाही. कठोरातील कठोर कारवाई करण्यात येईल. कमिटीचा रिपोर्ट जुलै अखेर म्हणजे दहा पंधरा दिवसात येणार आहे. तो रिपोर्ट आल्यानंतर त्यामध्ये कार्यकारी अभियंत्यांना दोषी धरले असेल तर त्यांना सस्पेंड करण्यात येईल.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, आपण जर या घटनाक्रमाचा इतिहास पाहिला तर असे लक्षात येईल की, हा जलकुंभ किंवा ही पाण्याची टाकी 22 जानेवारी, 2004 पर्यन्त पूर्ण व्हावयास पाहिजे होती. प्रत्यक्षात 30.6.2005 पर्यन्त मुदत वाढवून देण्यात आली. 27 मे 2005 ला दुपारी 12 वाजता त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांच्या असे लक्षात आले की, कॉन्क्रीटचे तुकडे खाली पडत आहेत. त्यावेळी दुर्दैवाने ज्या व्यक्ती मृत झाल्या त्यांना बाहेर काढणे, ॲक्शन कमिटी नेमणे वगैरे गोष्टी स्वाभाविकपणे केल्या. माझा प्रश्न असा आहे की, मुळातच बांधकाम उशिरा सुरु झाले आणि जो रिपोर्ट येणार आहे त्यालाही विलंब लागणार आहे. त्याला आपण डेडलाईन देणार आहात काय ? आजच्या प्रश्नोत्तरांच्या यादीमध्ये या प्रश्नाला उल्लेख आहे. त्यामध्ये असे उत्तर दिले आहे की, या घटनेची चौकशी करण्यासाठी सिडको प्रशासनाने स्ट्रक्चरल डिझाईन एक्सपर्ट यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली आहे. चौकशी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

डॉ. अशोक मोडक ....

प्रक्रिया सुरु असून त्याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे. सभागृहाची अर्जेन्सी लक्षात घेऊन याबाबतीत आपण डेडलाईन सांगणार काय ? सकृतदर्शनी सगळयांचे मत असे आहे की, त्या ठिकाणी जो मृत्यू झालेला आहे त्याला काही जणांची हलगर्जीवृत्ती जबाबदार आहे. त्यांना सस्पेंड करणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी डेडलाईनच्या बाबतीत सांगितले की, या समितीच्या अध्यशांशी मी संध्याकाळी समक्ष बोललो आणि विचारले की, तुम्ही लवकर अहवाल का देऊ शकला नाही. त्यांनी काही कारणे सांगितली. ती टाकी पूर्णपणे जमीनदोस्त झाली त्यामुळे त्यांना ज्या काही टेस्ट घ्याव्या लागतात, हॅमरींग टेस्ट वगैरे घ्यावयाची असते, त्यामध्ये क्वालिटी ऑफ वर्क टेस्ट करु शकतात, ते त्यांना जमू शकले नाही. परंतु जुलै अखेर म्हणजे या महिन्याच्या शेवटच्या तारखेपर्यन्त त्यांचा अहवाल ते देणार आहेत. तो अहवाल आल्यानंतर जे अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करु आणि सभागृहाचे एकमत असेल आणि सभागृहाची इच्छा असेल की, एवढे मृत्यू झालेले आहेत, एवढी आर्थिक हानी झालेली आहे तर निश्चितपणे त्यांना सस्पेंड करण्यात येईल आणि त्यानंतर त्यांची चौकशी करण्यात येईल.

डॉ. एन.पी.हिराणी : सभापती महोदय, सिडकोचे एकंदरीत काम पाहिले तर त्याबाबतीत सदनामध्ये नेहमी खूप तक्रारी येतात. मुळात सिडकोची चूक आहे की नाही याचा निर्णय आपल्याला घ्यावयाचा आहे. इंजिनिअर बरोबर होते काय ? कॉन्ट्रॅक्टर बरोबर नेमले होते काय ? कॉन्ट्रॅक्टरने डिझाईनप्रमाणे अंमलबजावणी केली काय ? मटेरियल बरोबर वापरले काय ? या सगळया बाबींची चौकशी करण्याकरिता सिडकोचीच समिती नेमणे आणि त्यांच्याकडून सगळी चौकशी करुन घेणे यामुळे या चौकशीमध्ये न्याय मिळू शकत नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एन.पी.हिराणी...

आपल्याला सगळयांना कल्पना आहे की, अशा कंपन्यांमध्ये वरपासून खालपर्यंत सगळयांची हातमिळवणी झालेली असते. अशा परिस्थितीमध्ये न्याय मिळण्याची शक्यता कमी आहे. माझा प्रश्न असा आहे की, यासाठी एक स्वतंत्र यंत्रणा नेमून या कामाच्या निमित्ताने सिडकोची चौकशी करुन जनतेला आणि जनतेच्या पैशाला न्याय मिळवून देण्याच्यादृष्टीने आणि ज्यांचे जीव गेले आहेत त्यांना न्याय मिळवून देण्याच्यादृष्टीने शासन प्रयत्न करणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : ही कमिटी स्वतंत्र आहे. तिचा सिडकोशी काहीही संबंध नाही. मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभागाचे प्रधान सचिव यांनी नावे सुचविल्याप्रमाणे श्री.देशपांडे, श्री.रायकर, शिरीष पटेल या लोकांचा सिडकोशी डायरेक्ट संबंध येत नाही. या क्षेत्रातील हे नामवंत लोक असल्यामुळे या समितीमध्ये त्यांचा अंतर्भाव केला आहे.

श्री.अरविंद सावंत : मंत्रिमहोदय वारंवार एका प्रश्नाचे उत्तर सांगण्याचे टाळत आहेत. त्यांनी स्वत: कबूल केले की, हे बांधकाम कोसळले आणि त्यात काही लोक मृत पावल्यामुळे मुख्य अभियंत्यांवर गुन्हा दाखल केल्यानंतर त्यांनी कोर्टामध्ये जाऊन अटकपूर्व जामीन घेऊन आपली अटक टाळली आहे. याचा अर्थ सकृतदर्शनी त्यांनी गुन्हा केल्याचे कबूल करतात तरी सुध्दा त्यांच्या निलंबनाची कार्यवाही करीत नाहीत हे गैर आहे. यामध्ये सरळसरळ मुख्य अभियंता, सहाय्यक अभियंता, कार्यकारी अभियंता हे जबाबदार असल्याचे दिसत आहे. ते जबाबदार असल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करतात आणि दुस-या बाजुला त्यांना निलंबित करीत नाही. या दोन्ही अधिका-यांना निलंबित करुन त्यांची चौकशी करावी. कारण अधिकारात ठेवून चौकशी करणे गैर ठरेल म्हणून त्यांना निलंबित करणार काय ?

श्री.राजेश टोपे : होय.

श्री.श्रीकांत जोशी : याप्रकरणाचा रिझल्ट काय येणार आहे ते आजच सांगतो. कारण अशा कमिटयांचा सगळयांना चांगला अनुभव आहे. टेस्टिंगच्या काळामध्ये ही टाकी जास्त भरल्यामुळे पडली आहे, हा पाण्याचा दोष आहे असा निकाल येईल हे मी आजच सांगतो. वास्तविक दिवसाला 1 फूट पाणी भरले पाहिजे. टेस्टिंगच्या या नियमाचे उल्लंघन केल्यामुळे ही टाकी पडली आहे यापेक्षा वेगळा निर्णय येणार नाही. दररोज 1 फूट पाणी भरावयाचे हा टेस्टिंगचा पहिला नियम आहे. दुसरा नियम असा आहे की, इन्सपेक्शनच्यावेळी कार्यकारी अभियंत्यांने हजर राहिले

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी....

पाहिजे. टाकीची रोज तपासणी केली पाहिजे. या सर्व नियमांचे उल्लंघन झालेले आहे. कन्स्ट्रक्शन कंसलटंट, नागपूरचे श्री.कुलकर्णी यांनी जवळपास 1000 टाक्या बांधल्या आहेत. रोज 1 फूट पाणी भरले पाहिजे आणि निरीक्षणाच्या वेळी टाकीखाली कोणी माणूस असता कामा नये या नियमांचे उल्लंघन झालेले आहे. या नियमाचे उल्लंघन केल्यास नियमामध्येच ताबडतोब निलंबित करण्याची तरतूद असताना त्यांना निलंबित का केले नाही ? कारण सरळसरळ नियमांचे उल्लंघन करण्यात आले आहे. दररोज 30 से.मी.पेक्षा जास्त पाणी भरावयाचे नाही या नियमाचा उल्लंघन करुन 5 फूट पाणी भरले त्यामुळे टाकी पडणार नाही तर काय होणार ? तेथील अधिक्षक अभियंता याला जबाबदार आहेत, नियमांचे उल्लंघन झाल्यामुळे त्यांच्यावर ताबडतोब ॲक्शन का घेतली जात नाही ?

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्य हे स्वत: इंजिनिअर असल्यामुळे त्यांनी काही तांत्रिक मुद्दे उपस्थित केले आहेत. टेस्टिंगच्या वेळी रोज एक फूटापेक्षा जास्त पाणी भरु नये, त्याऐवजी 5 फूट पाणी भरले हया सगळया तपासाच्या बाबी आहेत. हया तांत्रिक बाबी समिती तपासून पाहील. त्याठिकाणी सुपरव्हिजन करणा-या संबंधित अभियंत्यांची चूक असेल तर त्या पध्दतीने त्यांच्यावर ठपका ठेवण्यात येईल. समितीने जर त्यांना जबाबदार धरले तर त्यांच्याविरुध्द कायदेशीर कारवाई करावी लागेल ती केली जाईल.

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

सभापती : या टाकीचे 84 लाखाचे एस्टिमेट आहे. ही टाकी बांधल्यानंतर ती पूर्णत: खाली पडली. याचा अर्थ यामध्ये किती निग्लिजन्स आणि इफिरिअर क्वालिटी असू शकते याचे हे एक उदाहरण आहे. तेव्हा याप्रकरणी सिडकोचे इंजिनिअर किंवा अन्य जे कोणी तांत्रिक अधिकारी जबाबदार असतील त्यांना निलंबित करुन या प्रकरणी चौकशी व्हावी अशी सभागृहाची अपेक्षा आहे. सभागृहाचा कल लक्षात घेऊन त्यानुषंगाने आपण कारवाई पूर्ण करणार आहात काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, आपण सांगितल्या प्रमाणे या सभागृहाचा आणि आपला मान राखून तिन्ही अधिका-यांना सस्पेण्ड करुन या प्रकरणी चौकशी करण्यात येईल.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : परिवहन महामंडळाने निवड प्रक्रिया रद्द न करता निवड केलेल्या उमेदवारांना नोकरीत सामावून घेणे

मु. शी : परिवहन महामंडळाने निवड प्रक्रिया रद्द न करता निवड केलेल्या उमेदवारांना नोकरीत सामावून घेणे यासंबंधी समितीचे सदस्य सर्वश्री सागर मेघे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, जगदिश गुप्ता, संजय दत्त, सुधीर सावंत, नतिकोद्दीन खतिब, सुधाकर गणगणे, श्रीमती सुधा जोशी, सर्वश्री रमेश निकोसे, विनोद तावडे, मधुकर चव्हाण आणि प्रतापराव सोनावणे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सागर मेघे (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे समितीचे परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" राज्य शासनाच्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने फेब्रुवारी, 2004मध्ये चालक, वाहन कारागीर, भांडारपाल, द्वारपाल, सहाय्यक अशा विविध पदांसाठी नोकर भरती मोहीम राबविणे, राज्यभरातून शेकडो बेरोजगारांनी शंभर रुपयाच्या विहित नमुन्यात अर्ज सादर करणे, जून-जुलै, 2004 मध्ये बेरोजगारांच्या मुलाखती पार पाडणे, निवड झालेल्या उमेदवारांची संबंधित जिल्हा सामान्य रुग्णालयात वैद्याकीय तपासणी करण्यात येणे, वैद्यकीय तपासणीत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना नोकरीत रुजू होण्यापूर्वी सेवा प्रशिक्षण देणे, ही सर्व प्रक्रिया पूर्ण होऊनही नोकरीत रुजू करुन न घेणे, नोकर भरतीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शासनाने निवड प्रक्रियाच रद्द करणे, राज्यातील बेरोजगारांवर व त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ येणे, परिणामी उक्त बेरोजगारांमध्ये निर्माण झालेले संतापाचे व असंतोषाचे वातावरण, संपूर्ण निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ही प्रक्रिया रद्द न करता या बेरोजगारांना महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळात समावून घेण्याबाबत शासनाने करावयाची कारवाई व याबाबत शासनाची भूमिका."

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, ल□वेधी सूच□संबंधीच्या □वेद□च्या प्रती मा□□य सदस्यां□ आधीच वितरित □ल्या असल्यामुळे मी ते □वेद□ आपल्या अ□मती□ सभा□हाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : □वेद□ सभा□हाच्या पटलावर ठेव□यात आले आहे.

□वेद□

(प्रेस : येथे सोबतचे □वेद□ छापावे.)

....4 ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सागर मेघे : परिवहन महामंडळातील रिक्त जागा भरण्यास शासनाने परवानगी दिली. ही परवानगी देत असताना कोणकोणत्या विभागामध्ये किती जागा रिक्त आहेत याचा आढावा घेण्यात आला असेल आणि त्यानंतरच ही पदे भरण्याची परवानगी शासनाने दिली असेल. पदांची जाहिरात दिल्यानंतर राज्यातील शेकडो बेरोजगार युवकांनी 100 रु.च्या विहित नमुन्यात अर्ज सादर केले. त्यांची निवड प्रक्रिया पूर्ण झाली. निवड झालेल्या उमेदवारांना 48 दिवसाचे ट्रेनिंगही देण्यात आले. काहींना नोक-याही देण्यात आल्या. शासनाने निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "दरम्यानच्या कालावधीमध्ये गर्दीचा हंगाम संपल्यानंतर प्रवासी संख्या कमी झाल्यामुळे बसगाडयांच्या फे-यांचा आढावा घेण्यात आला असता ज्या गाडयांचे भारमान 30 टक्क्यापेक्षा कमी आहे अशा फे-या तात्पुरत्या बंद करण्यात आल्या आहेत." माझा प्रश्न असा आहे की, निवड केलेल्या उमेदवारांच्या नेमणुका केव्हा करणार आहात ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : जवळ जवळ 7887 उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. खुल्या वर्गातील 2122 आणि मागासवर्गीय 904 अशा एकूण 3026 उमेदवारांच्या नेमणुका केलेल्या आहेत.सध्या प्रवासी कमी आहेत. ऑक्टोबर पासून जशा फे-या वाढतील तसे त्यांना घेण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : मा.मंत्री महोदय त्या भागातील आहेत. चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, वर्धा या भागातील बेरोजगार लोकांचा हा महत्वाचा प्रश्न आहे. या लोकांना 48 दिवस ट्रेनिंग दिले, त्यांच्या नेमणुका झाल्या. या लोकांनी 100 रु.चा फॉर्म भरुन मुलाखती दिल्या, त्यामध्ये, नोकरी लागेल या आशेने, त्यांचे तीन-चार हजार रुपये खर्च झाले, मेडिकल झाली, नोकरी मिळाली म्हणून त्यांनी पेढे वाटले आणि नंतर 30 टक्के प्रवासी कमी आहेत म्हणून त्यांना आपण नोकरीमध्ये घेत नाहीत. हा त्यांच्यावर अन्याय आहे. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, या लोकांची वेटींग लिस्ट तयार करुन निवृत्तीने तसेच अन्य कारणांनी जस जशा जागा खाली होतील तशी त्यांची भरती करावी. तसेच यासंदर्भातील सुस्पष्ट निर्णय त्यांना कळवावा. मागासवर्गीय, तळागाळातील हे लोक आहेत. नोकरी लागण्यासाठी जो काही लक्ष्मीदर्शन कार्यक्रम झालेला आहे त्याबाबतीत मला काही सांगावयाचे नाही. शासनाने मान्य केलेल्या या जागा आहेत आणि नियमाप्रयमाणे या जागा भरलेल्या आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

या गरीब उमेदवारांना दिलासा देण्यासाठी वेटिंग लिस्ट तयार करुन त्या उमेदवारांना सामावून घेतले जाईल अशा प्रकारचे सुस्पष्ट आश्वासन या बेरोजगार उमेदवारांना देण्यात यावे अशी माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे. आता गर्दीचा हंगाम कमी असल्यामुळे आपल्याला उमेदवारांना नेमणूका देता येत नाहीत ही आपली अडचण मी समजू शकतो. परंतु गर्दीचा हंगाम सुरु झाल्यानंतर तसेच बसेसच्या फे-यांमध्ये वाढ झाल्यानंतर पहिल्या टप्प्यात 100, दुस-या टप्प्यात 200, तिस-या टप्प्यात 300 अशा प्रकारे टप्प्या टप्प्याने या मुलाखतीत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना नोकरीत सामावून घेण्यात यावे अशी देखील माझी विनंती आहे.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, ऑक्टोबर महिन्यानंतर एस.टी.बसेसच्या फे-या वाढतील तसेच प्रवाशांची गर्दी देखील वाढेल. ज्या ज्या उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या गेलेल्या आहेत व त्यात जे उमेदवार उत्तीर्ण झालेले आहेत त्या सगळया उमेदवारांना ऑक्टोबर महिन्यानंतर नेमणूका देणार आहोत.

श्री. नितीन गडकरी : या सगळया उमेदवारांना आपण ऑक्टोबर नंतर नेमणूका देणार आहात अशा प्रकारचे आश्वासन दिल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. माझा फक्त एवढाच प्रश्न आहे की, या मुलाखतीत उत्तीर्ण झालेल्या सर्व उमेदवारांना येत्या तीन महिन्यांच्या कालावधीत परिवहन सेवेत नेमणूका देण्यात येतील काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : होय.

श्री. मधुकर सरपोतदार : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची निर्मिती होऊन अनेक वर्षे झालेली आहेत. परिवहन महामंडळाच्या बसेसमधून दररोज किती प्रवासी प्रवास करतात याचा डाटा आपल्याकडे उपलब्ध असेल. त्याच प्रमाणे या महामंडळातील किती कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत, काही कालावधीत किती कर्मचारी सेवानिवृत्त होणार आहेत, किती कर्मचारी मृत्यू पावले यासबंधीची संपूर्ण माहिती विभागाकडे उपलब्ध असेल. त्या माहितीच्या आधारेच महामंडळ पदांची मागणी करीत असेल. या संपूर्ण माहितीचा आधार घेऊन पदे भरण्याबाबत वृत्तपत्रात जाहिरात दिली जाते. परंतु महामंडळाच्या विहित नमून्यातील अर्जाची किंमत 100 रुपये ठेवण्यात आलेली आहे. एकेका उमेदवारांकडून आपण 100-100 रुपये घेतले आहेत. आणि त्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविले आहे. या उमेदवारांच्या मुलाखती झाल्यानंतर पात्र उमेदवारांची वैद्यकीय

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

तपासणी देखील करण्यात आलेली आहे. परंतु या पात्र उमेदवारांना महामंडळाने अद्यापही नेमणूका दिलेल्या नाहीत. या मुलाखतीमध्ये पात्र झालेल्या उमेदवारांना नेमणूका देण्यासंदर्भात राज्य परिवहन महामंडळाने काय धोरण ठरविले आहे ? राज्य मार्ग परिवहन महामंडळात रिक्त पदांचा आढावा घेऊनच त्यासंबंधी पूर्णपणे अभ्यास करुन नंतरच जाहिरात दिली पाहिजे. विहित नमुन्यातील अर्जाची किंमत 100 रुपये ठेवली आहे हा काय प्रकार चालला आहे हे आम्हाला कळत नाही. बेरोजगार उमेदवार एवढी मोठी रक्कम कशी उपलब्ध करु शकेल. एस.टी.महामंडळात पदांची भरती करताना भविष्यात तरी जाहिरात देताना बरोजगारांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन जाहिरात देण्याच्या संदर्भात काही तरी ठोस अशा प्रकारचे धोरण ठरविण्यात येईल काय ? पदे भरण्याबाबतची सर्व प्रक्रिया पूर्ण होऊनही पदे भरली जात नाहीत, पात्र उमेदवारांना नेमणूका दिल्या जात नाहीत, या बरोजगारांच्या जीवनाशी शासन का खेळ करीत आहे. या उमेदवारांची कशासाठी दिशाभूल करीत आहे. जेवढया जागा रिक्त आहेत तेवढयाच पदांची जाहिरात देण्याचे धोरण भविष्यात ठरविले गेले पाहिजे...

सभापती : आपण कृपया प्रश्न विचारावा.

श्री. मधुकर सरपोतदार : या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी पात्र उमेदवारांना ऑक्टोबरमध्ये नेमणूका देण्यात येतील अशा प्रकारचे आश्वासन दिलेले आहे. माननीय मंत्र्यांकडून आश्वासनांचे पालन केले जाईल काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, ज्या उमेदवारांच्या मुलाखती घेऊन जे उमेदवार पात्र ठरले आहेत त्या सगळयांना परिवहन सेवेत समावून घेणार आहोत. 7887 पदांसाठी उमेदवारांची निवड करण्यात आलेली आहे. यातील काही उमेदवारांना नेमणूका देण्यात आलेल्या आहेत. 3 हजार 26 पदे भरावयाची असून त्यासाठी थोडा कालावधी लागेल. मी नम्रपणे सांगू इच्छितो की, राज्य मार्ग परिवहन महामंडळ आधीच तोटयात आलेले आहे. ऑक्टोबर महिन्या नंतर प्रवाशांची गर्दी वाढेल तसेच बसेसच्या फे-यांमध्ये वाढ झाल्यानंतर उर्वरित 3 हजार 26 पदे भरण्याबाबतची कार्यवाही केली जाईल.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी : लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात म्हटले आहे की, प्रथमत: 2004 मध्ये चालक (कनिष्ठ) पदांची भरती करण्यात आली. यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, कनिष्ठ चालकांची किती पदे भरली गेली आहेत ? शासनाने यापूर्वी दिलेल्या आदेशानुसार दिनांक 31.12.02 रोजीचा शिल्लक असलेला मागासवर्गीयांचा अनुशेष भरणे बंधनकारक असल्यामुळे जेवढा मागासवर्गीयांचा अनुशेष शिल्लक आहे तेवढया पुरत्याच मागासवर्गीय उमेदवारांना नेमणूका देण्यात येत आहे.या संदर्भात माझा दुसरा प्रश्न असा आहे की, अनुशेष भरण्याच्या संदर्भातील सद्य:स्थिती काय आहे ? एकूण किती पदांचा अनुशेष होता व आता किती अनुशेष शिल्लक आहे?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : आतापर्यन्त जवळपास 1543 पदांवर नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. त्यातील खुल्या प्रवर्गातील 843 व मागासवर्गीय प्रवर्गातील 734 उमेदवारांना नेमणूका दिलेल्या आहेत. वाहक या पदांवर 1255 उमेदवारांना नेमणूका देण्यात आलेल्या आहेत. त्यात खुल्या प्रवर्गातील 1123 व मागासवर्गीय प्रवर्गातील 132 उमेदवारांना नेमणूका दिलेल्या आहेत. मागासवर्गीय प्रवर्गातील एकूण 904 उमेदवारांना नेमणूका देण्यात आलेल्या आहेत. उर्वरित 3 हजार 26 पदे अजून भरावयाची असून ती पदे ऑक्टोबर महिन्यानंतर आम्ही भरणार आहोत.

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.2 पुढे सुरु..

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, एस.टी.महामंडळामध्ये होणा-या नोकर भरतीबाबत अनेक सदस्यांनी तक्रार केल्या. यामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. माझ्याकडे याबाबत अतिशय गंभीर स्वरुपाची माहिती आहे. यासंदर्भात शासनाने चौकशी सुध्दा केलेली आहे. उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक यांनी चौकशी केली. त्यामध्ये अपात्र उमेदवारांना पात्र ठरविण्यात आले असे दिसून आले. नोकर भरती झाली पाहिजे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. जी चौकशी केली त्यानुसार नांदेड,परभणी,बुलढाणा,यवतमाळ,सांगली,वर्धा,रत्नागिरी आणि धुळे या विभागांमध्ये भरती करताना भ्रष्टाचार झालेला आहे. यासंदर्भातील चौकशी महामंडळाचे तत्कालिन दक्षता अधिकारी श्री.उल्हास जोशी आणि वरिष्ठ सुरक्षा अधिकारी यांनी केली होती. तत्कालिन व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सतबिर सिंग यांनी सुध्दा त्याची दखल घेतली होती. परभणीमध्ये 18 ड्रायव्हरपैकी 11 अपात्र ठरविले. नोकरभरती ही भावनात्मकदृष्टया न होता पात्र उमेदवारांचीच भरती झाली पाहिजे. यामध्ये काही अधिकारी/कर्मचारी निलंबित झालेले आहेत. माझा प्रश्न असा आहे की, जी वेटींग लिस्ट तयार केली आहे त्या उमेदवारांची पुन्हा टेस्ट घेऊन नव्याने उमेदवारांची निवड यादी तयार केली जाईल काय ?

श्री. धर्मरावबाबा अत्राम : सभापती महोदय, पात्र उमेदवारांचीच निवड केली जाते.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, हंगाम वाईज भरती झालेली आहे की 2 वर्षांचा आढावा घेऊन भरती झाली आहे हे पाहिले पाहिजे. यासंदर्भात ज्यांनी चुकीचा अहवाल दिला त्या अधिका-यांवर कारवाई झाली पाहिजे. कारण इंधन फुकट गेले आणि उमेदवारांकडून 100 रु. घेण्यात आले. चुकीची माहिती देणा-या अधिका-यांवर कारवाई झाली पाहिजे.

श्री. सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय, जो अहवाल आलेला आहे त्यानुसार हंगामवाईज भरती केलेली नाही. संपूर्ण पिरेडसाठी भरती केलेली आहे. ज्याप्रमाणे गरज भासते त्यानुसार मुलाखती घेऊन याद्या तयार केलेल्या आहेत. जसजशी गरज भासेल तसतशी भरती केलेली आहे. गरजेनुसारच भरती केली जाईल. अवाढव्य भरती केलेली नाही. गरज होती त्याप्रमाणेच नोकर भरती केलेली आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: सांगली येथील वसंतदादा सहकारी सूत गिरणी पूर्ववत सुरु करणे.

मु.शी.: सांगली येथील वसंतदादा सहकारी सूत गिरणी पूर्ववत सुरु करण्यासंबंधी प्रा. शरद पाटील,श्री.जी.एल. ऐनापुरे,श्री. जयंत प्र.पाटील,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा. शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर): सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने मा. सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सांगली येथील बंद पडलेली वसंतदादा सहकारी सूत गिरणी पूर्ववत सुरु करुन कामगारांना रोजगार मिळवून द्यावा अशी कामगारांची मागणी असताना भविष्य निर्वाह निधी कार्यालयामार्फत कामगारांच्या थकित भविष्य निर्वाह निधीपोटी गिरणीच्या यंत्रसामुग्रीची लिलावाने विक्री करण्याचा घेतलेला निर्णय नोटीसीद्वारे जाहीर करणे,परिणामी गिरणी सुरु न होण्याची शक्यता,त्यामुळे कामगारांच्या कुटुंबावर आलेली उपासमारीची वेळ,त्यामुळे कामगारात पसरलेली घबराट व निराशेचे वातावरण,परिणामी दिनांक 5 जुलै,2005 रोजी सकाळी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाने मोठा पोलीस बंदोबस्त घेऊन गिरणीच्या स्थळावर येऊन त्याला विरोध करणे,हा विरोध पाहून लिलावाची बोली धरण्यासाठी आलेल्या व्यापा-याने लिलावामध्ये भाग न घेणे,यामुळे लिलावाची प्रक्रिया सुरु न होण्याची घडलेली घटना,तथापि पुन्हा भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडून गिरणीच्या यंत्रसामुग्रीचा लिलाव होण्याची शक्यता व गिरणी पुन्हा कधीही सुरु न होण्याचा निर्माण झालेला धोका,परिणामी कामगारांवर बेकार होण्याची आलेली पाळी,याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना".

श्री. सतीश चतुर्वेदी (वस्त्रोद्योग मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती मा. सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, सांगली जिल्हयातील ही पहिली सहकारी तत्वावरील सुरु झालेली सूत गिरणी असून राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतदादा पाटील यांचे या सूत गिरणीला नांव दिलेले आहे. या गिरणीमध्ये काम करणा-या शेकडो कामगारांचे भवितव्य गिरणी बंद असल्यामुळे अधांतरी झालेले आहे. गिरणी सुरु व्हावी यादृष्टीने अनेक प्रयत्न झाले. शासनाने यासंबंधात दिलेल्या निवेदनात त्याचा तपशील दिलेला आहे. उत्तरात म्हटले आहे की, गिरणी सुरु करण्यासाठी गिरणी कामगारांची थकीत देणी अदा करावी लागणार आहेत. त्यानंतर खेळते भांडवल व सूत गिरणी सुरु करण्यासाठी येणारा खर्च करावा लागणार आहे. यादृष्टीने प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर प्रकल्प अहवाल प्राप्त झाल्यानंतर वर्धनक्षमता पाहून सूत गिरणीस अर्थसहाय्य करण्याबाबतचा निर्णय घेता येईल.

यानंतर श्री. गायकवाड

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील ...

सभापती महोदय, मी आपल्या मार्फत माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारु इच्छितो की,केन्द्र सरकारने नुकतेच वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी बंद पडलेल्या किवा आजारी असलेल्या वा सुरु होऊ न शकणा-या सूत गिरण्यांना अर्थ सहाय्य देण्याचे धोरण जाहीर केलेले आहे.ज्याप्रमाणे केन्द्र सरकारने साखर उद्योगाला मदत करण्यासाठी एक पॅकेज जाहीर केलेले आहे, त्याप्रमाणे सूत गिरण्यांनासुध्दा अर्थ सहाय्य देण्याचा निर्णय घेऊन, काही सूत गिरण्यांची यादी तयार केलेली आहे त्या यादीमध्ये वसंतदादा सहकारी सूत गिरणीचासुध्दा समावेश आहे.राज्य सरकारने केन्द्र सरकारकडे या योजनेला मान्यता मिळावी आणि या सूत गिरणींना अर्थ सहाय्य मिळावे म्हणून प्रयत्न करावा तेव्हा माननीय वस्त्रोद्योग मंत्री केन्द्र सरकारकडे असा प्रयत्न करणार आहेत काय ?

श्री.सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, या सहकारी सूत गिरणीच्या संदर्भातील प्रस्ताव महाराष्ट्र सरकारने केन्द्र सरकारकडे पाठविला होता .परंतु एन.सी.डी.सी.ने व केन्द्र सरकारने हा प्रस्ताव रिजेक्ट केलेला आहे. त्यांनी आपला प्रस्ताव ॲक्सेप्ट केलेला नाही.या सूत गिरणीवर 40 कोटी रुपयांचे कर्ज आहे. 40 कोटी रुपये या सूत गिरणीने द्यावयाचे आहेत.सन्माननीय सदस्यांनी जी लक्षवेधी सूचना मांडलेली आहे, ती या सूत गिरणीमधील कामगारांच्या प्रॉव्हीडंड फंडासंबंधी आहे.कामगारा सबंधीचे कायदे किती कडक आहेत,याची आपणा सर्वांना कल्पना आहेच. प्रॉव्हीडंड फंडाचा विषय हा राज्य सरकारच्या अंतर्गत येत नाही. हा विषय केन्द्र सरकारचा आहे.प्रॉव्हीडंड फंडाची रक्कम त्या त्या कामगारांच्या अकाऊन्टमध्ये जमा होत असते. त्यांच्या अकाऊन्टमध्ये हे पैसे जमा झाले नाही म्हणून त्यांनी सूत गिरणीची ॲटॅचमेंट केलेली आहे.पाच सहा वेगवेगळया एजन्सीजनी या सूत गिरणीवर खटले दाखल केलेले आहेत.महाराष्ट्र सरकारने 7 कोटी रुपये प्रॉव्हीडंड फंडाचे भरलेले आहेत त्याचबरोबर दहा कोटी रुपये या सूत गिरणीवर महाराष्ट्र शासनाचे कर्ज आहे.एखादी नवीन सूत गिरणी सुरु करावयाची असेल तर पूर्वी 40 कोटी रुपये लागत होते आता त्यासाठी 53 कोटी रुपये लागतात. या सूत गिरणीवर 40 कोटी रुपयांचे कर्ज आहे त्याशिवाय 20 कोटी रुपये त्यांना भाग भांडवलासाठी आणि 20 कोटी रुपये मशिनरीचे आधुनिकीकरण करण्यासाठी पाहिजे आहे. त्याचबरोबर पाच कोटी रुपये रनिंग कॅपिटल करता पाहिजे आहेत अशा प्रकारे या सूत गिरणीला एकूण 65 कोटी रुपये पाहिजे आहेत. एवढे पैसे देऊनसुध्दा ही गिरणी सुरु होईल काय, असा प्रश्न आहे. या सूत गिरणीला वसंत दादा पाटील

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चतुर्वेदी ....

यांचे नाव दिलेले आहे हे आम्हाला मान्य आहे आणि सरकारने सुध्दा वेळोवेळी या सूत गिरणीला मदत केलेली आहे.सभापती महोदयांनी आपल्या दालनात या संबंधीची एक बैठक घेतली होती त्याप्रमाणे फेडरेशनने आम्हाला एक प्रस्ताव पाठविला होता. फेडरेशनमधील लोक एक्सपर्ट असतात आणि त्या एक्सपर्ट लोकांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता. त्या प्रस्तावाचा स्टडी करुन महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतला होता आणि केन्द्र सरकारकडे तो प्रस्ताव पाठविला होता .परंतु त्यांनी हा प्रस्ताव रिजेक्ट केल्यानंतरसुध्दा पुन्हा प्रस्ताव पाठविण्याच्या बाबतीत फेडरेशनला सांगण्यात आले होते आणि या संदर्भात आपल्या दालनात बैठक झाली होती. त्या बैठकीत फेडरेशनला प्रस्ताव सादर करण्यास सांगण्यात आले होते.त्यांच्याकडून प्रस्ताव आल्यानंतर तो प्रस्ताव व्हायेबल आहे किंवा नाही हे पहावे लागेल. ही गिरणी हे पैसे परत कसे करणार आहे ? या सूत गिरणीला एकूण किती देणे द्यावयाचे आहे या सर्व गोष्टींचा विचार करुन महाराष्ट्र शासनाला निर्णय घ्यावा लागणार आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय,या विषयावर या सभागृहात या पूर्वीसुध्दा अनेकदा चर्चा झाली होती. या सूत गिरणीमधील 700-800 कामगार आज बेकार आहेत . या गिरणीचा जो लिलाव केला जात आहे तो लिलाव रोखण्याचे काम हे कामगार करीत आहेत. या लक्षवेधी सूचनेमध्ये आम्ही असे विचारलेले आहे की,या सूत गिरणीमधील 700 ते 800 कामगार लिलाव होऊ देत नाहीत त्यामुळे या जमिनीची विक्री होत नाही.सांगली जिल्हयातील मिरज कुपवाड अशा वेगाने शहरीकरण होत असलेल्या भागात ही सूत गिरणी आहे.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ....

त्या शहरामध्ये आज जमिनींचा भाव किती आहे हे लक्षात घेतले तर आज या गिरणीची जवळ जवळ 30-40 एकर जमीन तेथे आहे., तिची विक्री करून त्यातून जवळ जवळ 25 ते 30 कोटी रुपये उभे होऊ शकतात आणि त्यातून या गिरणीची जी देणी आहेत, वित्तीय संस्थांची म्हणून जी देणी आहेत ती आपण भागवू शकतो. ... सभापती महोदय, हा विषय व्यापक असल्यानेच मी थोडे विस्ताराने बोलतो आहे, आपण मला कृपया बोलण्याची संधी द्यावी. सभापती महोदय, या ठिकाणी आपण वन टाईम सेटलमेंट करायचे ठरविले तर आज जे या गिरणीचे 50 कोटी रुपयांचे देणे असल्याचे माननीय मंत्री महोदय सांगत आहेत ते देणे 20-25 कोटीमध्ये येऊ शकते असे तेथील कामगारांचे म्हणणे आहे. त्या दृष्टीने संबंधित ज्या सगळ्या वित्तीय संस्थांना एकत्रित करून, त्यांचेही चर्चा करून, या गिरणीच्या जमिनीची विक्री करून, त्यातून गिरणीची देणी भागवून या गिरणीचे अस्तित्व ठेवण्याचा प्रयत्न सरकार करणार काय ?

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, शासनाने या गिरणीवर प्रशासक नेमलेला आहे, अजून तेथे आपण लिक्विडेटर नेमलेला नाही. तसे शासनाचे आदेश नाहीत वा शासनाची तशी नीती देखील नाही. परंतु यामध्ये प्रश्न असा आहे की, तेथील कामगारांची देणी द्यायची असली तरी या गिरणीची जी काही देणी आहे त्यांचे आकडे प्रत्येक दिवशी त्यावरील व्याजामुळे वाढत आहेत. एमएसइबीचे 11 कोटी रुपये इतकी बाकी अजून द्यावयाची आहे. आता प्रत्येक दिवशी करोडो रुपयांची लायबिलिटी वाढत आहे. तेव्हा आम्हाला म्हणजे शासनाला तेथे आपण जे प्रशासक नेमले आहेत त्यांनी जो अंदाज दिलेला आहे त्यानुसार त्या गिरणीची जी सरप्लस जमीन आहे तिची किंमत जवळपास 7 कोटी रुपये आहे. तरीही आपण तिच्या मूल्यांकनाचे आदेश दिलेले आहेत. पण अगोदरच या गिरणीवर इतकी अटॅचमेंट आहेत की एका एजन्सीला बोलावून आपण काही सांगावयाचे तर लगेच दुसरी एजन्सी अटॅचमेंट दाखल करते आहे. आम्ही मागे डीआरटीचे 7 कोटी रुपये भरले आहेत. पुन्हा पी.एफ.ची अटॅचमेंट आली. पुन्हा बँकेची अटॅचमेंट आहेच. एवढ्या एजन्सीज्चे पैसे तेथे देणे बाकी आहे की, त्या सगळ्यांनीच त्यासाठी दावे दाखल केलेले आहेत. तेव्हा एकदा का आपल्याला तेथील प्रोजेक्ट रिपोर्ट आला की त्यानंतर मग त्याबाबत काय करता येईल हे आपण पाहू.

..... एक्स 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवानी : सभापती महोदय, खरे तर यामध्ये पैसे भागविणे हा महत्त्वाचा विषय आहे. कामगारांचे जे पैसे भागवावयाचे आहेत त्यापेक्षा मोठी रक्कम तेथे वसूल होऊ शकते. तेव्हा याबाबतचा अहवाल मिळण्याचा जो कालावधी आहे तो आपण निश्चित केला पाहिजे. तर किती दिवसात आपण अहवाल घेऊन यामध्ये निर्णय करणार आहात ?

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, हा अहवाल तयार करण्याची जबाबदारी फेडरेशनने घेतलेली आहे. त्यांनी आमच्याकडे अहवाल पाठविला ... कारण एकदा आमच्याकडून अहवाल पाठविला जाऊन तो अमान्य झालेला आहे. आता पुन्हा अहवाल तयार करण्यास आपण सांगितले आहे, तो आल्यानंतर त्याची व्हाएबिलिटी आम्ही पाहू.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय येथे चुकीचे उत्तर देत आहेत. या ठिकाणी आम्ही ही लक्षवेधी सूचना यासाठी मांडली आहे की, तेथे जे 700-800 कामगार आहेत ते या गिरणीच्या मालमत्तेचा लिलाव करू देत नाहीत. त्यामुळे तेथे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. त्या दृष्टीकोनातून तरी आपण याचा फेर विचार कराल का ?

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, मी याबाबत स्पष्ट उत्तर दिलेले आहे. हा जो लिलाव आहे तो पी.एफ.तर्फे होत आहे, तो राज्य सरकारच्या अधिकाराखाली होत नाही. तेव्हा पी.एफ.ची वसुली करू नका असे आम्ही सांगू शकत नाही. कारण शेवटी तो पैसा त्या कामगारांच्याच अकौंटमध्ये जाणार आहे. त्यामुळे त्यादृष्टीने आम्ही कार्यवाही करू शकत नाही.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, सदर गिरणीच्या जमिनीची किंमत शासकीय अधिकाऱ्यांच्या अंदाजानुसार 7 कोटी रुपये आहे. या गिरणीची तेथे एकंदर 33 एकर जमीन आहे आणि त्या परिसरामध्ये बिगर शेती केलेल्या भूखंडाचा चौरस फूटाला साधारणत: किमान 100 रुपये इतका दर आहे. ...

(यानंतर श्री.जागडे ..... वाय 1 ...

अशुद्धीत पत्र / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील....

या एकूण 33 एकर जागेची किंमत साधारणत: 25 कोटी रुपयाच्या वर जाईल, असा अंदाज आहे. या ठिकाणी प्रा.फंड कमिशनरांची देणी द्यावयाची आहेत. एमएसईबीचे बिल भरावयाचे आहे. तसेच इतरही शासकीय खात्याची देणी भागवावयाची आहेत. ही सर्व देणी जमीन विकून आलेल्या रकमेतून भागविता येतील. सभापती महोदय, या गिरणीवर कोणत्याही वित्तीय संस्थेची कर्ज नाही. फक्त शासनाचे कर्ज आहे. आता त्यावरील व्याज वाढल्यामुळेच ही जास्त रक्कम दिसत आहे. त्यामुळे या गिरणीवर जे काही कर्ज आहे, ते काल्पनिक आहे. म्हणून या सूत गिरणीची जमीन विकली तर कोट्यावधी रुपये मिळू शकतात आणि त्यातून ही सर्व देणी भागविता येऊ शकतात. म्हणून या बाबतचा प्रकल्प अहवाल तयार करीत असताना या सर्व बाबींचा विचार करुन प्रकल्प अहवाल तयार करण्यास सांगण्यात यावे. त्याप्रमाणेच फेडरेशनकडून या बाबतचा अहवाल मागवावा. त्यानंतर या सर्व बाबींचा अंतर्भाव करुन या बाबतचा प्रस्ताव राज्य सरकारने केंद्र सरकारकडे पाठवावा, अशी माझी विनंती आहे.

श्री. सतिश चुतर्वेदी : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी जी भावना व्यक्त केली आहे, त्याप्रमाणे फेडरेशनकडून या बाबतचा अहवाल अपेक्षित आहे. हा अहवाल आल्यानंतर या बाबतची योग्य ती कारवाई लवकरात लवकर करण्यात येईल. या फेडरेशनचे अध्यक्ष सांगलीचेच असल्यामुळे माननीय सदस्यांनी त्यांच्याकडे आग्रह धरला तर याबाबतचा अहवाल लवकरात लवकर शासनाला मिळू शकेल. हा अहवाल आल्यानंतर त्याचे परीक्षण करुन निर्णय घेण्यात येईल.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, सरकारची या बाबतची धोरणे ठरलेली आहेत. बेरोजगारांना रोजगार मिळाला पाहिजे, असे सरकारचे धोरण आहे. आज त्या ठिकाणी त्या गिरणीतील बेरोजगार दंगा करीत आहेत. सूत गिरणी विकण्यामध्ये अडथळे निर्माण करीत आहेत. त्यामुळे त्या कामगारांवर फौजदारी खटले होत आहेत. या सूत गिरणीची काही जमीन विकून या गिरणीवर असलेली देणी देता येतील. त्यानंतर बंद होत असलेली ही सूत गिरणी पुन्हा सुरु करण्याबाबत शासन काही प्रयत्न करणार आहे काय ?

श्री. सतिश चुतर्वेदी : सभापती महोदय, या बाबत प्रा. फंड कमिशनरांनी कारवाई सुरु केली आहे. त्यांनी या बाबतचे खटले दाखल केले आहे. कामगारांचा प्रा. फंड भरला नाही म्हणून या सूत गिरणीच्या संचालकांवर आणि अध्यक्षांवर खटले दाखल करण्यात आले आहेत. आता या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चतुर्वेदी....

बाबतचा प्रकल्प अहवाल आल्यानंतर या बाबतचा विचार करता येईल. या सूत गिरणीला 40 कोटी रुपयाचे कर्ज असेल आणि या सूत गिरणीचा लॉस 30 कोटी असेल तर याचा विचार करावा लागेल. आता तर हा लॉस 38 कोटी रुपयांवर पोहोचला आहे. एखादी सूत गिरणी सुरु करण्यासाठी 53 कोटी रुपये खर्च येतो. ही सूत गिरणी सुरु करण्यासाठी 65 कोटी रुपये खर्च येणार आहे. त्यामुळे ही सूत गिरणी सुरु करता येते काय ? या बाबतचा निर्णय अहवाल आल्यानंतर शासन घेईल. तसेच या ठिकाणच्या कामगारांच्या देणी देण्याचा प्रश्न देखील उपस्थित होत आहे. त्यामुळे याबाबतचा निर्णय नंतर घेतला जाईल.

सभापती : या गिरणीची 33 एकर अतिरिक्त जागा आहे. एन.ए. करुन प्लॉट पाडून ही जमीन विकण्याचा प्रयत्न केला तर या जागेची किंमत कितीतरी जास्त आहे. कारण ही सूत गिरणी कूपवाडसारख्या मध्यवर्ती ठिकाणी आहे. त्यामुळे या जमिनीची किंमत 30 कोटीपेक्षा जास्त होण्याची शक्यता आहे.

श्री. सतिश चुतर्वेदी : सभापती महोदय, आपली सूचना बरोबर आहे.

सभापती : आज ठिकाणी प्रा. फंड कमिशनरांनी त्या सूत गिरणीची मशिनरी विकण्याचे ठरविले आहे. आता त्या ठिकाणची एखादी एकर जमीन विकण्याचे प्रा. फंड कमिशनरांनी ठरविले तर त्यांचे 1 कोटी 57 लाखांचे देणे फिटू शकेल.

(यानंतर श्री. सरफरे...

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

मा. सभापती...

सन्माननीय सदस्यांची आपल्याला एवढीच विनंती आहे की, प्रॉव्हिडंट फंड कमिशनर कार्यालय हा केंद्रीय अखत्यारीतील विभाग आहे हे त्यांना मान्य आहे. त्यामुळे त्याबाबतीत आपल्याला मर्यादा आहेत हेही त्यांना मान्य आहे. परंतु याबाबतीत आपण केंद्रीय मंत्र्यांना विनंती करु शकतो. त्यांची आपणास विनंती आहे की, ही लिलावाची प्रक्रिया आणखी काही महिने थांबली तर सर्वच प्रश्न सुटणार आहेत. अशी माननीय सदस्यांची याच्या पाठीमागची भावना आहे, व ती योग्य आहे. त्यादृष्टीने आपण प्रयत्न करावेत असे मी या बाबत निदेश देतो.

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, प्रॉव्हिडंट फंड कमिशनरेट हे केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे. परंतु त्यांच्या ज्या प्रोव्हिजन्स आहेत त्या अत्यंत कडक आहेत. याबाबतीत माननीय सदस्यांनी केंद्र शासनाकडे पत्र पाठवून किंवा तुम्ही वसूली स्थगित करा असे आम्ही त्यांना पत्र पाठवून सांगू शकत नाही.

सभापती : प्रॉव्हिडंट फंड कमिशनरना आपण सूचित करा असे मी म्हणणार नाही. त्या संबंधित विभागाचे जे केंद्रीय मंत्री आहेत त्यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने, सन्माननीय मंत्र्यांच्या वतीने किंबहुना माननीय मुख्यमंत्र्यांच्या वतीने लिहू शकता.

श्री. विलासराव शिंदे : सभापती महोदय, या सूतगिरणीचे भविष्य निर्वाह निधीचे हप्ते देणे बंद झाले आहे. त्याबाबतीत महाराष्ट्र सरकारने पुढाकार घेऊन प्रॉव्हिडंट फंडाची थकित रक्कम देण्याच्या बाबतीत सदर गिरणीकडील जमिनीची विक्री लिलावाव्दारे केली तर त्यामधून थकित असलेली देणी देता येतील. ती प्रक्रिया करण्यासाठी कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही. मंत्रिमहोदयांनी सांगितल्याप्रमाणे सूतगिरणी चालू करण्यासाठी 63 कोटींची आवश्यकता आहे.परंतु यासंबंधीचा अहवाल वेगळा आहे. ही सूतगिरणी चालू करण्यासाठी जमिनीची किंमत गृहीत धरुन बाकीची प्रक्रिया सुरु केली तर त्यामध्ये अडचण येणार नाही असे माझे मत आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, भविष्य निर्वाह निधीच्या बाबतीत नेहमी मोठा बाऊ केला जातो. माझा प्रश्न असा आहे की, एवढी मोठी रक्कम त्यांच्याकडे येणे आहे हे माहीत असतांना आपली यंत्रणा काय करीत होती? प्रॉव्हिडंट फंडाचा इन्सपेक्टर प्रत्येक महिन्याला जातो, त्यांचे ॲक्युम्युलेट पैसे किती आहेत याची चौकशी करतो. या ठिकाणी पाहिले तर ही रक्कम 1 कोटी 57 लाख रुपये इतकी शिल्लक आहे. माझा प्रश्न असा आहे की, ही वसंतदादा सहकारी सूत गिरणी केव्हां बंद झाली? प्रॉव्हिडंट फंड कार्यालयाकडून प्रॉव्हिडंट फंडाच्या रकमा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

ॲक्युम्युलेट करावयाच्या कां राहिल्या? आतापर्यंत त्यांच्याकडून वसूली कां केली नाही? एवढी मोठी थकित रक्कम झाल्यानंतर ही गिरणी बंद व्हावी म्हणून प्रॉव्हिडंट फंड कार्यालयाकडून अटॅचमेंट आणली जात आहे असा त्याचा अर्थ होतो. आणि जर अटॅचमेंट आणली जात नसेल तर ही गिरणी बंद व्हावी असे त्यांना कां वाटते?

सभापती : खरी परिस्थिती अशी आहे की, आर्थिकदृष्टया हे युनिट पहिल्यापासूनच आजारी होते. त्यामुळे त्या त्यावेळच्या प्रॉव्हिडंट फंडाच्या रकमा काही प्रमाणात स्थगित ठेवण्यात येत होत्या. सन 2002 मध्ये ही गिरणी पूर्णतया बंद झाली. त्यामुळे या रकमा वाढत गेल्या. या गिरणीकडे 33 एकर जमिनीचे मोठे ॲसेट्स आहे. त्या जमिनीच्या विक्रीतून 30 ते 32 कोटी रुपयांचा निधी उभा होऊ शकतो.

श्री. मधुकर सरपोतदार : या बाबतीत एक शिष्टमंडळ जर प्रॉव्हिडंट फंड कमिशनरना जाऊन भेटले व त्यांना विनंती केली की, आम्ही आपले पैसे भरु शकतो. परंतु आम्हाला अवधी मिळाला पाहिजे. असे जर केले तर ते मान्य होऊ शकेल.

सभापती : या बाबतीत प्राथमिक उपाय योजना म्हणून गिरणी कामगारांनी, कार्यकर्त्यांनी आणि माननीय सदस्य श्री.शरद पाटील यांनी व अन्य माननीय सदस्यांनी माननीय मंत्रिमहोदय किंवा माननीय मुख्यमंत्र्यांच्या पातळीवर केंद्रीय मंत्र्यांकडे या संबंधी पाठपुरावा केला तर ही वसूली थांबण्याची शक्यता आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे जर उपाय योजना केली तर प्रॉव्हिडंट फंड कमिशनर मान्य करतील. मी या बाबतीत अनुभव घेतलेला आहे.

सभापती : सांगलीकरांना यापूर्वीचा वेगळा अनुभव आहे. तेव्हा त्याची चर्चा करणे आपल्या हिताचे नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

पृ.शी.: मार्च 2005 ते जून 2005 या कालावधीत कापसाला लागलेल्या 111 आगी.

मु.शी.: मार्च 2005 ते जून 2005 या कालावधीत कापसाला लागलेल्या 111 आगी यासंबंधी सर्वश्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, विनायकराव मेटे, जितेंद्र आव्हाड, प्रा.फौजिया खान, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री. सदाशिवराव पोळ, गुरुनाथ कुलकर्णी, वसंतराव काळे, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनायक मेटे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पणन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो व त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"यंदाच्या हंगामात कापसाला लागलेल्या आगींनी नवा उच्चांक गाठला असून मार्च 2005 ते जून 2005 या कालावधीत आगीच्या तब्बल 111 घटना घडणे, आगीमुळे महासंघाचे जवळपास 36 कोटी रुपयांचे नुकसान होणे, परिणामी आगीच्या कारणांचा शोध घेण्याची चौकशी करण्याबाबत महासंघातर्फे करण्यात आलेली मागणी, याबाबत शेतकरी वर्गात पसरलेले असंतोषाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (पणन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .2 ए-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, याठिकाणी जे उत्तर दिलेले आहे, त्याला माझी हरकत आहे. याठिकाणी दिलेले उत्तर आणि माझ्याकडे असलेली माहिती जुळत नाही. म्हणून माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांना यामध्ये काही सुधारणा करावयाची असेल तर त्यांनी तसे सांगावे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, याठिकाणी दिलेले उत्तर बरोबर आहे. ते सुधारण्याची काही आवश्यकता नाही.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माझ्याकडे जी माहिती आहे, त्यानुसार या हंगामामध्ये 111 आगी लागल्या होत्या. माझ्याकडे यासंबंधात विभागनिहाय तक्ता आहे. पण याठिकाणी उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, 59 ठिकाणी आगी लागल्या आहेत, हा एक फरक आहे. दुसरे म्हणजे यामध्ये नुकसान किती झाले ? तर माझ्याकडील माहितीनुसार 36 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे आणि उत्तरामध्ये म्हटले आहे की, 24.15 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. तेव्हा नक्की काय आहे ? ही दिशाभूल कशासाठी केली आहे ? कारण माझ्याकडील माहिती ही पणन महासंघाचे मुख्य प्रशासक आणि या सदनाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.हिराणी साहेबांनी दिलेली आहे आणि ज्या पणन महासंघामार्फत कापसाचे व्यवहार होतात. तेव्हा त्यांनी दिलेली माहिती खरी आहे की माननीय मंत्री महोदयांनी दिलेली माहिती खरी आहे ? याचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा आणि त्यानंतर पुढे चर्चा करावी.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे साहेबांनी जो प्रश्न विचारला आहे आणि जी माहिती दिली आहे, ती बरोबर आहे. 111 आगी लागल्या आहेत आणि 37 कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. पण ते पूर्ण हंगामातील आहे. सन्माननीय सदस्यांनी आपल्या सूचनेमध्ये मार्चपासून किती आगी लागल्या आणि त्यात किती नुकसान झाले, ज्या विहित काळाच्या बाबतीत आपण विचारलेले आहे. त्या विहित काळामध्ये 59 ठिकाणी आगी लागल्या आणि 24.15 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, यावर्षी मोठया प्रमाणात कापूस खरेदी करण्यात आली आणि त्याची आकडेवारी उत्तरात दिलेली आहे. 59 ठिकाणी आगी लागल्या की लावल्या ? तसेच त्यामध्ये 36 कोटीचे किंवा 24 कोटीचे नुकसान झालेले आहे. पण याची भरपाई कोण करणार आहे ? याचा विमा उतरविणार आहात का ? की शासनावर याचा भूर्दंड पडणार

. . . .2 ए-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे ? या आगीच्या बाबतीत चौकशी केली आहे का ? केली असल्यास त्याबाबतचा अहवाल काय आहे ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, कॉटन फेडरेशन सेल्फ इन्शुरन्स् योजना राबवित होती. त्याप्रमाणे ते इन्शुरन्सची वेगळी रक्कम स्वत:ची स्वत:कडे ठेऊन घेत होते. त्यातून ही नुकसान भरपाई ग्राहय धरली जात होती. त्यापूर्वीच्या काळात इन्शुरन्स्ची 137 कोटी रुपयांची रक्कम डायरेक्ट कंपनीला भरण्याऐवजी स्व-विमा योजनेच्या माध्यमातून कॉटन फेडरेशनकडे होती. यावर्षी इन्शुरन्स् कंपनीकडे पैसे भरले असते तर ती रक्कम जवळपास 24 कोटीच्या आसपास झाली असती. याठिकाणी 37 कोटीचे नुकसान झाले आहे आणि मागच्या चार-पाच वर्षाची जी जमा रक्कम आहे, त्यातून ही सर्व रक्कम ॲडजेस्ट होईल. त्यामुळे शासनाला ही नुकसान भरपाई देण्याची गरज नाही.

सभापतीस्थानी -तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदया, मा.मंत्री महोदयांनी संपूर्ण वर्षभरामध्ये 37 कोटी रुपयाचे नुकसान झालेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी साहेबांनी सांगितले त्याप्रमाणे कापसाला आगी लावल्या गेलेल्या आहेत, याची देखील चौकशी केली गेली पाहिजे. दुसरा प्रश्न असा आहे की, या चौकशीसाठी समिती नेमलेली आहे त्यांचे काय निकष आहेत ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : या सर्व आगी लागलेल्या आहेत, त्याची चौकशी चालू आहे. चौकशी समिती ही साधरणत: 5 लाखापेक्षा जास्त नुकसान झाले असेल तर जिल्हाधिकारी त्याची चौकशी करतात, 10 हजार ते 5 लाखापर्यन्त उप जिल्हाधिकारी चौकशी करतात आणि त्या खालच्या रक्कमेचे नुकसान झाले असेल तर तहसिलदार चौकशी करतात. यामध्ये कोणी दोषी आढळले तर त्यांच्यावर जबाबदारी फिक्स करण्यात येते. कापसाची खरेदी यावर्षी फार मोठयाप्रमाणावर झाल्यामुळे यंत्रणेवर प्रचंड ताण आलेला आहे. कापसांना आगी लागलेल्या आहेत. यातील 10 प्रकरणांमध्ये आग लावण्यात आली. त्यामध्ये चौकशी चालू आहे. विशेषत: अकोल्यामधील गोदामातील कापसाच्या गाठींना आग लागली, त्याची चौकशी करुन 2 ते 3 अधिकाऱ्यांना निलंबित केलेले आहे.

श्री. धोंडीराम राठोड : आगीच्या संदर्भात मंत्री महोदयांनी सांगितले की 5 लाखापेक्षा अधिक नुकसान झालेले असेल तर जिल्हाधिकारी त्याची चौकशी करतील वगैरे सांगितले. या संबंधात निकष सांगितले. परंतु यामध्ये महत्वाची गोष्ट अशी आहे की, शेतकऱ्यांच्या कापसाचे माप घेत असतांना ते वेळेमध्ये घेत नाहीत. एका गाडीमध्ये 300 ते 500 क्विंटल कापूस असतो असे गृहित धरले जाते. परंतु तीन-तीन, चार-चार गाड्यांमधून आलेला कापूस 500 क्विंटलही भरला गेलेला नाही,त्याचे व्यवस्थित मोजमाप केले जात नाही. ग्रेडर बरोबर माप घेत नाहीत. जागा नाही म्हणून गाडीतील कापूस घेतला जात नाही. उशिरा कापूस मोजून घेतला जातो. यामध्ये भ्रष्टाचार केला जातो. उशिरा कापूस घेतल्यामुळे मोठयाप्रमाणात जिनिंगमध्ये कापूस साचून राहतो. एकेका जिनिंगमध्ये दोन-दोन, तीन-तीन वेळा आगी लागतात, याला काय समजायचे ? माझ्या मंठा कापूस केंद्राच्या संबंधाने जिल्हाधिकारी आणि कॉटन फेडरेशनकडे तक्रार केलेली आहे. जिनिंगमध्ये वर्षातून तीनवेळा आगी त्या ठिकाणी लागतात.] याची काय कारणे आहेत, याचा आपण शोध घेणार आहात की नाही ? कापसाचा इन्शुरन्स केलेला आहे, त्याच्या नावाखाली एकापेक्षा अधिक वेळा आगी लावल्या जातात. अशा जिनिंगची वेगळ्या पध्दतीने चौकशी झाली पाहिजे, त्यांना सोडता कामा नये. कारण इन्शुरन्स कंपनी पैसे देणार म्हणून आपण सोडून उपयोगाचे नाही. या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.धोंडीराम राठोड (पुढे चालू...

आगीच्या कारणांचा शोध घेतला पाहिजे, जबाबदार अधिकाऱ्यांकडून त्याबाबतची चौकशी झाली पाहिजे. चौकशी समिती नेमल्यानंतर त्या समितीला मुदतवाढ दिली जाते, अहवाल येण्यास उशीर होतो, तोपर्यन्त मूळ प्रकरण थंड होते, असे न होता प्रकरण तापत असतांनाच कार्यवाही झाली पाहिजे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली त्याप्रमाणे चौकशी करुन त्यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर निश्चित सक्त कारवाई केली जाईल. आगी लागणे ही चिंतेची बाब आहे. यापूर्वी एवढया मोठयाप्रमाणत आगी लागल्या नव्हत्या ही वस्तुस्थिती आहे. या प्रकरणांचा चौकशी करुन कारवाई करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : 111 ठिकाणी आगी लागलेल्या आहेत. एकाच कापूस केंद्रामध्ये सातत्याने तीन वेळा आगी लागलेल्या आहेत, ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : यावर्षी आगी जास्त प्रमाणात लागलेल्या आहेत. काही गोदामामध्ये, काही ठिकाणी जिनिंगमध्ये आगी लागलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केल्याप्रमाणे चौकशीमध्ये माहिती मिळाल्यानंतर ती पटलावर ठेवण्यात येईल.

यानंतर कु.थोरात....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, उत्तरात असे म्हटले आहे की, "मार्च,2005 ते जून, 2005 पर्यंत वेगवेगळया ठिकाणी कापसाला 59 ठिकाणी आगी लागून अंदाजे रु.24.15 कोटी इतके नुकसान झालेले आहे". सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी 111 ठिकाणी कापसाला आगी लागल्याच्या घटना घडलेल्या आहेत असे म्हटले आहे. याचा अर्थ असा की, डिसेंबर, जानेवारी आणि फेब्रुवारी हा तीन महिन्याचा उर्वरित काळ राहिला. जुलैमध्ये कापसाला आगी लागण्याचा प्रश्न येत नाही. सभापती महोदय, डिसेंबर, जानेवारी आणि फेब्रुवारी हे तीन थंडीचे महिने असतांना कापसाला आगी लागणे संशयास्पद वाटते. त्या काळात जिनिंग ॲन्ड प्रेसिंग फॅक्टरीजना पाण्याची व्यवस्था केल्याशिवाय जिनिंगची प्रोसेस करता येत नाही, असे बंधनकारक केले होते. असे असतांना या तीन महिन्यात 52 ठिकाणी आगी लागलेल्या आहेत, ही अत्यंत गंभीर बाब आहे. या आगीचे कारण काय हे मंत्रिमहोदयांनी सांगावे?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, आगी लागण्याची अनेक कारणे असू शकतात. आग लागण्याचे एक कारण असे असू शकते की, गठाण पट्टया एकमेकांवर घासल्या की आग लागू शकते. ट्रॅक्टरच्या सायलेन्सरमधून ठिणगी बाहेर निघाली की आग लागू शकते. जिनिंग हाऊसमध्ये दगड, गारगोटया असतात त्यांचे घर्षण झाल्यामुळे जिनिंग फॅक्टरीमधून जे इलेक्ट्रीक पोल्स आणि लाईव्ह वायर जात असतात, त्यामध्ये आग लागू शकते. आगी लागण्याच्या अशा आठ-दहा बाबी आहेत. या सगळया बाबींची चौकशी चालू आहे. जे जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, हया आगी डिसेंबर, जानेवारी आणि फेब्रुवारी या महिन्यात लागल्या आहेत, हे खरे आहे काय?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : बरोबर आहे.

श्री. वसंत काळे :सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय, मूळ प्रश्नाला बगल देण्यासाठी आग कशामुळे लागू शकते यासंबंधीची माहिती देत आहेत. आग कशामुळे लागू शकते, आग कां लागते याचे उत्तर आम्ही विचारलेले नाही. सभापती महोदय, आगी लावल्या गेल्या आहेत, त्याचे उत्तर मिळाले पाहिजे. आगी लावल्या जातात. या ठिकाणी श्री. राठोड सहेबांनी यासंबंधीची माहिती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंत काळे.....

दिलेली आहे. कापसाचे वजन व माप करतांना, तेथे झालेला भ्रष्टाचार लपविण्यासाठी या आगी लावल्या जातात, असा आमच्याकडे असलेल्या माहितीचा निष्कर्ष आहे. हे दर वर्षी घडते. आणि पुन्हा त्याच परंपरागत पध्दतीने मंत्रिमहोदय उत्तर देतात. आगीच्या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनाही त्यांची स्वत:ची खाजगी पातळीवर माहिती आहे. पण अधिका-यांनी लिहून दिलेल्या उत्तरापलीकडे त्यांना जाता येत नाही, असे मला वाटते. आणि म्हणून कापूस दरवर्षी कां जळतो? याचा मूलभूत विचार करुन, सरकार त्याबाबत काही निर्णय घेणार आहे काय? गेल्या वर्षी अशा घटना घडल्या असतील, त्याची चौकशी झाली असेल व त्या घटनांच्यासंदर्भात कोणाला शिक्षा झालेली आहे काय? त्या पूर्वी, ज्या ज्या वर्षी कापसाला आग लागलेली आहे, त्याबाबतीत दोषी आढळून आलेल्या किती लोकांना शिक्षा झालेली आहे, किती लोकांवर कारवाई झालेली आहे आणि किती जिनिंग प्रेसिंग मिलचे लायसन्स रद्द केलेले आहेत, यासंबंधीची माहिती देण्यात यावी. तसेच दर वर्षी कापूस कां जळतो याचा शासनाने मूलभूतपणे विचार करावा. बीड, परभणी व नांदेड जिल्हयामध्ये जिनिंग फॅक्टरीजनी लोकांना मोठया प्रमाणात नाडण्याचा धंदा केलेला आहे. त्याबाबतची संपूर्ण माहिती घेऊन, नि:पक्षपातीपणे चौकशी करुन, दोषी असलेल्या जिनिंग फॅक्टरीज्वर मूलभूत पध्दतीने आणि स्वतंत्रपणे कारवाई करण्यात येणार आहे काय?

यानंतर श्री. बरवड ...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव काळे यांनी जी सूचना केलेली आहे त्याप्रमाणे चौकशीमध्ये जर जिनिंगवाले दोषी आढळून आले तर त्यांच्यावर किंवा इतर जे कोणी दोषी आढळून येतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. जिनिंगची सुध्दा चौकशी चालू आहे. चौकशीचा निकाल येईपर्यन्त काही जिनिंगची बिले थांबवून ठेवलेली आहेत. त्यांच्यावर सुध्दा कारवाई होईल. आपण सुचविल्याप्रमाणे प्रसंगी लायसन्स सुध्दा रद्द करण्यात येतील. आपण जे सांगितले त्यादृष्टीने विचारविनिमय चालू आहे. पुढच्या काळात या पध्दतीमध्ये सुधारणा करुन जिनिंग प्रेसिंग मालकांना सुध्दा जबाबदार ठरविण्याच्या बाबतीत चर्चा केली. पुढच्या वेळी निश्चितपणे याबाबतीत जादा खबरदारी घेण्यात येईल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी विचारले की, मी दिलेली माहिती बरोबर आहे काय ? त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, ती माहिती बरोबर आहे. सन्माननीय सदस्यांनी माहिती दिली की, हा संपूर्ण कापूस जळाल्यामुळे 37 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले की, 24 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. पणन महामंडळाचे अध्यक्ष डॉ. एन. पी. हिराणी या सभागृहाचे सदस्य आहेत. ते या ठिकाणी उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे 37 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे आणि माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरामध्ये 24 कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगितले आहे. सन्माननीय सदस्य डॉ. एन. पी. हिराणी यांना माझी विनंती आहे की, खरी परिस्थिती काय आहे हे त्यांनी सांगावे.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : माननीय मंत्रिमहोदय खरी परिस्थिती सांगतील.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदया, मार्च पासून जूनपर्यन्त किती आगी लागल्या या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, 59 आगी लागल्या आणि नुकसान 24 कोटी रुपयांचे आहे. सर्व हंगामामध्ये 111 आगी लागलेल्या आहेत आणि त्याचे नुकसान 37 कोटी रुपयांचे आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदया, या ज्या आगी लागलेल्या आहेत त्या सरळसरळ जिनिंगचे मालक, मार्केट कमिटीचे त्या ठिकाणचे लोक आणि पणन महासंघाचे त्या ठिकाणचे लोक किंवा अधिकारी यांच्या संगनमताने लावल्या जातात. माननीय मंत्रिमहोदयांनी आगी लागण्याची कारणे सांगितली पण मुख्य कारण त्यांनी सांगितले नाही. माणसे आगी लावतात हे त्यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. विनायक मेटे .....

सांगितले नाही. जास्तीत जास्त आगी या तिन्ही लोकांच्या संगनमताने लागलेल्या आहेत. या आगी का लावल्या जातात तर प्रत्येक जिनिंगवर जास्त कापूस लावलेला आहे. अनेक ठिकाणी जादा दराचा भाव लागलेला आहे. वजन झालेल्या कापसाची सुध्दा परत परत मोजणी झालेली आहे. त्यामुळे या आगी लावल्या गेलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. राठोड साहेबांनी सांगितले की, काही ठिकाणी दोन दोन, तीन तीन वेळा आगी लागलेल्या आहेत. बीड जिल्हयामध्ये अशा अनेक जिनिंग आहेत की, ज्या ठिकाणी दोन दोन वेळा आगी लागलेल्या आहेत. बीड जिल्हयामध्ये ज्या आगी लागल्या त्या ठिकाणी जिल्हाधिकारी, एस.पी. आणि मी स्वत: गेलो. त्यांनी चौकशी केली. त्यांनी चौकशीचा रिपोर्ट पाठविला की, या आगी लागलेल्या नसून या तिन्ही लोकांच्या संगनमताने आगी लावल्या गेलेल्या आहेत, त्यांच्यावर कारवाई व्हावी. तरीही काही होत नाही. मी केवळ बीडपुरते बोलत नाही. या सगळया प्रकरणाची आपण सी.आय.डी.मार्फत चौकशी करुन ज्यांनी या आगी लावल्या असल्याचे सिध्द होईल त्यांच्या विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करणार काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदया, मोठी प्रकरणे अगोदरच सी.आय.डी.कडे दिलेली आहेत. ज्यामध्ये 1 कोटी रुपयांच्यावर नुकसान आहे अशी पाच सहा प्रकरणे त्यांच्याकडे दिलेली आहेत. याही प्रकरणामध्ये पुन्हा चौकशी करुन बीडच्या बाबतीत जो चौकशी अहवाल येईल आणि ...

श्री. विनायक मेटे : केवळ बीडच्या बाबतीत नाही तर या संपूर्ण प्रकरणाच्या बाबतीत आपण सांगावे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : चौकशी अहवालाच्या आधारे जे जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. दोषी असल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई सुध्दा करण्यात येईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदया, कापसाला लावल्या गेलेल्या आगीचे प्रकरण अत्यंत गंभीर अशा प्रकारचे प्रकरण आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परंतु शासन अद्याप त्याबाबत गंभीर असल्याचे दिसत नाही. सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे यांनी 3 मुद्दे उपस्थित केलेले आहेत. पणन महासंघाचे कर्मचारी, बाजार समिती आणि जिनिंगची मंडळी यांच्या संगनमताने आगींची प्रकरणे घडतात आणि कोटयवधी रुपयांचे नुकसान होते. त्यामुळे त्यांनी या आगीच्या प्रकरणाची सीआयडीमार्फत चौकशी करावी अशी मागणी केली आहे. मंत्रिमहोदयांनी यापूर्वीच काही प्रकरणांची सीआयडी चौकशी सुरु असल्याचे सांगितले आहे. परंतु या संपूर्ण आगीच्या प्रकरणाची नि:पक्षपातीपणाने चौकशी व्हावी आणि ज्यांचे ज्यांचे हितसंबंध आर्थिक संबंध, राजकीय संबंध गुंतलेले आहेत अशा लोकांचे पितळ उघडे पाडण्यासाठी आणि या चौकशीमध्ये पारदर्शकता यावी यासाठी उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीमार्फत चौकशी करण्याची शासनाची तयारी आहे काय ?

श्री.जयप्रकाश दांडेकर : शासनाचे जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार हे अधिकारी अशाप्रकारच्या प्रकरणांच्या पूर्ण चौकशा करीत आहेत आणि शासन कोणालाही पाठिशी घालत नाही. यावर्षी विशिष्ट परिस्थिती होती. पूर्वी कधी 150 लाख क्विंटलच्यावर कापूस आलेला नाही. परंतु यंदाच्या वर्षी 211 लाख क्विंटल कापूस आला इतकी प्रचंड आवक होती. स्टोअर करण्याची अडचणी होती. जिनिंगची, प्रेसिंगची अडचण होती. पणन महासंघाने यापूर्वीच्या दोन हंगामामध्ये कापूस कमी आल्यामुळे स्टाफ कमी केला होता. त्यामुळे ब-याच कर्मचा-यांना कंत्राटी पध्दतीने घ्यावे लागले. ज्यांना व्हीआरएसवर पाठविले त्यांनाच परत घ्यावे लागले, त्यामुळे कामाच्या प्रचंड ताणामुळे काही गोष्टी झालेल्या आहेत. परंतु शासन कोणालाही पाठिशी घालत नाही. आपल्या लोकांचे चौकशी अहवाल येतील त्याच्या आधारावर संबंधितांवर कडक कारवाई केली जाईल.

श्री.अरविंद सावंत : आताच सन्माननीय मंत्रिमहोदयांनी व्हीआरएसचा उल्लेख केला आहे. मागील अधिवेशनामध्ये मी यासंबंधीचा उल्लेख केलेला होता. शासनाने व्हीआरएस आणल्यामुळे तेथील कर्मचारी कमी झाले आहेत. त्याठिकाणी प्रशिक्षित कर्मचारी असावा लागतो. ज्यांना व्हीआरएस घेण्यास भाग पाडले त्यांनाच पुन्हा कामावर बोलवावे लागले. मग शासन व्हीआरएसच्या निर्णयापर्यंत पोहोचते कसे ? तुमच्याकडे जादा कर्मचारी असल्यामुळे व्हीआरएस आणली. प्रत्यक्षात तुम्हाला त्या कर्मचा-यांची गरज भासली आहे. शासनाने यापुढे पूर्ण विचार

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केल्याशिवाय व्हीआरएस आणू नये. कंत्राटी पध्दतीने कामावर घेतलेल्या कर्मचा-यांमुळे गोंधळ वाढतो, त्यांना कळत नाही. मग काही करा, पैसे कमी द्या, असा प्रकार होतो. म्हणून व्हीआरएसबाबत काटेकोरपणे निर्णय घेतला पाहिजे. याचे दुष्परिणाम काय होतात ते शासनाला कळले आहे, या आगींमुळे 37 कोटींचे नुकसान झालेले आहे. शासनाने व्हीआरएससाठी किती पैसे दिले आहेत आणि आगीमुळे शासनाला किती तोटा सहन करावा लागला आहे ते सांगावे. म्हणून या प्रशिक्षित कर्मचा-यांना पुन्हा कायम सेवेमध्ये घेतले जाणार आहे काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : पुढील हंगामासाठी विचारविनिमय चालू असून मा.सदस्यांच्या सूचनेचा निश्चित विचार केला जाईल.

3....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

विशेष उल्लेखाच्या सूचना

पृ.शी. : वन विभागाच्या नागपूर परिक्षेत्रात विविध स्तरावरील पदे रिक्त असणे.

मु.शी. : वन विभागाच्या नागपूर परिक्षेत्रात विविध स्तरावरील पदे रिक्त असणे याबाबत प्रा.जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"वन विभागाच्या नागपूर परिक्षेत्रात विविध स्तरावरील सुमारे 1272 पदे मागील दोन वर्षांपासून रिक्त आहेत. अपु-या कर्मचा-यांमुळे लाकूडचोरी व वन्यप्राण्यांच्या हत्येचे प्रमाण वाढले आहे. मागील दोन वर्षापासून उपवनसंरक्षकाच्या 26, सहाय्यक वनसंरक्षकाच्या 63, वनपरिक्षेत्र अधिकारी 160, वनपालाची 780 पदे रिक्त आहेत, ही पदे भरण्यात न आल्याने काम करणा-या कर्मचा-यांवर कामाचा अधिक बोजा पडत आहे. नागझीरा, ताडोबा येथेही कमी कर्मचारी असल्याने शिकारीचे प्रमाण वाढले आहे, या रिक्त जागा त्वरित भरण्याची कारवाई शासनाने करावी यासाठी सदर बाब सभागृहात सादर करीत आहे."

सभापती महोदय, वन विभागाच्या नागपूर परिक्षेत्रातील विविध स्तरावरील सुमारे 1272 पदे मागील दोन वर्षांपासून रिक्त आहेत आणि अपु-या कर्मचा-यांमुळे या परिक्षेत्रातील जंगल व लाकूड चोरी, चंदनाची झाडे तोडण्याचे आणि त्याची तस्करी करण्याचे प्रमाण, वन्यप्राण्यांच्या हत्येचे प्रमाण वाढत आहे. मागील दोन वर्षापासून उपवनसंरक्षकाची 26, सहाय्यक वनसंरक्षकाची 63, वनपरिक्षेत्र अधिकारी 160 आणि वनपालाची 780 पदे रिक्त आहेत. ही पदे न भरल्यामुळे काम करणा-या वन विभागाच्या कर्मचा-यांवर कामाचा अतिरिक्त बोजा पडत आहे. नागझिरा, ताडोबा या विभागामध्ये कर्मचा-यांची संख्या अपुरी असल्यामुळे शिकारीचे प्रमाण वाढले आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. जोगेंद्र कवाडे पुढे सुरु...)

त्यामुळे वन्यप्राण्यांची मोठया प्रमाणावर शिकार केली जात आहे. या कर्मचा-यांच्या/अधिका-यांच्या रिक्त जागांमुळे ही गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. ही परिस्थिती दूर करण्यासाठी या रिक्त जागा त्वरित भरण्याची कारवाई शासनाने करावी अशी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाला विनंती करीत आहे. धन्यवाद.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : 10वी व 12वीच्या परीक्षेत कमी गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्यास येत असलेल्या अडचणी

मु.शी. : 10वी व 12वीच्या परीक्षेत कमी गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्यास येत असलेल्या अडचणी याबाबत श्री.संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, नुकताच इयत्ता 10वी आणि 12वी इयत्तेचा निकाल जाहीर झाला असून मुंबई शहरात व उपनगरात विद्यार्थी वर्ग व पालक वर्ग पुढील वर्गाच्या प्रवेशासाठी प्रत्येक कॉलेजच्या दारी फिरत आहे. इ. 10वीमध्ये 85 टक्के गुण प्राप्त असूनही आपल्या घराजवळच्या कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांला प्रवेश मिळत नाही. मात्र लांब राहात असलेल्या विद्यार्थ्याकडे प्रवेशासाठी आवश्यक ते गुण असल्यामुळे त्याला मात्र प्रवेश दिला जातो, ही पध्दत अत्यंत चुकीची आहे. यावर विचार करण्याची गरज आहे. मुंबईतील रुईया,रुपारेल पार्ले, केळकर या महाविद्यालयामध्ये 89टक्के गुण असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला गेला आहे असे समजते. फक्त हुशार विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन बोर्डामध्ये आपल्या कॉलेजचे नाव झळकावे म्हणून अत्यंत चुकीच्या पध्दतीने ही कॉलेजेस प्रवेश प्रक्रिया पार पाडतात. 90 टक्के गुण प्राप्त असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन बोर्डत सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळविण्यापेक्षा 35 टक्के, 50 टक्के गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्याना प्रवेश देऊन त्यांना बोर्डाच्या गुणवत्ता यादीत आणण्याचा प्रयत्न करावा व शासनाने अशा शाळा महाविद्यालयांचा गौरव करावा. अशा शाळा महाविद्यालयाच्या प्रवेशाविषयी मी आपणांस नम्र विनंती करु इच्छितो की, घराजवळ असलेल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळणे हा त्या विद्यार्थ्यांचा हक्क समजण्यात येऊन मुंबईतील प्रत्येक शाळा महाविद्यालयात सर्वश्रेणीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे आदेश शासनाकडून व्हावेत. कमी गुण असलेला विद्यार्थी कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ येथे प्रवेशासाठी जातो तर कल्याण-डोंबिवली मधील अधिक गुण प्राप्त झालेला विद्यार्थी दादर-चर्चगेटला

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय दत्त...)

येतो. ही विपर्यस्त परिस्थिती शासनाने थांबवावी व रहातो तिथे प्रवेश हा नियम शासनाने बनवावा व शासनास तसे आदेश व्हावेत अशी विनंती मी या विशेष उल्लेखाच्या निवेदनामार्फत शासनास करीत आहे.

--

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कल्पवृक्ष मार्केटिंग डिपॉझिटर्स कल्याणकारी संस्था, कोल्हापूर या शाखने गुंतवणूकदारांची केलेली कोट्यवधी रुपयांची फसवणूक

मु.शी. : कल्पवृक्ष मार्केटिक डिपॉझिटर्स कल्याणकारी संस्था, कोल्हापूर या शाखेने गुंतवणूकदारांची केलेली कोट्यवधी रुपयांची फसवणूक याबाबत प्रा. शरद पाटील यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती : माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा. शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"कल्पवृक्ष मार्केटिंग डिपॉझिटर्स कल्याणकारी संस्था, कोल्हापूर या शाखेत ठेवीवर आकर्षक व्याजाचे आमिष दाखवून करोडो रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. सदर कंपनी, कंपनी ॲक्टखाली रजिस्टर असताना बँक सदृश्य व्यवहार करुन जनतेकडून करोडो रुपयांच्या ठेवींचा अपहार केला आहे. सुशिक्षित तरुण, महिलांना खोटी आमिषे दाखवून त्यांचे मेहनतान्याचे पैसे न देता त्यांच्याही मार्केटिंग डिपॉझीटच्या पावत्या त्यांना दिल्या जात. ठेवीदार फिल्डस्टाफ, ठेवीदार अशी समाजाची फसवणूक सदर कंपनीने केली आहे. कंपनीचे कार्यक्षेत्र महाराष्ट्रासह नऊ राज्यात 65 शाखातून कंपनीने विविध ठिकाणी 17 प्रकारच्या योजनांचे आमिष दाखवून जनतेकडून पैशाची लयलूट केलेली आहे. कोल्हापूर जिल्हयातील कोल्हापूर, इचलकरंजी, गडहिंग्लज, कागल, जयसिंगपूर येथे 15 कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाले. ठेवीदारांनी व प्रतिनिधींनी दिनांक 12 एप्रिल 2004 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूरवर मोर्चा काढून या गंभीर प्रकाराचे निवेदन दिले. ठेवीदारांचा तगादा प्रतिनिधींना लागला असून प्रतिनिधींचे जगणे मुश्किल झाले आहे. त्यासाठी शासनाने या गंभीर प्रकरणाची नोंद घेऊन ठेवीदारांना न्याय द्यावा व फसवणूक करणा-यांवर कडक कारवाई करावी, ही विनंती.

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. शरद पाटील पुढे सुरु...)

सभापती महोदय, कल्पवृक्ष मार्केटिंग प्रा.लि. ही कंपनी उमेश खडे या इसमाने 1998साली स्थापन केली. त्या कंपनीची रितसर नोंदही केली. कल्पवृक्ष या नावाखाली कल्पवृक्ष सेतू प्रकल्प, कल्पवृक्ष सुपर मार्केट, कल्पवृक्ष रियल इस्टेट, कल्पवृक्ष शालेय गणवेष योजना, कल्पवृक्ष कॉम्प्युटर ट्रेनिंग स्कूल, कल्पवृक्ष शालेय संगणक योजना अशा विविध प्रकारच्या योजना जाहीर करुन ठेवीदारांना आकर्षक व्याजदाराचे आमिष दाखवून, बेरोजगार तरुणांना आणि महिलांना आकर्षक कमिशन देण्याची घोषणा करुन कोट्यवधी रुपयाची रक्कम ठेवीच्या स्वरुपात गोळा केली. ही कंपनी 9 राज्यातून 65 शाखांच्या माध्यमातून काम करीत होती. एकूण 18 लाख ठेवीदार, साडेतीन लाख एजण्ट यांना जवळ जवळ 500 कोटी रकमेला या कपंनीने फसविले आहे. या कंपनीच्या कोल्हापूर शहरातील एक हजार ठेवीदारांनी आणि एजण्टांनी जिल्हाधिकारी कचेरीवर मोर्चा काढून या कंपनीच्या व्यवस्थापकांना अटक करावी, त्यांनी लोकांकडून घेतलेल्या पैशाची वसुली करावी, ..

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री. शिगम 15:40

प्रा.शरद पाटील...

आणि कायदेशीर मार्गाने या सर्व बाबींची चौकशी करुन ठेवीदारांचे आणि एजन्टांचे पैसे परत करावेत अशी मागणी शासनाकडे केली होती. परंतु शासनाने या प्रकरणाबाबत कोणतीही हालचाल अद्यापपर्यन्त केलेली नाही. मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला विनंती करतो की, कल्पवृक्ष मार्केटिंग कंपनीची व त्या उप कंपनीच्या शाखांच्या व्यवहारासंदर्भात उच्चस्तरीय चौकशी करावी. या कंपनीचे संचालक श्री. उमेश खडे व त्यांचे सहकारी संचालका यांच्याकडून सदर रक्कम वसूल करुन ठेवीदार व एजन्ट यांना परत द्यावी अशी मी पुन्हा या निमित्ताने मागणी करतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : जे.जे.महाविद्यालयात गेल्या अनेक वर्षापासून सुमारे 77 पदे रिक्त असल्याने त्याचा इतर शिक्षकांवर व विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम.

मु. शी. : जे.जे.महाविद्यालयात गेल्या अनेक वर्षापासून सुमारे 77 पदे रिक्त असल्याने त्याचा इतर शिक्षकांवर व विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम याबाबत सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : मा□□य सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यां□ ए□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : सभापती महोदया, मी पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडते.

" सन 1965 पासून 2005 पर्यन्त जे.जे.कला महाविद्यालयात एकूण 77 पदे रिक्त आहेत. त्यामुळे अन्य शिक्षकांवर येणारा कामाचा ताण, विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान, यावर करावयाची कार्यवाही."

सभापती महोदया, जे.जे. कला महाविद्यालयाची स्थापना होऊन 1965 साली झालेली आहे. या महाविद्यालयाची स्थापना होऊन आज 40 वर्षे पूर्ण झालेली आहेत. शासन निर्णय वित्त विभागाच्या 1 जुलै,2004 नुसार कार्यालयाच्या पदांचा आढावा मंजूर न झाल्यामुळे रिक्त पदांपैकी 50 टक्के पदे भरण्याबाबत शासनाला प्रस्ताव सादर केला गेलेला आहे. परंतु या 102 पदांपैकी 79 पदे अद्यापही रिक्त आहेत. कला संचालकाचे एक पद हे 2005 पासून रिक्त असून सदर पद भरण्यासंबंधी 2004 मध्ये जाहिरात दिलेली आहे. अधिष्ठाता या संवर्गाची चार पदे आहेत. तीन पदे रिक्त असून त्यातील दोन पदे सरळ सेवेने भरावयाची आहेत. सरळ सेवेने भरती करण्याच्या संदर्भात जाहिरात देऊन एक वर्षाचा कालावधी होऊन गेलेला आहे. अद्यापही याबाबतीत काहीही कार्यवाही झालेली नाही. त्याच प्रमाणे दोन पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. पदोन्नतीच्या संदर्भातील प्रस्ताव शासनाकडे 15 जुलै, 2004 रोजी पाठविण्यात आलेला आहे. परंतु त्या संदर्भात देखील कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली गेलेली नाही. प्राध्यापकांची एकूण 16 पदे

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर...

आहेत. त्यातील सरळसेवेची 8 आणि पदोन्नतीची 8 पदे आहेत. यातील 11 पदे रिक्त आहेत. एक पद भरण्याबाबत जाहिरात देण्यात आलेली आहे. त्यातील 6 पदे रिक्त आहेत. 4 पदे भरण्यासंदर्भातील प्रकरणे प्रलंबित आहेत. अधिव्याख्याता यांची एकूण 115 पदे आहेत. त्यातील 32 पदे रिक्त आहेत. ही सर्व रिक्त पदे सरळसेवेने भरावयाची आहेत. यातील 10 पदे अनुशेषातील असून ती भरण्याच्या संदर्भात जाहिरात दिलेली आहे. या रिक्त पदातील 17 पदे भरण्यासंदर्भात न्यायालयाची स्थगिती आहे. कंत्राटी पध्दतीने काही अधिव्याख्याते नेमले आहेत. त्याच प्रमाणे आस्थापना वर्ग याची एकूण 61 पदे आहेत. त्यातील 29 पदे रिक्त आहेत. त्यामुळे कार्यालयीन आस्थापना परीक्षा, विद्यापीठ या स्तरावर काम प्रलंबीत आहे. सहाय्यक निरीक्षकांची एकूण 5 पदे मंजूर असून 4 पदे रिक्त आहेत. ही सर्व पदे सरळसेवेने भरावयाची आहेत. ही पदे भरण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे जुलै 2004 मध्ये सादर करण्यात आलेला आहे. परंतु सदर प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे. या महाविद्यालयातील रिक्त पदे लवकर भरण्याची तातडीने कार्यवाही करण्यात यावी अशी मी विनंती करते. महाराष्ट्रात नव्हे तर भारतात तसेच जगात नाव काढणारे विद्यार्थी आपल्याकडे आहेत. त्यांना चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळावे म्हणून या रिक्त असलेल्या जागा तात्काळ भरण्यासंदर्भात शासनाने लक्ष घालावे एवढे बोलून मी माझे बोलणे संपविते.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मिरा भाईंदर ते डहाणू पर्यन्त स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाची

निर्मिती करण्याबाबत.

मु. शी. : मिरा भाईंदर ते डहाणू पर्यन्त स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाची निर्मिती करण्याबाबत याबाबत सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन वि.स.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी): मा□□□य सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यां□ ए□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.मुझफ्फर हुसेन (महाराष्ट्र विधानसभा सदस्याव्दारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"मिरा भाईंदर ते डहाणू पर्यन्त स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाची निर्मिती करण्याबाबत "

सभापती महोदया, ठाणे जिल्हयातील मिरा भाईंदर ते डहाणू पर्यंतच्या क्षेत्रामध्ये लोकसंख्येची प्रचंड प्रमाणात वाढ झालेली असून हा संपूर्ण भाग विकसित झाला आहे, या ठिकाणी सामान्य जनतेला गरजेच्या व मनोरंजनासाठी विविध सुविधा निर्माण झाल्या आहेत, त्यात शाळा, महाविद्यालय, मार्केट, सिनेमागृह, इत्यादी सोयी-सुविधांमध्ये झपाटयाने वाढ होत असल्यामुळे या भागाचे शहरीकरण झालेले आहे. अशा चांगल्या गोष्टी होताना या भागातील लोकसंख्या वाढल्यामुळे त्यातून उद्भवणारे चोरी, दरोडे, खून, बलात्कार, अशा पध्दतीच्या गुन्हयांमध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. या प्रकारांना पायबंद बसण्यासाठी ठाणे ग्रामीण पोलीस यंत्रणा अपुरी पडते आहे. त्यामुळे या विभागातील गुन्हयांचा शोध घेणे, आरोपींना अटक करणे, वा कारवाई करणे यादृष्टीने ठाणे ग्रामीण पोलीस यंत्रणा हतबल झाली आहे. पर्यायाने तेथील नागरिकांमध्ये शासनाबाबत उदासिनता निर्माण झालेली आहे. म्हणून ठाणे शहराप्रमाणे मिरा भाईंदर ते डहाणू पर्यंत वेगळया पोलीस आयुक्तालयाची निर्मिती करावी अशा प्रकारची मागणी शासनाकडे वेळोवेळी करण्यात आलेली आहे. परंतु याबाबत शासनाने अद्यापपर्यन्त कोणतीच कार्यवाही केलेली नाही. तरी याबाबत तातडीने कार्यवाही करुन ठाणे शहराप्रमाणे मिरा-भाईंदर ते डहाणू पर्यन्त वेगळया पोलीस आयुक्तालयाची निर्मिती शासनाने त्वरीत करावी म्हणून मी या विशेष उल्लेखाच्या व्दारे आपणास विनंती करीत आहे. धन्यवाद.

यानंतर श्री. कानडे..

अशुद्धीत्र प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : विशेष उल्लेखाच्या सूचना संपलेल्या आहेत. यानंतर एक शासकीय विधेयक चर्चेसाठी आहे. परंतु तत्पूर्वी आपण मध्यंतर घेऊ.

श्री. दिलीप वळसे-पाटील (ऊर्जामंत्री) : सभापती महोदया, मला एक निवेदन करावयाचे आहे आणि ते विधानसभेत प्रथम करणे आवश्यक आहे. मध्यंतरानंतर मी याठिकाणी ते निवेदन करीन आणि विधेयकही चर्चेला घेऊ.

तालिका सभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.15 वा. पुन: भरेल.

(3.46 ते 4.15 मध्यंतर)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- मध्यंतरा नंतर -

(सभापतीस्थानी : माननीय तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)

पृ.शी : विद्युत (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

मु.शी. : L.C.BILL NO. XVI OF 2005.

(A BILL TO AMEND THE ELECTRICITY ACT, 2003, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.दिलीप वळसे - पाटील (उर्जा मंत्री) : सभापती महोदया,सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 16 - विद्युत अधिनियम,2003, महाराष्ट्र राज्यास लागू असतांना त्यात सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदया, सन 2003 चा विद्युत अधिनियम केन्द्र सरकारने मंजूर केल्यानंतर त्या अधिनियमाच्या कलम 151 मध्ये विवक्षित प्राधिकृत अधिका-यानी दाखल केलेल्या तक्रारीच्या आधारावर, न्यायालयास, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या अपराधांची दखल घेता येईल अशी तरतूद केली होती. मुंबई उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला होता की , पोलीस अधिका-याने दाखल केलेल्या तक्रारीची दखल विशेष न्यायालयाला घेता येणार नाही म्हणून उक्त कलम 151 मध्ये, ज्यामुळे अपराधास घटकभूत असलेल्या तथ्यांबाबत पोलिसांनी दिलेल्या अहवालावर प्राधिकृत अधिका-यांनी दाखल केलेल्या प्राथमिक माहिती अहवालाच्या आधारे या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या अपराधाची दखल न्यायालयास घेता येईल अशा प्रकारची तरतूद प्रस्तावित केली आहे.या संदर्भात माननीय राज्यपालांनी विद्युत (महाराष्ट्र सुधारणा)अध्यादेश 2005 हा प्रख्यापित केला होता.

श्री.नितीन गडकरी (बसून) : हे विधेयक आम्हाला मान्य आहे. त्यावर माननीय मंत्रिमहोदयांनी भाषण न करता हे विधेयक मंजुरीसाठी मांडावे.

श्री.दिलीप वळसे - पाटील : सभापती महोदया, उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने असा निर्णय दिला होता की,पोलीस अधिका-याने दाखल केलेल्या तक्रारीची दखल विशेष न्यायालयाला घेता येणार नाही. पोलीस स्टेशनमध्ये अशा प्रकारचा गुन्हा दाखल करण्यास

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वळसे पाटील .....

प्रतिबंध होता हा प्रतिबंधक काढण्याचा आपण या विधेयकाव्दारे प्रयत्न केलेला आहे. जेणेकरुन राज्यातील वीज चोरीची प्रकरणे जलद गतीने मार्गी लावता येतील व सबंधिताविरुध्द कारवाई करता येईल. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

प्रश्न प्रस्तुत झाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदया, माननीय उर्जा मंत्र्यांनी या ठिकाणी विद्युत (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक 2005 विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडलेला आहे त्या विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी जे विधेयक आणलेले आहे त्या विधेयकाचे मी प्रथम स्वागत करतो. महाराष्ट्र राज्य वीज मंडळ स्थापन होऊन 50 वर्षे होऊन गेली आहेत. गेल्या 50 वर्षात विजेची चोरी होऊन या वीज मंडळाचे दिवाळे निघण्याची वेळ आली आहे, वीज मंडळाने त्या चोरीच्या बाबतीत संबंधिताविरुध्द कारवाई केली आणि विजेच्या चोरीची रक्कम वसूल केलेली आहे असे या 50 वर्षात एकाही चोरीच्या बाबतीत घडलेले नाही. या वीज मंडळाच्या तीन खाजगी कंपन्या आपण केलेल्या आहेत आणि आता मात्र तातडीने अशा प्रकारचे विधेयक या सभागृहात आणण्याची इच्छा महाराष्ट्र शासनाला झाली आहे.कायद्यात जी तरतूद करण्यात आली होती त्याप्रमाणे या वीज मडळाच्या तीन कंपन्या झाल्या आहेत .या कंपन्याचे आता नाही तरी नंतर खाजगीकरण होणार आहे याबद्दल माझ्या मनात संदेह नाही. खाजगीकरणाची प्रक्रिया आता सुरु झालेली आहे ही गोष्ट खरी आहे. आपण कामगारांना असे सांगितले की, या सगळया कंपन्या महाराष्ट्र राज्य वीज मंडळाच्या राहतील.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री.सरपोतदार ....

सभापती महोदया, या वीज मंडळाचा कारभार मी पाहतो तेव्हा एक गोष्ट निर्विवादपणे सांगाविशी वाटते की, आपल्या कायद्यामध्ये ज्या तरतुदी आहेत, आपले जे नियम आहेत त्यांची नीट अमलबजावणी करून, चोऱ्यांना प्रोत्साहन दिले नाही तरी देखील आपण वीज मंडळ नफ्यामध्ये चालवू शकतो आणि त्या दृष्टीने नव्याने झालेल्या या वीज मंडळाच्या कंपन्यांनी आपला कारभार चालविला तर त्याचे स्वागतच करावे लागेल. पण दुर्दैवाने तसे घडत नाही. आजपर्यंत राज्य वीज मंडळाला जे नुकसान झालेले आहे त्याला वीज मंडळाचेच स्वत:चे काही अधिकारी-कर्मचारी आणि वीज चोर देखील कारणीभूत आहेत हे तुम्ही आम्ही कोणीही नाकारू शकत नाही. अशा पार्श्वभूमीवर नागपूरच्या खंडपीठाने असा निर्णय दिला की, पोलिसांतर्फे तक्रार आली तर ती स्वीकारली जाणार नाही. म्हणून मग स्वतंत्रपणे तक्रार करण्याच्या दृष्टीने तरतूद करण्यासाठी म्हणून आपण सेक्शन 151 ऐवजी आता सेक्शन 153 आणि 154 चा यामध्ये अंतर्भाव करीत आहात. मी त्याचे स्वागत करतो. परंतु याची अमलबजावणी करण्यासाठी देखील इच्छाशक्ती असावी लागते. तो इच्छाशक्तीचा प्रश्न आहे. आपण आता वीज मंडळाचे विभाजन करून तीन कंपन्या केल्या आहेत. पण त्यांच्याकडे तरी ही इच्छाशक्ती आहे का ? तेव्हा या वीज चोऱ्या आपल्याला खरोखरी थांबवावयाच्या असतील तर असलेल्या नियमांची आणि आता करीत असलेल्या कायद्यातील तरतुदींची परिणामकारक अमलबजावणी करून वीज मंडळ फायद्यात येईल या दृष्टीने आपण उपाय योजना करणार का हा महत्त्वाचा प्रश्न आहे. कारण शेवटी वीज मंडळातील 1 लाख 10 हजार कर्मचाऱ्यांच्या भवितव्याचा हा प्रश्न आहे. वीज चोऱ्यांमध्ये काही कर्मचारी आणि अधिकारी देखील आहेत, त्यांना संरक्षण देण्याचे काम वीज मंडळ करीत आहे. अशा अधिकाऱ्यांच्या विरूद्ध कर्मचाऱ्यांनी, जनतेने तक्रारी केलेल्या आहेत पण त्यांची दखल घेतली जात नाही. उलट त्यांना प्रमोशन्स दिली जातात. मी जेव्हा आमदार म्हणून प्रथमत: निवडून आलो तेव्हा पासून मी हे पहात आहे. थोडक्यात सगळाच अंधार याबाबत आपल्याला दिसतो आहे. परिणामत: मंडळ आणि जनता देखील अंधारात आहे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. सध्याची लोड शेडींगची परिस्थिती त्यामुळेच निर्माण झालेली आहे. सभापती महोदया, उद्या वीज मंडळावर या सभागृहामध्ये चर्चा ठेवली आहे. त्यामुळे मी या विषयावर आता अधिक न बोलता उद्याच बोलणार आहे. परंतु या विधेयकाच्या संदर्भात बोलताना मला असे सांगावयाचे आहे की, कायद्याचे सेक्शन आपण जरूर

..... जेजे 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करा. पण त्याची दखल घेऊन कायदेशी कारवाई देखील आपण जरूर करा आणि आम्ही या तरतुदी नुसार कारवाई करून किती वीज चोरांना सजा केली याची माहिती पुढील वर्षी निश्चितपणे आपण आम्हाला द्या. अन्यथा कायद्यामध्ये जरूर आपण तरतूद करून घेता पण प्रत्यक्षात त्याची अमलबजावणी मात्र काहीही नाही असे दुर्दैवी चित्र उभे राहू नये या दृष्टीने मला सांगावयाचे होते म्हणून मी या विधेयकावर बोलण्याचा प्रयत्न केला आहे. आता आपण या विधेयकान्वये वीज कायद्यामधील सेक्शन 151 ऐवजी सेक्शन 153 आणि 154 आणले आहे त्याचे मी स्वागत करतो. मात्र या तरतुदींचा परिणामकारकतेने वापर आपण करावा एवढीच विनंती करतो. कारण आजवरचा अनुभव असा आहे की, ज्या तरतुदी करावयाच्या त्याची अमलबजावणीच करावयाची नाही. थोडक्यात कायद्यात तरतुदी आहेत पण अमलबजावणी नाही ही वीज मंडळाची सर्वात मोठी कमजोरी आहे. तेव्हा अमलबजावणीची इच्छाशक्ती असेल तर वीज मंडळ आणि पर्यायाने महाराष्ट्र राज्य देखील अंधारातून उजेडामध्ये येईल अशी मी अपेक्षा करतो. वीज चोरीच्या बाबतीत आपण खरोखरी काही परिणामकारकतेने कारवाई करा, अन्यथा वीज चोरांचे पोट भरते आहेच आणि ते चोर मग आमदारसुद्धा झालेले आहेत. बाहेर चोऱ्या करावयाच्या आणि येथे मग ते निवडून येतात. मी कोणाचे याबाबतीत नाव घेत नाही. परंतु हे घडते आहे. तेव्हा महाराष्ट्राच्या प्रगतीच्या दृष्टीने हे हानीकारक आहे. तेव्हा या विधेयकाच्या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना याबाबत सूचना देण्यासाठीच मी बोलण्याची संधी घेतली आहे. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

***

(यानंतर श्री. जागडे .... केके 1 ...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे (रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, डान्सबारच्या बाबतीत या सरकारने एक अध्यादेश काढला होता. परंतु त्याला माननीय राज्यपालांनी दि. 23 जून 2005 रोजी मान्यता दिली नाही. राज्य सरकारने जो अध्यादेश सरकारने काढला होता, त्यावर माननीय राज्यपालांनी सही केली नाही.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : माननीय राज्यपालांनी कशावर सही करावयाची, हा त्यांचा अधिकार आहे. त्याबाबत माननीय सदस्यांनी बोलू नये. माननीय सदस्यांनी सभागृहासमोर असलेल्या विधेयकावर बोलावे.

श्री. अनंत तरे : सभापती महोदया, मला या विधेयकावर बोलत असताना मला एका गोष्टीचा खुलासा माननीय मंत्रिमहोदयांकडून अपेक्षित आहे. सभापती महोदय, या पूर्वी जेव्हा अशा प्रकारचे विधेयक सभागृहासमोर चर्चेला आले होते, तेव्हा वीज मंडळाच्या कोट्यावधी रुपयाच्या थकबाकीबाबतची चर्चा झाली होती. आता ती थकबाकी आपण वसूल करणार आहांत की सोडून देणार आहांत ? हा महत्वाचा प्रश्न माझ्यासमोर उभा राहिलेला आहे. भिवंडी, मुंब्रा तसेच रायगडमधील इस्पात कंपनीकडून कोट्यावधी रुपयाच्या विजेच्या बिलाची थकबाकी आहे. भिवंडीतील तर 600 कोटी रुपयाची थकबाकी आहे. ही थकबाकी वसूल करणार आहांत की त्यांना कायमची माफ करणार आहांत ? याचा खुलासा या निमित्ताने माननीय मंत्रिमहोदयांनी करावा, अशी मी विनंती करतो व इथेच थांबतो.

—

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील (उर्जा मंत्री) : सभापती महोदया, आपल्या राज्यातील विजेची एकंदरीत परिस्थितीत लक्षात घेता काही दिवसापूर्वी या सदनात एक विधेयक मांडले होते. वीज चोरी प्रतिबंधक कायदा आपण एकमताने मंजूर केला होता. आता सुध्दा या विधेयकाच्या बाबतीत माननीय सदस्यांनी चांगल्या भावना व्यक्त केल्या आहेत. वीज चोरी बाबत काहीतरी सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. आपण वीज चोरी प्रतिबंधक कायदा मंजूर केला आणि त्याची काटेकोरपणाने अंमलबजावणी करण्याचे आपण ठरविले होते. केंद्र सरकारने सुध्दा इलेक्ट्रिसिटी ॲक्ट 2003 मंजूर केला. केंद्र सरकारच्या कायद्याच्या तरतुदी आणि राज्य सरकारने केलेल्या कायद्याच्या तरतुदी या सिमीलर होत्या. त्यामुळे राज्य सरकारने केलेल्या कायद्याची आपण अंमलबजावणी करु शकलो नाही. केंद्र सरकारच्या कलम 151 मध्ये अशी तरतूद अशी आहे की, "No Court shall take cognizance of an offence punishable under this Act except,--

(a) upon a complaint in writing made by Appropriate Government or Appropriate Commission or any of their officer authorised by them or a Chief Electrical Inspector or an Electrical Inspector or a license or the generating company, as the case may be, for this purpose; or". केंद्र सरकारच्या कायद्याचा आधार घेऊन नागपूरच्या उच्च न्यायालयात एक केस दाखल करण्यात आली होती. स्थानिक पोलीस या बाबत कोणतीही कारवाई करता येणार नाही. कारण त्यांना प्राधिकृत अधिकारी मानण्यात येणार नाही. विजेची चोरी पकडल्यानंतर पोलिसांच्या कारवाईला मर्यादा येत होत्या. आता या कायद्यात तरतूद केल्यानुसार स्पेशल न्यायालये आणि स्पेशल पोलीस स्टेशन्स आपण निर्माण करीत आहोत. स्पेशल न्यायालये आणि स्पेशल पोलीस स्टेशन्स निर्माण करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. नागपूर उच्च न्यायालयाने जे जजमेंट दिले आहे, त्यामुळे काही अडचणी आपल्यासमोर उभ्या राहिल्या होत्या. पोलीसांकडे खूप काम असल्यामुळे वीज चोरीच्या बाबतीत त्यांना पाठपुरावा करता येत नाही. त्याप्रमाणे न्यायालयात सुध्दा फार मोठ्या प्रमाणात केसेस पडून असतात. त्यामुळे वीज चोरी प्रकरणासाठी वेगळी डेडीकेटेड पोलीस स्टेशन्स आणि

वेगळी डेडीकेटेड न्यायालये निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या प्रकरणात

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

गतिमानता यावी आणि जलद निर्णय व्हावा, म्हणून या बाबतची कार्यवाही करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या दृष्टीने मी माझी भूमिका मांडली आहे.

(यानंतर श्री. सरफरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील...

मी या सभागृहामध्ये माननीय सदस्यांना आश्वस्त करु इच्छितो की, वीजमंडळाचे विभाजन सन 2003 च्या कायद्यानंतर झाले. आपल्याकडे अशी पध्दत आहे की, अनेक लहान लहान गोष्टी खूप मोठ मोठया करतो. परंतु अनेक मोठ मोठया घडलेल्या घटनांची दखल सुध्दा घेतली जात नाही. आपण देशामध्ये पाहिले आहे की, ज्या ज्या राज्यांमध्ये वीजमंडळाचे विभाजन झाले त्यामध्ये 50-50 दिवस संप झाले, लोकांना वेठीला धरले गेले. आपल्या राज्यात ही प्रक्रिया अतिशय शांतपणे पार पडली, कर्मचाऱ्यांनी देखील यामध्ये आपल्याला मदत केली, राजकीय पक्षांनी मदत केली, सर्वांनी मदत केली. याचे कारण एकच आहे की, या राज्यामध्ये आज वीजेचा तुटवडा आहे, ही वीजेची निर्माण झालेली परिस्थिती दुरुस्त होण्यासाठी आपण सर्व क्षेत्रामध्ये पावले टाकायला सुरुवात केली आहे. त्यासाठी आपण जी जी उपाय योजना करावयास पाहिजे ती ती उपाय योजना करीत आहोत. मला माहीत आहे की, हा प्रश्न एका दिवसात सुटणार नाही. त्यासाठी वेळ लागेल. या सभागृहामध्ये पूरक मागण्यांच्या वेळेस वीज खात्यावर चर्चा होईल त्यावेळी आमचे काही चुकत असेलतर आपण जरुर मांडा. ज्या ठिकाणी सुधारणा करावयाच्या असतील त्या ठिकाणी सुधारणा करण्याचा प्रयत्न करु. तुम्ही मांडलेली भूमिका वेगळी असली तरी ती समजून घेण्याचा प्रयत्न करु. कायद्याने वीज मंडळाचे विभाजन केले आहे. त्यामध्ये वितरण कंपन्यांना अधिक परिणामकारकरित्या पुढे जाण्यासाठी कायद्यात तरतूद केली आहे. परंतु आपण फक्त एवढयावरच थांबणार नाही. आज वीजमंडळाचे विभाजन करुन त्यामध्ये एक निर्मिती कंपनी, एक वितरण कंपनी, एक होल्डींग कंपनी आणि एक ट्रान्समिशन कंपनी निर्माण करुन कायद्यातील तरतुदी पूर्ण केल्या असल्या तरी वीजमंडळाचे उत्पन्न वाढले पाहिजे. आणि ग्राहकांना किफायतशीर दरामध्ये, परवडेल अशा दरामध्ये वीज मिळाली पाहिजे. त्यासाठी वीजेची निर्मिती व वितरण झाले पाहिजे, तिचे कलेक्शन झाले पाहिजे. आणि कलेक्शन इफिशिअन्टली झाली पाहिजे. अकाऊंटिबिलिटी वाढली पाहिजे. हे सर्व प्रयत्न करण्याचे आम्ही ठरविले आहे. यामध्ये टाईम टू टाईम आम्ही स्टेप्स उचलायला सुरुवात करु त्यावेळी निश्चितपणे सभागृहासमोर येऊन या सर्व बाबी मांडण्याचा प्रयत्न करु. आणि म्हणून आपण आज एक वितरण कंपनी केली असली तरी यापुढे जावून 4,5 किंवा 6 कंपन्या करण्याबाबत अंतिम निर्णय मंत्रिमंडळ घेईल. अशाप्रकारे छोटया छोटया वितरण कंपन्या करुन त्यामध्ये चोऱ्या करणारे ग्राहक असतील तर त्यावर कारवाई करु. आणि ती चोरी करण्यासाठी मदत करणारा आमचा कर्मचारी असेल तर त्यांना सुध्दा या फ्रेममध्ये आणण्याचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील...

प्रयत्न करु. कोठल्याही परिस्थितीत वीजमंडळाचे उत्पन्न वाढवून या राज्याला या क्षेत्रामध्ये सक्षम करणे ही भूमिका घेऊन या राज्यामध्ये आपण ही कामगिरी केली आहे. आणि त्या दृष्टीकोनातून हे विधेयक आणले आहे. सभापती महोदया, या सभागृहातील माननीय सदस्यांचे मनापासून आभार यासाठी मानतो आणि आपणास आश्वस्त करतो की, हे विधेयक आणले आहे. ते संमत झाल्यानंतर त्याची आपण अंमलबजावणी करणार नाही असे होणार नाही. या सभागृहाला सांगतो की, या नवीन अधिनियमाच्या अंतर्गत किती जणांवर कारवाई झाली, किती ग्राहकांवर कारवाई झाली, किती कर्मचाऱ्यांवर कारवाई झाली याचा अहवाल मी सभागृहासमोर ठेवायला तयार आहे. आणि हा कायदा संमत झाल्यानंतर ज्यांची थकबाकी आहे त्यांना सोडून देऊ असे मानण्याचे कारण नाही. 23 जूनला हा अध्यादेश निघाला त्याला 15 दिवस झाले आहेत. त्यानंतर हे विधेयक याठिकाणी मांडले आहे. ज्यावेळी आपण केंद्र सरकारचा कायदा अमेंड करतो त्यावेळी त्याला माननीय राष्ट्रपतींची मान्यता मिळवावी लागते. केवळ या कारणासाठी केंद्र सरकारकडे हा अध्यादेश दीर्घकाळ प्रलंबित राहिला. त्यामुळे हा अध्यादेश काढण्यासाठी आपल्याला विलंब लागला. त्या अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर करण्यासाठी हे विधेयक आपण सभागृहासमोर आणले आहे. सभापती महोदया, या सभागृहाची एक भावना नेहमी चांगली असते त्याबद्दल मला अभिमान वाटतो. एकदा विषय समजून घेतल्यानंतर तो विषय राज्याच्या दृष्टीने हिताचा असेल तर सदनाच्या दोन्ही बाजूने विशेष करुन विरोधी पक्षाच्या बाजूने देखील सकारात्मक भूमिका घेतली जाते. या ठिकाणी चर्चा झाली नाही म्हणून सकारात्मक भूमिका घेतली नाही असे मी म्हणणार नाही. परंतु या विधेयकातील तरतुदी आपण समजून घेतल्या असल्यामुळे त्याचा फायदा निश्चितपणे राज्याला होणार आहे हे गृहीत धरुन आपण हे विधेयक संमत करावे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 5 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 16 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 16 संमत झाले आहे.

. . . .2 एम-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: दाभोळ विद्युत प्रकल्पाची पुनर्रचना करणे.

मु.शी.: दाभोळ विद्युत प्रकल्पाची पुनर्रचना करणे यासंबंधी माननीय ऊर्जा मंत्र्यांचे निवेदन.

श्री.दिलीप वळसे-पाटील (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :--

सभापती महोदय, मला दाभोळ विद्युत प्रकल्पाच्या संबंधात एक निवेदन करावयाचे आहे. मला माहिती आहे की, या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदर वितरीत करावयास पाहिजेत. पण तसे करता आलेले नाही. या प्रती मिळण्यास 15-20 मिनिटे लागतील. सध्या मी याठिकाणी हे निवेदन वाचतो आणि नंतर सदरहू निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांच्या पिजन होलमध्ये ठेवण्यात येतील.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदया, विजेच्या क्रायसेसमध्ये आपल्यावर लायबिलिटी न रहाता हा करार केलेला आहे, निश्चितपणे महाराष्ट्राच्या उपयोगाचा आहे. हा करार घडला याबद्दल निश्चित समाधान व्यक्त केले पाहिजे. मी मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. एक विचारावयाचे आहे की, ही जी बेक्टेल आणी जी.ई.कंपनीची 10:10 टक्के इक्वीटी होती, नंतर एन्रॉन कंपनीचीही ती विकत घेतली अशी एकूण 45 टक्के इक्वीटी होते. ही नंतर कोणत्या कंपनीला ट्रान्स्फर करण्यात आली ? ती कंपनी एम.पी.डी.सी आहे की आणखी कोणती कंपनी आहे ? याचा काही खुलासा होत नाही. परतु तरी देखील महाराष्ट्राच्या विजेच्या संकटाच्या काळात मार्ग निघण्यास उशीर झालेला आहे. उशिरा का होईना, परंतु 12-12 तासाचे विजेचे लोडशेडींग काही काळ सहन करावे लागेल. परंतु महाराष्ट्राच्या विकासाच्यादृष्टीने चांगले पाऊल पडलेले आहे. इंडियन फायनान्शीयल इन्स्टीटयुशनकडे याची मालकी रहाणार आहे, याबद्दल निश्चितपणे अभिनंदन करतो, धन्यवाद.

श्री.मधुकर सरपोतदार : हे स्वागतार्ह पाऊल आहे. मी सुरुवातीलाच सांगितले की, महाराष्ट्राला उजेडात आणण्याचा एक प्रयत्न आहे. मूळ प्रश्न असा की, विजेचा दर 2 रुपये 30 पैसे दर राहील असे आज म्हणत आहात. परंतु भविष्यकाळामध्ये विनिमय दराच्याबाबतीत कोठे डॉलरमिया येणार नाहीत ना ? ही आपण पूर्वी चूक केलेली आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : पूर्वीचा करार हा फॉरेनच्या कंपनीबरोबर केलेला होता. आता नवीन करार हा इंडियन कंपनीच्या बरोबर आहे. रेटे वरखाली कोठे होऊ शकतात ? फक्त गॅसच्या किंमती वाढल्या, फ्युवेलच्या किंमती वाढल्यामुळे थोडा दर वरखाली होईल, परंतु त्यामध्येसुध्दा 2 रुपये 30 पैसे दराने 5 वर्षे आम्हाला वीज दिली पाहिजे अशाप्रकारचा रायडर राज्याच्या मंत्रीमंडळाने घालून दिलेला आहे आणि तसे त्यांना आपण पत्र लिहिलेले आहे. याचा जो फायनल पी.पी.ओ. होईल तो एम.ई.आर.सी. सी.आर.सी.च्या मान्यतेने ज्यावेळेला अंतिम होईल त्यावेळेला पुन्हा एकदा आम्ही सभागृहासमोर येऊन सभागृहाला अवगत करु.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील....

सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे, त्यासाठी स्वतंत्र कंपनी स्थापन करण्यात आलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : ही कंपनी कोणाची राहणार आहे?

श्री. दिलीप वळसे-पाटील : ही कंपनी आपलीच राहणार आहे.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) :सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 14 जुलै, 2005 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 4 वाजून 45 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 14 जुलै, 2005 च्या दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही